

# शिवराज

संपादक:
प्रा. चंद्रकुमार नलगे

विद्यार्थी प्रतिनिधी: प्रकाश पाटील

ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर.

## शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज.

# शिवराज


: संपादक मंडळ :

अध्यक्ष –
प्राचार्य डॉ. अंबादास माडगूळकर

प्रमुख संपादक –
प्रा. चंद्रकुमार नलगे

विद्यार्थी प्रतिनिधी –
श्री. प्रकाश पाटील

मराठी विभाग –
प्रा. व्ही. एस्. बन्ने

हिन्दी विभाग –
प्रा. डॉ. एस्. जी. गोकाककर

इंग्रजी विभाग –
प्रा. एन्. आर. दुंडगेकर

मुद्रण–अलंकार प्रिंटर्स, मेन रोड, गडहिंग्लज.

Statement about ownership and other particulars about newspaper ' Shivraj ' Miscellany of Shivraj Mahavidalaya, Gadhinglaj to be published in the first issue every year after last day of February.

*From No. IV ( Rule No. 8 )*

| | |
|---|---|
| Place of publication | Shivraj Mahavidyalaya,Gadhinglaj |
| Periodicity of its publication | Annual |
| Printer's Name | V. A. Jathar |
| Nationality | Indian |
| Address | Main Road, Gadhinglaj. |
| Publishe's Name | Prin. Dr. A. D. Madgulkar |
| Nationality | Indian |
| Address | Shivraj Mahavidyalaya,Gadhinglaj |
| Editor's Name | Prof. Chandrakumar Nalage |
| Nationality | Indian |
| Address | Shivraj Mahavidyalaya,Gadhinglaj |

I. A. D. Madgulkar hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Gadhinglaj

**A. D. Madgulkar**
Signature of Publisher



संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष : श्री. व्ही. टी. पाटील

'शिवराज'चे संपादक मंडळ





आमचे प्राचार्य डॉ. अंबादास दिगंबर माडगूळकर

१६-६-१९६१ - १६-६-१९७४.

## आमचे प्राध्यापक



प्रा विठ्ठल बच्चे, प्रा. भीमराव सोरटे, आनंदा नाळे, प्रा अप्पासाहेब पवार, प्रा. शंकरराव जाधव, प्रा चनबसाप्पा गवळण, प्रा. मधा फडणीस, सौ. सरोजिनीदेवी पाटील, प्राचार्य पी. बी. पाटील, प्राचार्य डॉ. अवादास मादगुळकर, प्रा. चंद्रकुमार नलगे, प्रा. नामदेवराव दुडगेकर, प्रा. वेदव्यास गजेंद्रगड, प्रा विजयकुमार कुलकर्णी, प्रा. ज्ञानदेव डिक्कार, प्रा. शरद वराडकर, प्रा. डॉ. सुधाकर गोकाककर, प्रा प्रकाश शहा.



आमचे प्राचार्य डॉ. अंबादास दिगंबर माडगूळकर

## आमचे प्राध्यापक



प्रा विठ्ठल बन्ने. प्रा. भीमराव सोरटे, आनंदा नाळे, प्रा अप्पासाहेब पवार, प्रा. शंकरराव जाधव, प्रा चनबसाप्पा गवक्षण, प्रा. सुधा फडणीस, सौ. सरोजिनीदेवी पाटील, प्राचार्य पी. बी. पाटील, प्राचार्य डॉ. अवादास माडगूळकर, प्रा. चंद्रकुमार नलगे, प्रा. नामदेवराव दुडगेकर, प्रा. वेदव्यास गजेंद्रगड, प्रा विजयकुमार कुलकर्णी, प्रा. ज्ञानदेव डिक्कार, प्रा. शरद बराडकर, प्रा. डॉ. सुधाकर गोकाककर, प्रा प्रकाश शहा.

# आमचे प्राध्यापक



प्रा विठ्ठल बन्ने, प्रा. भीमराव सोरटे, आनंदा नाळे, प्रा अप्पासाहेब पवार, प्रा. शंकरराव जाधव,
प्रा चनवसाप्पा गवक्षणे, प्रा. सुधा फडणीस, सौ. सरोजिनीदेवी पाटील, प्राचार्य पी. बी. पाटील,
प्राचार्य डॉ. अंबादास माडगूळकर, प्रा. चंद्रकुमार नलगे, प्रा. नामदेवराव दुडगेकर,
प्रा. वेदव्यास गजेंद्रगड, प्रा विजयकुमार कुलकर्णी, प्रा. ज्ञानदेव डिक्कार, प्रा. शरद वराडकर,
प्रा. डॉ. सुधाकर गोकाककर, प्रा प्रकाश शहा.



प्रा विठ्ठल वत्रे, प्रा. भीमराव सोरटे, आनंदा नाळे, प्रा अप्पासाहेब पवार, प्रा. शंकरराव जाधव, प्रा वनवसाप्पा गवक्षण, प्रा. सुधा फडणीस, सौ. सरोजिनीदेवी पाटील, प्राचार्य पी. बी. पाटील, प्राचार्य डॉ. अंबादास माडगूळकर, प्रा. चंद्रकुमार नलगे, प्रा. नामदेवराव ढसेकर, प्रा. वेदव्यास गजेंद्रगड, प्रा विजयकुमार कुलकर्णी, प्रा. ज्ञानदेव डिक्कार, प्रा. शरद बराडकर, प्रा. सुधाकर गोकाककर, प्रा प्रकाश शहा.





# नव्या वाटा

श्री शिवराज्याभिषेक त्री शत संव
मुहूर्त घेऊन येणाऱ्या येत्या वर्षाच्या
शिवराजचा अंक युवक–युवतींच्या हाती
प्रकारच्या भावनांनी मन बहरून गेल्य
आहे. आशंका आहे. अवती भवतीच
भवितव्याची भीती आहे. चलित् च
आहे. युवकांच्या स्वच्छ मनाची आणि
गारीची आशावादी ग्वाही आहे.

# आमचे प्राध्यापक



प्रा विठ्ठल बन्ने. प्रा. भीमराव सोरटे, आनंदा नाळे, प्रा अप्पासाहेब पवार, प्रा. शंकरराव जाधव, प्रा चनबसाप्पा गवक्षणे, प्रा. सुधा फडणीस, सौ. सरोजिनीदेवी पाटील, प्राचार्य पी. बी. पाटील, प्राचार्य डॉ. अंबादास माडगूळकर, प्रा. चंद्रकुमार नलगे, प्रा. नामदेवराव दुडगेकर, प्रा. वेदव्यास गजेंद्रगड, प्रा विजयकुमार कुलकर्णी, प्रा. ज्ञानदेव डिक्कार, प्रा. शरद बराडकर, प्रा. डॉ. सुधाकर गोकाककर, प्रा प्रकाश शहा.



# नव्या वाटा



श्री शिवराज्याभिषेक त्री शत संवत्सरीचा शुभ मुहूर्त घेऊन येणाऱ्या येत्या वर्षाच्या प्रकाशकाली शिवराजचा अंक युवक–युवतींच्या हाती देताना अनेक प्रकारच्या भावनांनी मन बहरून गेलंय्. त्यात आनंद आहे. आशंका आहे. अवती भवतीचं दुःख आहे. भवितव्याची भीती आहे. चलित् चरित्राची चिंता आहे. युवकांच्या स्वच्छ मनाची आणि क्रांतदर्शी कर्तब-गारीची आशावादी ग्वाही आहे.

गेला. आता पूर्ण विश्वास. पूर्ण सत्य. देशाची ही मांग पूर्ण करण्याचे पूर्ण आश्वासन !

## श्रीमान योगी

बालपणापासून शिवाजी सुंदर सुंदर स्वप्नं रंगवीत होता. त्या स्वप्नांना प्रतिभेचे पंख फुटलेत की नाहीत हे पाहात होता. "१५ व्या वर्षीच शिवाजी मोठा विचारमग्न दिसे" असा १६९५ सालात कॉस्मे डा गार्ड या पोर्तुगीज लेखकाने उल्लेख केला आहे आज तुझं वय किती ? शिवाजीपेक्षाही तू वडीलधारा आहेस. तू मनात आणलेस तर त्याच्याहीपेक्षा तुला अधिक प्रभावशाली पराक्रम करता येईल. स्वतःला तू क्षुद्र समजायचे प्रथमतः मनातून काढून टाक.

संस्कृत, मराठी, फारशी, उर्दू, हिंदी, इंग्रजी, फ्रेंच पोर्तुगीज, डच इ. अनेक भाषेत आज शिवाजीच्या चरित्राची साधने उपलब्ध होऊ लागली आहेत. परम उज्वल नाट्यमय अघटितांनी शिवाजीचे चरित्र दैवी कोटीत गेले असले तरी शिवाजी हे केवळ पूजेचे साधन होता नये. तो एक चमत्कार होता खरा. पण त्यामागे निश्चयाचे बळ आणि मानवी कल्याणाच्या नीतिमत्तेचे अधिष्ठान होते. शिवरायाच्या कर्तव्याचे स्मरण म्हणजे त्यांच्या कीर्तीची आरती. त्यांच्या अचाट बुद्धिमत्तेला जोड नाही, निर्मळ आणि लोककल्याणार्थ तळमळणारी नीती याला तोड नाही.

सर्व धर्माचें संतपुरुष त्यांना वंदनीय असत. गुणी लोकांचा गौरव करताना त्यांनी जातीयता पाहिली नाही. स्त्रीबद्दल अत्यंत आदर आणि पूज्यबुद्धी असणाऱ्या या पुण्य-पुरुषाला तिच्यावर झालेला एवढाही अन्याय सहन होत नसे. रांझ्याच्या बदनाम पाटलाचे हातपाय तोडण्याची त्याने शिक्षा दिली. गायकवाड नावाच्या सरदाराला 'चौरंग' शिक्षा सुनावली. कर्तव्याच्या आड येणाऱ्या पै-पाहुणे आणि राव-राऊळांचे शिरकाण केले. न्यायदानात मुलाचाही मुलाहिजा ठेवला नाही. कडक शिस्त. कडक वागणूक. कडक शासन. औरंगजेबालाही त्यानी बजावले होते, "हे तुमचं वागणं वावगं आहे, बरं नाही." वृक्षवल्लरी, शेतशिवारे, भातरवाचरे, गाईगुरे यांचीही या कनवाळू राजाला काळजी होती, तिथं माणसाबद्दल तर बोलायलाच नको. 'श्रीं' च्या चरणी राज्य अर्पून निरिच्छ कर्तव्यनिष्ठेने प्रजापालन करणारा हा राजा आपल्या अधिकाऱ्यांना दंडक घालून देतो, "एका सुतळीचा तोडा जरी तुम्ही लोकांचा घेतला तर लोक म्हणतील, यापेक्षा मोगलाई बरा".

दीन, दुबळे, स्त्रिया यांचे आधी पालन, हा याचा दंडक. लोकांमध्ये प्रथम सुरक्षितता निर्माण झाली पाहिजे, ही याची भावना. निष्कलंक चारित्र्य ही याची नीती. शिवाजीच्या स्वराज्याचे स्वरूप हे असे नीतीच्या अधिष्ठानावर उभे होते. म्हणूनच त्याच्याकडून जगात अचाट अशी कामे लिलया पार पडली. रामदास स्वामींनी या महापुरुषाच्या व्यक्तित्वाचे, कार्याचे आणि गौरवाचे वर्णन ज्यातून ब्रह्मांड अर्थ निघू शकेल अशा पुढील शब्दात केला आहे.

निश्चयाचा महामेरू, बहुत जनांशी आधारू।
अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमान योगी ॥

## पताका संवत्सर

महाविद्यालयीन वर्षांचा विचार करता सतत काही ना काही कार्यक्रमाने गजबजलेल्या या वर्षाचा उल्लेख 'सदाफुली संवत्सर' असाच करावा लागेल. प्राचार्यांनी यंदाचे वर्ष संपूर्ण 'लोकतंत्रा' ने चालविण्याचा आपला मनोदय कॉलेजच्या सुरवातीसच प्रकट केला. जिमखाना चेअरमन प्रा. विठ्ठल बने यांनी तो विद्यार्थ्यांपुढे व्यक्त केला. बघता बघता इलेक्शन झाली. इतर कॉलेजांना इथली इलेक्शन म्हणजे आश्चर्याची आणि विस्मयाची धडकबाजीच! या 'गर्ल्हिल्लज स्टाईल' ला भली मोठी प्रसिद्धी देऊन साप्ताहिक 'मनोहर' ने या स्टाईलचे महाराष्ट्रभर अनुकरण व्हावे असे मोठ्या अभिनिवेशाने आवाहन केले आहे. गणपती, गौरी, हळदीकुंकू, खेळ, गाणी, वक्तृत्व, काव्य-शास्त्र-विनोदाचे नवे नवे कल्पक उपक्रम, फनी गेम्स्, राष्ट्रीय उत्सव, सामने, विभागीय क्रीडा स्पर्धा, आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा, बक्षीसे, सम्मेलने, गॅदरिंग— छे: छे:! आनंदाला आणि उत्साहाला यंदा काय सुमारच नव्हता. प्यूनपासून प्राचार्यापर्यंत आणि पोरांपासून पोरीपर्यंत सर्वत्र कसा अगदी खळाळ उत्साह. प्राचार्यांनी कुठंच रोखलं नाही. काहीच अडू दिलं नाही. चांगल्या कार्याला सतत हिरवा कंदील! सहकार्यांवर कसलेच 'बॉसिंग' नाही. कमीत कमी बंधने, जास्तीत जास्त स्वातंत्र्य या धोरणाने आणि सर्वांसाठी अधिकाधिक हितैषी दृष्टी या वृत्तीने त्यांनी दिलेल्या संधीचा प्राध्यापकानींही परिपूर्ण उपयोग करून घेऊन आपले संघटन कौशल्य, प्रतिभा आणि प्रज्ञा यांचे सुरेख प्रत्यंतर आणून दिले आहे. दमदार अनुशासन, दिलदार मन, नवाईला सतत प्रोत्साहन आणि श्रेष्ठबुद्धी यांचे व्यक्तित्व लाभलेल्या आपल्या प्राचार्यांकडून विद्यार्थी मित्रांनीही कोणताच लाभ उठवायची बाकी ठेवली नाही.

स्वास्थ्य, समृद्धी, कर्तबगारी, यशस्विता या दृष्टीने पाहाता प्राचार्यांच्या येथल्या वास्तव्याचा विचार करता त्यांच्या जीवनातील हे वर्ष म्हणजे त्यांच्या कुशल कारकीर्दीचा सुवर्ण कळसच म्हटले पाहिजे. अर्थातच या सुवर्ण कलशाच्या प्रकाशाची प्रेरणा आहे माननीय व्ही. टी. काका!

## क्रांतीच्या कळा

टंचाई, महागाई, दारिद्र्य या आर्थिक अरिष्टांच्या जोडीला नेकी-निष्ठा-नीतीचा महान दुष्काळ देशाला भेडसावू लागला आहे. नेत्यांची नेकनामदारी स्वार्थ, सत्तास्पर्धा, भ्रष्टता यांच्या कर्करोगाने सडू लागली आहे. सद्य:स्थिती ही अराजकाला आमंत्रण असल्याच्या भीतीने नाकर्ते विचारवंत आणि दुबळे तत्वज्ञ समाजाला इशारे देऊ लागले आहेत. क्रांतीचा क्षण जवळ आल्याचे भाकीत जयप्रकाशजी करीत आहेत. एक वर्ष कॉलेज सोडा आणि युवक-क्रांतीच्या समर्पणाची सिद्धता करा, असे ते युवक-युवतींना आवाहन करू लागले आहेत. तरुण मित्रा, राष्ट्र तुझ्याकडून केवढ्या मोठ्या अपेक्षा करीत आहे; तू देशाची केवढी महान आशा आहेस! विश्वास उडाला. सत्याची वासलात लागली. श्रद्धा तडा

**युवक मित्रा !**

येत वर्ष शिवरायाच्या राज्याभिषेक समारंभाचे ३०० वे वर्ष आहे. पुढील वर्षभर महाराष्ट्रातच नव्हे तर अखिल भारतीय स्तरावर या निमित्त समारंभ, प्रतिमापूजन, गुणकीर्तन इ. कार्यक्रम होणार आहेत. त्याचे मनोभावे स्वागत करावे आणि तुझा जागर व्हावा म्हणूनच संपादकीयाचा तोच तो नीरस औपचारिकपणा टाकून देऊन ही जागल्याची यथोचित कामगिरी आम्ही तुझ्यासाठी केली आहे. तू शिवरायाचा वारस आहेस. म्हणजे निश्चय, नीती, साहस, लोककारिता, हा तुझा वारसा आहे. त्याचा जीवजागर आणि पाठप्रतिज्ञा यांचा निर्धार म्हणजे शिवरायाच्या भक्तीभावाचे यथोचित प्रदर्शन. तुझी संस्था त्या पुण्यात्म्याच्या नावाने शोभायमान झाली आहे.

> " सारे लहानमोठे जन ईश्वराचे आहेत, असे जाणोन
> त्यांनी कोणावर जुलूम केला नाही. याजकरिता
> सर्वांच्या मुखी त्यांची स्तुती आहे, ज्याची जशी
> नेत तसी त्यास बरकत. त्या शिवरायाची दृष्ट
> प्रजेच्या कल्याणावर होती. "

हवालदिल झालेल्या भारतीय प्रजेला शिवरायाच्या कल्याणकारी राज्याच्या कल्पनेतून प्रेरणा मिळेल काय ?

राजे, तुम्हाला सर्व लहानथोर, सानमान 'शिवराजीयनां' चे अमूप, अनंत प्रणाम !

मुक्या मनाने किती उधळावे
शब्दांचे बुडबुडे
तुझे पवाडे गाऊ आम्ही
होऊ तुझ्याहि पुढे ॥ —हीच प्रतिज्ञा ! !

**–प्रा. चंद्रकुमार नलगे**



'अनामिका'चे प्रकाशन करीत असता
साहित्यिक श्री. शिवाजीराव सावंत



मा. प्राचार्य यांचे समवेत
'विविध करमणूक'चे कलावंत



'फनिगम्स'मध्ये
रंगलेल्या विद्यार्थीनी

स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे
प्राचार्य पी. बी. पाटील
यांचे स्वागत करीत असता





स्नेहसंमेलनाच्या पाहुण्या
सौ. सरोजिनीदेवी पाटील
भाषण करीत असता

प्रदर्शनाचे उद्‌घाटन करीत असता
सौ. गुणे





# मराठी

**अतिभारु कळियासी आला–**

रंगराव पाटील, पापा खिचडी, येजरे, बी. व्ही. कुंभार, महादेवकुमार होडगे, वि. मा. सुरंगे, अशोक चराटे, कदम, रामकुमार मांगले, उदयकुमार बेकनाळकर, कु. आशन् भुतकर, रामदास मोहिते, विजय कुलकर्णी, शशी पाटील, देसाई, पी. जी. धुमे, महादेवी इंगळे, अनामिका, रमेश सुतार, संभाग्रज.

**ये आकारा कथा व्यथेची–**

रंगराव पाटील, मदन हजेरी, मारुती जाधव, मारुतराव नानचे, एस्. एस्. पाटील.

**आम्हां घरी शद्बांचीच रत्नें–**

किरण गुणे, एस्. आर्. कोरवी, रामदास मोहिते, एस्. आर्. महाडीक, अशोक माने, पां. ल. येजरे, एस्. बी. पाटील.



## नश्वर बाला

रुप तुझे वाचता
शद्ब गाथा संपली
भाव तुझे वेचता
वाचा कशी थांबली !

शुभ्र तुझ्या दंतसरी
शोभती रत्नापरी
तहाणलेल्या ओठावरी
आसुसल्या गीतलहरी !

नेत्र तुझे पहाता
लाख दिप पेटते
सुरेख धनुष्य पहाता
नयनी नजर आटते !

परि नको तयाचा गर्व तुला
विश्वकर्म्याची ही तर लीला
नच त्यालीस गं अमरत्वाला
अवनीची तू नश्वर बाला !

रंगराव पाटील
द्वितीय वर्ष साहित्य

# प्रिया आणि तारा

गंधवाऱ्या थांब आता
आत तू येऊ नको
निद्रीस्त असलेल्या
माझ्या प्रियेला
तू आता जागवू नको।
मंदवाऱ्या थांब आता
पिंगा तू घालू नको
माझ्या प्रियेच्या गालावरचा
तीळ तू चुंबू नको ।
रानवाऱ्या थांब आता
नृत्य तू करू नको
माझ्या प्रियेच्या अंगाभोवती
तू आता झोंबू नको.

**पापा खिचडी**
प्रथम वर्ष वाणिज्य

# दान

तुझ्या तू मनानं
दिलेस गं हृदयदान
कशाची ही वाण
नाही नाही!
प्रीतीचा आनंद
भोगता सुगंध
झालो मी धुंद
तुझ्या प्रेमे!!
सखे आता तुज
एकच विनंती
ठेव तू अंतरी
माझी प्रीती!!!

**–येजरे पां. ल.**
तृतीय वर्ष वाणिज्य

# आस

जा फिरुन कधी येऊ नको
घाव हृदयावरी घालू नको
रक्ताळलेल्या अंतःकरणावर
पुनश्च मीठ चोळू नको!
थांब असाच पडून राहूदे मला
युगान, युगं पाषाणासारखा
गतजीवनातील सुखदुःखांना
स्वप्नं पहात बेडच्यासारखा!
ये नरीपण ये,--
येणारच असशील तर
वारा होऊन ये--
भग भगणाऱ्या जखमेवरती
फुंकर घालून ये!

**कुंभार बी. व्ही.**
तृतीय वर्ष वाणिज्य

# विसर तुला ऽऽ अन् ऽऽऽ मला !

जे झाले ते विसर सर्वथा।
विसर तुला अन् विसर मला॥
नव्या जीवनी नवीन होऊन।
संसाराचा फुलव मळा॥
जे घडले ते समज स्वप्नसे।
समज भास अन् समज ध्यास।
नव्या शक्तीने नव्या जोमाने।
चांदण्यात घर बांध अता॥
आता कशास शंका।
मागे कसे फिरावे॥
संवेदना तुझी ही।
कळली मला स्वभावे॥

**महादेवकुमार होडगे**
पदवीपूर्व वाणिज्य

## बाभळ

सावळी बाभळ शिवाराच्या बांधावर
दवात भिजलेला हिरवा पदर
सुकवित होती कोवळ्या उन्हावर.
हळदीची बोटं लागण्याच्या आत
राखणीच्या होती बंधनात
हसवीत पिकांना वाऱ्याबरोबर
होती स्वर्गात गात.
सांगत होती पिकांना काही
हिरव्या पात्यांच्या शुभ्र ऊसाला
पिवळ्या भाताच्या लसलसत्या लोंब्यांना
आणि रंग नाचऱ्या तृणपात्यांना.
एक सुगी संपून उन्हाळ्यात
जपत होती काटल्या हातांचे मनोगत
पण... पुढचा काळ कुणा माहीत ?
शेतात दिवसभर राबणाऱ्या
बाभळीच्याच सावळ्या बहिणी त्या
बाभळीच्या फाटक्या सावलीत
उन्हाचं बसत होत्या गाणी गात
मुकी बाभळ होती धीर देत त्यांनाही
कोरड्या उन्हात अश्रू आटवीत !!

**वि. मा सुरंगे**
प्रथम वर्ष साहित्य

## प्रेमाची कथा

प्रेमाच्या कैदेत सापडल्याविना
हृदय लुटले गेल्याविना
प्रेम ही काय चीज आहे, ते समजत नाही
हे प्रेमाच्या कवी बाबूरावांनो
प्रेमाच्या कथा काव्ये करता कशाला?
प्रेम हे काव्य आणि–
कथा स्वतः असताना.

**अशोक पा. चराटे**
तृतीय वर्ष वाणिज्य

## वाऱ्यावर

टप–टप पडती, अंगावरती, गगनीचे मोती
गड्यांनो, वाऱ्यावर झुलती !

आसुसलेली वसुधामाता
कृतार्थ झाला तिचा आत्मा
पिकवायाला सज्ज झाली
माती मधूनी मोती ॥ गड्यांनो ॥

थर-थरणाऱ्या तृणांमधूनी
भर-भरणारे पवन नाचती
गगनचुंबी वृक्ष तयाते
डोलाने डोलती ॥

गिरिशिखरावर अन् घरावर
पडे धो ! धो ! वारी तयावर
तुडुंब झाले सर्व शिवार
आनंदी आनंद होती ॥

झुळ-झुळणारा बाल निर्झर
खळ-खळणारी रम्य सरिता
हृदयी भरुन आले ज्याच्या
तेजाची ज्योती !

**कदम एम्. डी.**
प्रथम वर्ष साहित्य (अ)

## सूरच सापडत नाहीत

जीवनाला गति आहे रति आहे.
जीवनाला भरती आहे ओहोटी आहे.
ताल आहे काल आहे.
यातूनच कुणी बांधतो "ताजमहाल"
तर कुणाची असते "झोपडी"
कुणाची असते शाहीरी लावणी
तर कित्येकांना––
जन्मभर "सूरच सापडत नाहीत."

**रामकुमार मांगले**
द्वितीय वर्ष साहित्य

## उष:काल

पानां पानांतूनी
आली किरणे दारी
कळ्या लागल्या उमलू
हळूच पानांमधूनी
पक्षी लागले गाऊ !
विहार करिती गगनी
भ्रमर शोधती मधू
नाना फुलाफूलांमधूनी
पाने लागली हलू !
आनंदीत झाले सारे
फुले लागली डुलू
उष:कालात न्हावूनी
पक्षी लागले कुजबुजू !

**उदयकुमार ह. बेकनाळकर**
प्रथम वर्ष वाणिज्य

## स्वप्न

तू सहज भेटसी पथी
नसता कोणी अवती भवती
नव्हता वायू पिसाट नाचत
उन्ह कोवळे नव्हते हासत !
सगळे होते शांत शांत
तू ही चालसी निवांत
अर्वाचित नयना नयन भिडले
सहज तयात जीवन फुलले !
तयात माझे नयन हासले
डोळे उघडून सहज पाहिले
अवती भवती कोणी नव्हते
सगळे होते रम्य स्वप्न ते !

**कु. आशन् भुतकर**
द्वितीय वर्ष साहित्य

## रुप तुझे

खरोखर तू इंद्रलोकची परी
जीव ग जडला तुझ्यावरी
पण पाहित नाहीस तू ग परी
अंनंग घटा भरली तुझ्या अंतरी ॥१॥
तू फूल असे मस्त गुलाबाचे
रुप घेऊन यावेसे वाटते भुंग्याचे
अन् चाखून घ्यावे मद्य अंतरीचे
करु पहातो सार्थक जीवनाचे ॥२॥
इंद्रस्वप्न फुले ग तुझ्या संगतीत
ना भानही उरे कशा कशाचे
मेनका, रंभा, अप्सरा या नुसत्या कल्पना
पाहून वाटते तुला तुझेच रुप तयांचे ॥३॥

**रामदास मोहिते**
द्वितीय वर्ष साहित्य

## श्वास श्वास

माझ्या काळज्या वाहण्यासाठी
स्वत:हून तू घेतलेस ओझे
माझे दु:ख सोसण्यासाठी
विसरलीस सारे श्वास तुझे।
अनंताच्या आकांक्षेची
प्रीत तुझी ही अनोखी
झालो मी मलाच पारखा
तुझ्यामागे धावता धावता।
थकून टेकलीस तू क्षितिजावर
पुरे खेळ हा पाठशिवणीचा
कधी तू–कधी मी जरी खेळ असा
श्वास श्वास हा तुझाच साचा।

**विजय कुलकर्णी**
तृतीय वर्ष वाणिज्य

## छाया

वाळवंटी वाट असता
अनवाणी पाय असता
एकच एक वृक्ष मिळावा
सावली देण्यास मला !
रणरणत्या जिवनांत जसा
भिरभिरत्या मनात तसा
एकच एक दिलासा असावा
'त्या छायेचा' मला ! !
छाया नसे ही द्रव्याची
छाया नसे ही लोभाची
आहे अति मौल्यवान अशी
छाया दोन डोळ्यांची ! ! !

**शशी पाटील**
द्वि. व. वाणिज्य

## ताटातूट

माझे मलाच कळेना
मन तुझ्याकडे आकर्षले गेले ।
लपंडावा सुरवात झाली ।
खेळ मानवी जीवनातले ॥१॥
तुझ्याच मोहाने निवाल्या
यौवनातील प्रेमरुपी ज्वाला ।
एकात्र दोन्यात ओवलेल्या
सुंदरमय त्या गुलाब माला ॥२॥
तुझ्याच शोधात निघाला
निरुत्साही रस्ता मनाचा ।
जसे चकोरास ना पडतसे चैन
पाहिल्याविना चंद्र पोर्णिमेचा ॥३॥

**देसाई वाय. एन.**
पदवीपूर्व साहित्य

## अमुल्य धडपड

अचाट गर्दी गोंधळ
मधुनच एक किंकाळी आर्त- - दीर्घ- -
मृत्युचे साम्राज्य
दीन दुबळी जनता
वाट काढीत गर्दीतून
कोण पळण्याची, वाचण्याची एकच धडपड –
एक अबला - - एक अबला !
अबला ? छे ! सबला नरधामांना तोंड देत,
मानवता जागवत, होती तीही धडपडत - -
धडपड ?.... जीवासाठी ?
छे ! नव्हती प्राण रक्षणाची.
पण होती एक अमुल्य धडपड,
शील रक्षणकरण्याची, मानवतेच्या वेदीवर
मांगल्याचा दीप तेवत ठेवण्याची

**धुमे पी. जी.**
तृतीय वर्ष साहित्य

## सहवास

संध्या समय असावा
सूर्य क्षितिजपार असावा
पक्षांचा चिवचिवाट असावा
रातराणी त्या उमलत असाव्या !
तसा असावा ताज समोरी
'तूझीच नारे ?' प्रश्न नको हा
नको तयाचे कांही उत्तर
संध्या सयम निवून जावा !
भेट असावी अशी लाजरी
लाजाळूच्या वेली सारखी
फक्त जुळावी मिठी
सहवासाचे व्हावे अत्तर !

**महादेवी शं. इंगळे**
तृतीय वर्ष साहित्य

## मनीची व्यथा

मनीची व्यथा मनीच विरायची
ना कुणा दिसायची.
ना वाचा फुटायची.
उन्हा पावसात राहून
मनाची व्यथा मनीच विरायची.
व्यथेवर व्यथा उगळून
न दिसता साकळणारी
'माणूस' भेटता थंडाऊन
मनीची व्यथा मनीच विरायची.
काळोखात वाढून
उन रक्तात दडायची
विचार पिऊन
मनीची व्यथा मनीच विरायची.

**-अनामिका**

## भेट

खेळ खेळता धुंद होवोनि निशा ही रंगली ।
डाव उलटला रंग बदलला तैसे ती त्रासली ।।
शांत येऊनि दारी अलगद प्रसन्न उषा ठाकली ।
सुवर्ण मंदीर उभे राहीले इथे प्रातःकाळी ।१।।

दहा दिशांना उधळती ती गुलकंद लाली ।
पंख सारे धुंदीत व्हावोनि ती ओली बनली ।।
आभाळाने भेट धाडली काळ्या धरणीस ।
निर्मळतेने दवबिंदू बिलगले हिरव्या पानास ।।२।।

प्रियेस बिलगोनि पाती रस भरे चुंबन घेती ।
स्वाद भोगोनि हे झेप घेती वेगे धरणीवरती ।।
मातृहृदय स्वीकारते ही ममतेची भेट ।
सुवर्ण सारी त्यावर पसरी भास्करी-थाट ।।३।।

**रमेश सुतार**
प्रथम वर्ष साहित्य

## एकदाच माता

काय तरी नवलाई झाली
कातरवेळी अवचित व्याली
कुजबुजती त्या साऱ्या केळी
'बहीण आपुली बाळंतीण झाली!'।१।

आमंत्रणाला घाई केली
हसत सावळी संध्या आली
दहिवराची वृष्टी झाली
मायलेकरे तयात न्हाली ।।२।।

आयत्या वेळी आली पोफळी
ओटी भराया सज्ज नारळी
नवी नव्हाळी नेसुनी साळी
आली लव्हाळी गात भुपाळी ।।३।।

कानोसा घेत आली प्रभात
आली पाखरे पाळणा गात
हळूच वदला अवखळ वात
'संध्या आजीला झाली नात!' ।।४।।

मिळून हसल्या साऱ्या जणी
कंपावली मग नाजुक धरणी
ध्वनि आदळले रविच्या कानी
आली स्वारी शोधीत भुवनी ।।५।।

पाहिले तयांना हसत असता
केली शापवाणी जाता-जाता
"बापाविण ही जन्मली सुता
होशील 'तू' एकदाच माता!"

**-संभाग्रज**
द्वितीय वर्ष वाणिज्य

# मावळकडा

## किरण गुणे

प्रथम वर्ष साहित्य

प्रिय मित्रा,

इकडे येऊन मला आज महिना झाला. प्रवासात असल्याने मी तुला पत्र पाठवू शकलो नाही. त्यामुळे तूही पत्र पाठविलं नाहीस, आता मात्र मी लांबलचक पत्रांचा मारा सुरु करत आहे. बघ तुला पेलतो का ते.

तुझा निरोप घेऊन मी मुंबईहून निघालो. मात्र, मायभूमीला, स्वकियांना सोडून अगदी एकट्याने प्रवास करायचा व तोही कधीतरी आकाशात भिरभिरताना दिसलेल्या वाहनातून आणि बरोबर तुटपुंज्या इंग्लीशची शिदोरी घेऊन; या कल्पनेने 'डोळे' गटांगळ्या खाऊ लागले. एक संकट वाटू लागलं आणि देवाचं नाव पुटपुटण्याची क्रिया सुरु झाली.

तसाच बेधडक विमानतळावर घुसलो. अधिकाऱ्यांनी माझ्या कागदपत्रांशी योग्यतो झगडा केला, व शेवटी मी वेटींग–हॉलमध्ये आलो. बराच मोठा प्रशस्त हॉल व तोही रंगीबेरंगी खेळण्यांनी भरलेला. मी पुन्हा गडबडलो. कुठं बसावं ? कुणाजवळ ? अशी प्रश्न मालिकाच पुढे उभी ठाकली. शेवटी Mr. Donald नावाच्या अमेरिकन सद्‌गृहस्थाला केला मित्र.फक्त एकदा शेक हँड करुन. त्याच्या बरोबरच विमानात गेलो 'सम्राट शहाजहान' (जंबो) खरंच एखाद्या राजवाड्याप्रमाणे सजवलेलं होतं. त्याचं वर्णन करत बसलो, तर कागद अपुराच पडेल ! आता माझी अवस्था जरा बऱ्यापैकी होती. कारण, मन अजून हवाईसुंदरीच्या हास्याची लिमलेटी गोळी चघळत होतं, माझ्या सीटचा क्रमांक, सीटजवळील छताजवळील कप्प्यावर होता. मला तो हवाई सौंदर्यवंताने (Air Crew) दाखवला. आधी विमानातील आतील वर्णन कळले असल्याने आधी मी सीटपुढचे टेबल उघडून बघितले. मग पट्टा Seal-belt अडकवला. पण उघडायचा कसा हे कुठं माहित होतं -? शेवटी शेजारी बसलेल्या श्री. रशेक या गृहस्थाकडून सुटकेचा मार्ग विचारुन घेतला.

ठीक सव्वातीनच्या मुहूर्तावर आमचं एक वाजता निघणारं विमान निघालं. सर्व जनता झोपल्यावर मी विमान हिंडून बघितलं. मला सर्वात आवडला संडास ! तू वेड्यात काढशील मला. पण एवढा सुंदर संडास मी पहिल्यांदा विमानातच बघितला. मग खिडकीतून दिसणारा अंधार बघत बघत झोपलो. सहा वाजता आमचं विमान बैरुतला उतरलं. बैरुतचा विमानतळ तसा छोटा. पण सुरेख होता. तेथून तासाभरात निघालो. मध्ये ब्रेकफास्ट आला, पण पुढच्या सीटजवळ आलेला तो ब्रेकफास्ट बघून फास्ट ब्रेक न करायचाच ठरवला. राहून राहून माझ्या बॅग मधल्या पुऱ्या, भाकरी, चटणी काढून खावी असा मोह होत होता. पण ती का "यष्टी" होती ? मग काय ? नुसता दोन कप चहा (पाण्यासारखा) टाकून गप्प बसलो. मध्ये रोम आले. रोम नंतर परत 'डीनर' आला. पण तोही मला जेवणासारखा न वाटल्याने बिस्कीटं मागविली व तेवढ्यावर ( मग गिळून की बिस्कीटं गिळून) गप्प बसलो. माझ्या या अशा वागण्याने मात्र सुंदरी (?) माझ्याकडे फिरकेनाच . . . .! शेवटी एकदाचे अकरा वाजता पॅरिस आले. वरुनच त्याचा झगमगाट दिसला होता. आणि आता प्रत्यक्षात मी पॅरिस मध्येच होतो.

काही मिनिटात एक मोटारीवरचा बोगदा विमानाच्या दाराशी जोडला गेला आणि मी व रशेक इतरांना निरोप घेऊन बोगद्यात शिरलो. (अर्थात पुन्हा सुंदरीने अभिवादन करुन बेगडी हास्याची गोळी चारलीच.) मी इतरांबरोबर चालत चालत निघालो. तो थेट कस्टम ऑफिसमध्येच. तेथे काहीच त्रास झाला नाही. मग अशाच हवाई सुंदरीला भेटून माझी बॅग मला कुठे मिळेल

याची चौकशी केली. त्यासाठी मला फिरत्या जिन्यावरुन धडपडत चढउतार करावी लागली. वाटेत बँकेत माझ्याजवळील १० डॉलर्सचे फ्रॅंक्स करुन घेतले. मला १०० फ्रॅंक्स मिळाले. मग बॅग घेऊन सरळ बाहेर पडलो. वडलांनी सांगितले होते की, शक्य तो दादा न्यायला येईपर्यंत विमानतळावर थांब; पण ठरवलं की वाटेल ते झालं तरी हॉटेल वर जायचं. जेथे माझ्यासाठी खोली ठेवण्यात आली होती. आश्चर्य म्हणजे पॅरीसमध्येही हमाल आहेत. मी पाठ केलेले एक फ्रेंच वाक्य बडबडलो, "वौले पोरटे सेस बॅगेजीज लुटुबूस पोरला सीट" म्हणजे हे हमाला, कृपा करुन माझी बॅग बस स्थानकाकडे नेशील का?" त्याने मला बसमध्ये पोचते केले. अर्थात बॅग न्यायला हातगाडी (छानपैकी स्टीलची) होती. अंतर एक १०० फूटच असेल पण तेवढ्यासाठी ६ फ्रॅंक्स म्हणज १२ रु. अंदाजे द्यावे लागले. (बिचारा भारतीय हमाल! त्याला एवढी हमाली बहुदा परवडत नसावी.)

बसमधून मी Invalids या शहराच्या मुख्य भागात गेलो. बसमध्ये तिकीट देण्याचं काम ड्रायव्हर करतो. तरका ही बसमध्ये ड्रायव्हर शेजारी पेटी असते. त्यात ६ फ्रॅंक्स टाकले की एकीकडून तिकीट बाहेर येते. Invalid जवळ टॅक्सी करुन दोनतीन मैलावरील हॉटेल 'सिरियानो लाफायटी' जवळ आलो. त्यासाठी २२ फ्रॅंक्सचा खर्दा झाला. हॉटेलमध्ये आल्यावर मी तेथील व्यवस्थापिकेला फ्रेंचमध्ये विचारलं 'माझी खोली राखून ठेवली आहे का?' पण माझे उच्चार पूर्ण कोल्हापूरी असल्याने ती गप्पच बसली. शेवटी डायरीत लिहून घेतलेलं ते वाक्य दाखवलं. तेव्हा कुठं तिला मी काय म्हणतोय ते कळलं व मग माझी खोली दाखवण्यात आली. मला भूक सपाटून लागली असल्याने मी डबा उघडला. पण दुर्दैव.सर्व पदार्थ बिघडले होते. शेवटी चहा मागवला संध्याकाळी दादा व वहिनी इंग्लंडहून पॅरिसला आले. जेव्हा मी त्यांना भेटलो तो क्षण. . . .!

सर्वाआधी दुसरं काही न बोलता वहिनीने आणलेल्या खाद्याचा समाचार घेतला.

माझ्या पॅरिसमध्ये २७ एप्रिल ते ३० एप्रिलच्या काळात मी खूप शिकलो, खूप पाहिलं. पॅरीस सुंदर आहे. पण थोडं फार गचाळही आहे. वाहतूकही आपल्याकडील वाहतूकीसारखीच. प्रेक्षणीय स्थळे मात्र भरपूर आहेत. विशेषत: Invalids ही नेपोलियनची समाधी. आम्ही ती Travelscence tour च्या कंपनीच्या आगामगाडीतून आयोजित केलेल्या सहलीमध्ये पाहिली. येथे नेपोलियनबरोबर त्याचे सेनानी व मुलगा जेहान बोनापार्ट यांच्याही समाध्या आहेत. येथील फ्रेंच लोकांची हुशारी वाखाणण्यासारखी आहे. नेपोलियनची समाधी संगमरवरी असून ती भूपृष्ठाखाली आठदहा फूट आहे. त्यामुळे सद्भावना असो वा नसो प्रत्येकाला ती बघताना खाली बघावंच लागतं. म्हणजे नतमस्तक व्हावंच लागतं. पण आम्ही जेव्हा ती बघत होतो तेव्हा एका जर्मन गृहस्थानं त्याचा अर्थ निराळा काढला. त्याचं म्हणणं असं की कदाचित लोक नेपोलियनला खाली (तुच्छतेने) बघत असतील. मला वाटलं, हा आमच्याकडील प्राणी तर नव्हे ना? दुसरं स्थळ म्हणजे कॉंकोर्ड चौक. येथे १८३० साली फ्रेंच राज्यक्रांती झाली. येथील सर्व इमारती १८ व्या शतकातील असून भव्य आहेत. संपूर्ण चौकाच्या भोवती व मध्ये सुंदर कारंजी आहेत. ती संध्याकाळी दिव्यांच्या रोषणाईत खूपच सुरेख दिसतात. संध्याकाळचे पॅरीस पाहिलं की, म्हैसूरच्या वृंदावन बागेचा फोटो डोळ्यांसमोर उभा राहतो. कॉंकोर्ड चौक जेव्हा आम्ही पहात होतो तेव्हाची एक घटना सांगतो म्हणजे तुम्हा पॅरीसचा पोलीस कसा इतर फ्रेंच लोकांसारखा प्रणयी आहे हे कळेल.

आम्ही असेच कारंजी बघत होतो. पलिकडे काही जपानी मुली एकमेकांचे फोटो काढण्यात दंग झाल्या होत्या. तेवढ्यात ७० मैल वेगाने जाणारी एक पोलीस व्हॅन मोठ्याने ब्रेकचा आवाज करत थांबली. मला वाटलं अपघात झाला. म्हणून पाहू लागलो. तो काय? पोलीस महाराज अपघातामुळे नव्हे तर जपानी मुलींमुळे थांबले होते. व सौंदर्यपान करण्यात इतके दंग झाले होते की, आपल्यामुळे रहदारी खोळंबळी आहे याची त्यांना शुद्धही नव्हती!

पॅरीस जवळच असलेला 'लुई' राजघराण्याचा "व्हर्साइल पॅलेस" मात्र खूपच सुंदर व मोठा आहे. यात जवळ जवळ १८०० खोल्या आहेत. व याचे आवार,

कित्येक मैल आहे. स्वाऱ्या लोकांना स्वयंपाकाच्या वासाचा त्रास होऊ नये म्हणून स्वयंपाक घर राजवाड्यापासून तीन मैलांवर बांधलेले आहे. जमिनीखालील बोगद्याने जोडलेले आहे. जुन्या युगातील गोष्टीप्रमाणें नव्या युगातील एफेल टॉवरही पॅरीसची शान वाढवतो. हा ९८७ फूट उंच आहे. लिफ्टने वर जाता येते. (अरे तो टॉवर म्हणजे आपला 'संगम' मधला रे! ) तेथून पाहताना पॅरीस अधिक रम्य वाटते. प्रेक्षणीय स्थळे पाहताना आनंद झाला, पण काहीसं खटकलंही. ते म्हणजे सर्व पुतळे जेवढे म्हणून पाहिले ते नग्नच ! हे लोक एवढे नग्नताप्रिय आहेत की, पॅरीसला दोन्ही कडेवर घेवून जाणारी 'सेन' नदी, की जिला आम्ही लोक पूज्य मानतो माता मानतो, तिचाही एके ठिकाणी नग्न पुतळा आढळला. पॅरीस तसं सुरेख आहे. स्वस्ताई फक्त दारूचीच व अत्तराची. (तुझा काय विचार आहे?) पण दुकानं छान, नीटनेटकी लावलेली. पॅरीसमधले एक प्रसिद्ध दुकान 'गॅसरी लाफायेटी' तर आठ आठ मजली सात इमारतींतून पसरलेले आहे. येथील प्रत्येक मजल्यावर विविध देशांतील विशिष्ट प्रकारच्या सर्व वस्तू मिळतात. एखादी व्यक्ती जर पैशाची चवड घेवून साध्या कपड्यावर आत गेली तर बाहेर पडताना संस्थानिक (पूर्वीचं हं) बनून बाहेर येऊ शकेल.

तुला एक आनंदाची गोष्ट सांगायची म्हणजे आपण Indian Time ज्याप्रमाणें म्हणतो त्याप्रमाणें French Time म्हणायला हरकत नाही. त्याचाही एक अनुभव आहे माझ्या पोतडीत. पॅरीस मधील आमच्या सहली ज्या Trawelscene Tour बस कंपनीने आयोजित केल्या होत्या, त्यांना बस निघायला होणाऱ्या उशिराचे कारण विचारले असता असे सांगण्यांत आले की, ' विशेष काही नाही. आम्ही नेहमीच उशिरा निघतो." (माझ्या दीर्घ सुस्कारा- - - - आपल्या सारखे कोणीतरी आहे म्हणायचे या जगात ! )

असो, पॅरीस बद्दल जेवढं लिहावं तेवढं थोडंच. चार दिवसांच्या पॅरीसच्या मधुर स्मृती घेऊन मी दादा व वहिनी बरोबर "बुर्वे" या विमानतळावरुन छोट्या विमानातून निघालो. विमान फारशा उंचीवर नसल्याने खाली दिसणारे खेड्यांचे रमणीय दृष्य खरंच मोहक होते. संध्याकाळी आठ वाजता (स्वच्छ सूर्य प्रकाशात) २९ मैलांची खाडी ओलांडून आम्ही 'गेफर्ड' या विमानतळावर उतरलो. तेथून लंडन व लंडनहून १०० मैलावरील 'कॉव्हेंट्री' या शहरी (जेथील हॉस्पिटलमध्ये दादा डॉक्टर आहे) एका तासात पोहोचलो. जाताना आम्ही 'M6' या मोटार वे ने गेलो. यावर दुहेरी वाहतूक चालते; फक्त जाण्याचा रस्ता हा आपल्याकडील 'हाय वे' च्या पाचपट असतो व तेवढा रस्ता दुसऱ्या बाजूने येण्यासाठी असतो. रस्त्याचे एकूण तीन भाग असतात. सर्वात डावीकडून ६० मैल वेगाने जाणाऱ्या बसेस; मधून ६० ते ९० मैल वेगाने धावणाऱ्या गाड्या जातात व उजवीकडून ९० मैलापेक्षा अधिक वेगाने जाणारी वहाने धावतात. रात्रीच्यावेळी प्रत्येकाला आपला ट्रॅक कळावा म्हणून व अपघात टळण्यासाठी सहा ते दहा फुटाच्या अंतराने बहिर्गोल आरसे आखलेल्या ट्रॅकवर लावलेले असतात. त्यामुळे मोटारीच्या पुढील दिव्यातील झोत परावर्तित होऊन आपला मार्ग दिसतो. नवीन माणसाला तर रस्त्यात दिवे लागल्या सारखे वाटतात. धुक्यात वाहतुकीला त्रास होऊ नये म्हणून शहराजवळ पिवळे गंधकाचे दिवे लावलेले असतात. वाहतुकीला अडथळा होऊ नये म्हणून हे 'मोटार वे' कुठल्याही शहरातून वा गावातून जात नाहीत. शहर वा गाव यांच्या जवळ असते. आणि ते उपरस्त्यानी या मोटारवेना जोडलेले असतात. एखादे शहर मध्ये येत असेल तर शहरावरुन 'उडते पूल' (Fly over) काढलेले असतात. असे तीन 'मोटार वे' बर्मींगहॅम या शहरावरुन एकावरुन एक असे जातात. याला 'स्पॅगेटी जंक्शन' असे नाव आहे. या मोटार वेवर वळणे, चढ उतार नसतात.

ब्रिटीश टेलिव्हिजन फार प्रगत आहे. टेलिव्हिजन मार्गे विविध मालिकेतून करमणूक, शिक्षण व माहिती दिली जाते. ब्रिटीश खेड्यातील जीवन जवळून पाहता येते हे सर्व 'गुडीज' 'बुर्जी' या विनोदी मालिकेतून; क्रॉस रोड या दैनंदिन जीवन पटातून व विविध शाळा महाविद्यालये आणि विश्वविद्यालये यांच्या कार्यक्रमातून माझ्या पाहण्यात आले. सुरवातीला मला काहीच समजायचं नाही, पण टेलिव्हिजनच्या सारख्या पाहण्याने सर्व समजायला लागले. टेलिव्हिजनवर शाळा कॉलेजचे

कार्यक्रम तर प्रेक्षणीय असतात. आता कॉलेजमध्ये शिकतो ते तेथील शाळांमधून शिकवले जाते. एका १० वर्षाच्या मुलाने अणुशक्तीवर चालणारी एक खेळण्यातली मोटार तयार केलेली टी. व्ही वरील मुलांच्या कार्यक्रमात दाखविली. मला एवढं अश्चर्य वाटलं की एक १० वर्षाचा मुलगा हे करु शकतो व आम्हाला काडयाच्या पेटीची मोटार सुध्दा करता येत नाही.

युनिव्हर्सिटीसाठी असणाऱ्या सामान्य ज्ञानाच्या चढाओढी पाहण्यात फार गंमत येते. त्यातलीच एक---एका कुठल्याशा पुतळ्याचा छोटासा हाताचा भाग दाखवला असता केंब्रिज युनिव्हर्सिटीच्या एका विद्यार्थ्याने एका क्षणात तो पुतळा कुणाचा, किती साली बनविला गेला, कुणी बनविला हे सर्व सांगितलं. कमाल आहे नाही असेच अवघड प्रश्न टी. व्ही. वर असतात. पण उत्तरं मात्र क्षणात-----! एखादा खेळाचा सामना अगदी इतक्या जवळून पाहता येतो की, त्यातील खेळाडूंच्या चेहऱ्यावरील भाव सुद्धा ओळखता येतात. टी. व्ही. वर एक निबंधच लिहिता येईल असो.

इथे आल्या आल्या मी 'एवॉन' नदीवरील 'स्टटफोर्ड' हे 'शेक्सपिअर'चे गाव पाहिले. त्याचं घर जसं आहे तसं जपून ठेवण्यात आलं आहे. तेथे दंगेखोर लहान शेक्सपिअरला डांबून ठेवायला "बेबी माइंडर" स्वयंपाक घरात आढळले. ही एक हूकच्या आकाराची लोखंडी पट्टी आहे. व ती एका खांबाला फिरती जमिनीला समांतर बसविलेली आहे. त्याच्या चापात एकदा दंगेखोर शेक्सपिअर अडकवला की आईला स्वयंपाक करायला सोपा जाई. कितीही धडपड केली तरी फक्त घाण्याच्या बैलाप्रमाणें खांबाभोवती फिरण्यापलिकडे त्याला कांहीच करता येत नसे. ( यशोदा कृष्णाला उखळाला कशी बांधून ठेवी. याचे चित्र तुझ्या डोळ्यासमोर आले असेलच.) तिथे मला कधी न आठवणारे 'हॅम्लेट' आठवू लागले.

पंधारा दिवसापूर्वी मी व्हॉयक्रॉस प्राणीसंग्रहालय पाहिलं. येथे चिपांझी माकडाचे चहापान पहाण्यासारखं असतं बेटे, चहा, साखर, दूध कपात घेवून माणसांसारखी बिस्कीटांची चव घेत आरामात चहापान करत असतात. येथे बरेच नवीन प्राणी पहायला मिळाले. प्रामुख्याने जलसिंह, व दोन फूट लांब जीभ असणारे Ant eater मला आवडले.

प्राणिसंग्रालया प्रमाणें 'वोबर्न सफारी' हा प्राणीसंग्रहालयाचा अभिनव प्रकार मला अधिक आवडला. एका मोठ्या बंदिस्त जंगलात विविध प्राणी विशिष्ट भागातून मोकळे सोडलेले असतात व आपण मोटारीच्या काचा बंद करुन हिंडत त्यांना पहायचं असतं. मोकळं वातावरण असल्यानं प्राण्याचं खुलं जीवन आपल्याला पहाण्यात एक आगळा वेगळा आनंद मिळतो. सिंह, वाघ यासारखे प्राणी सुद्धा आपल्या मोटारी भोवती फिरतात. पण भीती नसते. कारण मधून मधून रक्षकांच्या मोटारी सुद्धा फिरत असतात.

मागचा आठवडा मी लंडनमध्ये घालविला. खरं तर मला लंडन हे इंग्लंड मधील खेडयांएवढे आवडले नाही. कारण तेथील अफाट लोकवस्ती व थोडीफार अस्वच्छता. पण येथे पाहण्यासारख्या गोष्ठी मात्र खूपच आहेत. आम्ही दररोज थोडी थोडी अशी ठिकाणे पहात होतो. जाताना मोटार नेत होतो व ती चौथ्या, पाचव्या मजल्यावर ठेवून पायीच फिरत होतो. (अरे हो! मोटार व तीही चौथ्या मजल्यावर याचं तुला आश्चर्य वाटलं असेल, पण इकडं वाटेल तिथ मोटार ठेवता येत नाही. त्या ठेवायला 'कार पार्क' असतात. ते पाच, सहा असून वर जायला लिफ्ट वा घाटाप्रमाणे रस्ते असतात. गेटजवळ गेल्यावर आपोआप एका मशीनमधून वेळ नोंद केलेली चिठी येते. ती घेतल्यावर दार उघडते व आत शकतो. त्याप्रमाणे बाहेर जाताना तेथे बसलेल्या व्यवस्थापकाला वेळेप्रमाणे ठराविक पैसे दिल्यावर बाहेर जाण्यासाठी दरवाजा उघडला जातो.)

दुसरे ठिकाण म्हणजे थेम्स काठावरील 'वेस्ट मिनिस्टर टॉवर'. टॉवरवरील घडयाळातील मोठ्या काट्याना 'बिग बेन' म्हणतात. येथेच ब्रिटन पार्लमेन्ट भरते. यात ब्रिटिश राज्यकर्त्यांची भव्य चित्रे आहेत. येथे घडलेली एक घटना आठवली म्हणून सांगतो. मी माझ्या नेहमीच्या विसराळूपणाला अनुसरुन माझा कॅमेरा

तेथील एका बाकावर विसरलो, जेव्हा हे लक्षात आले तेव्हा पळत मागे गेलो; तो काय? कॅमेरा खुर्चीवर नव्हता. ऐकलं होतं इंग्लंडमध्ये कोणी छोटी चोरी करत नाही. पण मग माझा कॅमेरा - - - ? तेवढ्यात माझा कॅमेरा बॉबीच्या हातात मला दिसला (बॉबी म्हणजे कोण हे मला वाटतं तुला सांगायला नको.) जरी त्या प्राण्याबद्दल माहिती होती तरीही घाबरलो. वाटलं, आता तो बॉबीच्या खिशात जाणार (माझा कॅमेरा छोटाच आहे ) मी धीर करुन मागायला गेलो. पण भीती वाटत होती, वाटलं, (ए, आधी बिअरला एक पाऊंड दे! चहापाण्याला काही दे टाईप-) परिचित शिक्षा होईल. पण आश्चर्य असं, मी जेव्हा तो मागितला तेव्हा पुरावा वगैरे काही न मागता बॉबीने तो मला साभार परत केला.

मदाम तुसाद हे एक मेणाच्या पुतळ्यांचे संग्रहालय आहे. मादाम तूसाद या फ्रेंचबाईने बनविलेल्या मेणाच्या पुतळ्यांचे संग्रहालय आहे. या कलाकार बाईने अनेक अप्रतीम पुतळे बनविले असून तिने स्वतःचा स्वतःच बनवलेला पुतळाही तेथे आहे. ब्रिटिश राज्यकर्ते, जगातील प्रसिध्द खेळाडू, नट तसेच ब्रिटन मधील कुप्रसिध्द गुन्हेगार यांचे तेथे पुतळे आहेत. महात्मा गांधींचाही तेथे एक पुतळा आहे. त्यातील मला सर्वात आवडलेला अप्रतीम पुतळा म्हणजे चौदाव्या लूईची सौंदर्यवती रखेली बेरी. तिची छाती हवेच्या दाबाने वरखाली होत असते. तेथेच एका बाकावर दोन माणसे पेपर वाचत बसली होती. मी पाच मिनिटं पहात होतो. पण हाल–चाल दिसेना. मी माझी शंका बहिनींना बोलून दाखविली. तेव्हा हसायलाच लागल्या. मग मला कळलं, की तेही पुतळेच आहेत! तर एके ठिकाणी दुसरीच गंमत झाली. एका कोपऱ्यात एका ब्रिटिश माणसाचा पुतळा उभा होता. मी जेव्हा निरखून बघायला लागलो. तेव्हां तो हसयाला लागला. मग ध्यानात आलं की हा पुतळा नसून हा एक सद्गृहस्थ उगीच गंमत करायला पुतळ्या सारखा उभा आहे! ( यावरुन तुला कल्पना येईल, की पुतळे किती हुबेहुब बनवलेले होते.)

'ब्रिटिश म्युझियम' हे मात्र खरंच अफाट व सुंदर आहे. पण नोंद करण्यासारखी गोष्ट अशी की त्यात बहुतेक इतर राष्ट्रांतील वस्तूच आहेत. ब्रिटिश शिल्प वा जुन्या वस्तू अशा फार थोड्याच. योगायोगाने तेथे आलेला 'तुथुन खामन' या राजाचा खजिना मी बघू शकणार होतो. पण ती बघायला इतकी गर्दी होती की नंबर लागायला सहज दुसरा दिवस उजाडला असता. त्यामुळे तेथेच दाखवला जाणारा त्या खजिन्याचा चित्रपट (तोही हाऊस फुल्ल होता. ) बघायला मिळाला. हा राजा इ. स. पूर्वी ३००० वर्षे इजिप्तमध्ये होऊन गेला. वयाच्या आठव्या वर्षी तो गादीवर आला. १७ व्या वर्षी मेला (त्याचे मृत शरीरही सोन्याने मढवलेले असून ते बघण्यास ठेवले होते ) हावर्ड व कार्टराइट या ब्रिटिश उत्खनन शास्त्रज्ञांनी त्याचा शोध लावला त्यांच्या सर्व वापरातील वस्तू. रथ, शस्त्रे, भांडी, आसने सोन्याची असून हिऱ्यामाणकांनी मढवलेली आहेत.

अरे ! कंटाळला तर नाहीस ना ? वाटल्यास थांबवतो- - - - बरं थोडसंच आणखी लिहितो.

इंग्लंडमधील मुले ही वयाच्या आठव्या वर्षापासून छोटीमोठी नोकरी (सुट्टीत) करुन आपल्या चैनीपुरते पैसे मिळवितात. आमच्या घरी पेपर वाटायला येणारी १० वर्षाची 'शर्ले' आपल्या भावी आयुष्यासाठी नोकरी करुन करुन पैसे मिळवत होती. हे तिनंच मला सांगितलं.

फिलीप, डेव्हीड, जॅक ही माझी मित्रमंडळी तर १४ व्या वर्षी नोकरी करायला घराबाहेर पडली आहेत. अर्थात त्यांना आपल्या आई वडिलांबाबत नक्कीच आदर वाटतो पण त्यांचं बंधन नको वाटतं.

शिक्षणाच्या बाबतीत ते नक्कीच पुढारलेले आहेत. येथे प्रत्येकाला अमुक असं होता येत नाही. सुरुवातीला 'प्रायमरी स्कूल' मध्ये मुलांचा कल बघितला जातो व मगच त्याला योग्य साईड घेता येते. एखादा मुलगा ढ असेल, प्रयत्न करुनही सुधारत नसेल, तर त्याला सुधारायचा प्रयत्न करणारा शिक्षक राजीनामा देतो.

माझ्या मते तू बराच बोअर झाला असशील. शिवाय पुढील पत्रात लिहायला काही शिल्लक असू देना?

इतर मित्रांना स. न.

तुझा मित्र–

*

# तपास

रंगराव पाटील

द्वितीय वर्ष साहित्य

दिवस बुडायच्या वक्ताला पावसानं बरीच पिरपिर सुरु केली. उत्तरातल्या चुली पेटल्याची जाणीव धुराच्या लोटांनी झाली. मुमेवाडीच्या चावडीतील रेडीओची बडबड राणूच्या कानावर पडली. तसा राणू उठला. शिवारभर पांगलेली मेंढरं खँऽऽक् खँऽऽक् करीत हाकू लागला. झुडपांच्या आडोशांन चरणारी मेंढरं अंग झाडीत कुरणाची उतरण उतरु लागली बँऽऽबँऽऽ करीत पिलं आईला शोधू लागली. आवाज आवाजात गुरफटला. ओळखीच्या आवाजाकडं तोटरं धावली. बिलगत–बिलगत चालू लागली. वाटेत आडवा येणारा विठ्ठलाईचा ओढा मेंढरानी पार केला. राणू विठ्ठलाईपुढं थांबला. हात जोडलं. काहीतरी पुटपुटून पुढं झाला.

मेंढरं रस्त्याला लागली. दुरुन येणाऱ्या ट्रकची धडधड ऐकू येऊ लागली. राणूनं सारी मेंढरं रस्त्याच्या बाजूला लावली. रहदारीचा रस्ता असल्यानं मोटारींना दम नव्हता. त्यात रस्ता अरुंद अडचणीचा, परीटवडच्यावरचं पूल पार करताना राणूची पाचावर धारण बसायची. पुलाजवळ मेंढरं असताना मोटार आली तर आर्धी–मुर्धी मेंढरं ओढ्यात उतरायची.थोडी रस्त्यावरच कुंपणाला लपायची. ओड्यात घुसलेली मेंढरं रस्त्यावर हाकताना दिवसभर थकलेला राणू रडकुंडीच्या घाईला यायचा.

आज तसं घडलं नाही. मेंढरं सरळ बैठकीच्या कुंपणाबाहेर येऊन थांबली. मेंढरांचा गलका ऐकून रावजी बाहेर आला. पाठीमागून कुत्र्यानंही तोंड केलं. ओळखीची मेंढरं पाहून गप्प राहिलं. राणूकडं पाहून शेपूट घोळू लागलं. रावजीनं बैठकीच्या कुंपणाचं दार उघडलं. एक एक मेंढरु आत घेऊन तो मोजू लागला. "एक - - - दोन - - धा - - पंधरा - - इस इंऽऽ इसचं मेंढरं.?"

"राणूऽऽ मेंढरं इसच हायत. आणि याक कुठं रं सोडून आलास?"

'नाय मालक सगळी हुती.' - - -

"डोळं फुटल्यात काय रं माझं? बघ मोजून."

रावजी गुरगुरला तसा राणूच्या तोंडावर अंधार दाटला. तसाच तो खोपटात शिरला. एक एक मेंढरु बाजूला ओढून लावीत मोजू लागला. एक मेंढरु कमी पडलं. राणूच्या तोंडचं पाणी पळालं.

"व्हय मालक. याक कमी हाय मेंढरु." राणूनं कबूल केलं.

"चांगलं केलंस. आता माझ्याकड काय बघतोस? अगोदर चालाय लाग माझ्यापसनं. मेंढरु आनलास तर पगार मागायला ये!"

राणूनं मुकाट कुरणाची वाट धरली. पगाराची गोष्ट काढताच त्याचं भिजकं अंग शहारलं. संध्याकाळीच पगार मिळायचा होता. घरात पोराबाळांची लटांबर हात वाळू देत नव्हती. कर्ता–सवर्ता गडी एकटा. घरात धान्याची शिल्लक संपलेली होती. तिखट–मिठाच्या मडक्यांनी तळ गाठला होता. त्याच्या डोळ्यासमोर उद्या आ वासून उभा राहिला. मेंढरु मिळालं तर बरं - - - नाही मिळालं तर काय करायचं अशा ऐन पावसाळ्यात कुणाला गळ घालायची? आजपर्यंत हाडाची काडं केली; रक्ताचं पाणी केलं पण–कुणासमोर फुटक्या कवडीसाठी हात पसरला नाही. मिळेल तो तुकडा घामात भिजऊन खाल्ला. पोटभर पाणी पिऊन ढेकर दिला. तरी कुणाला गळ घातली नाही.

"राणू, ईळ करुन चाल्लाइस रं?" भिमरु शिंद्याच्या आवाजानं राणू विचार वादळातून बाहेर

पडला. विचार करता करता मेंढरु शोधायचं तो विसरुन गेला होता. भिमरु शिद्याच्या प्रश्नानं तो मूळमुद्यावर आला.

"ईळं करुन चाल्लय मामा? काय करता, मेंढरु चुकलं म्हणून चाल्लूय. दिसलं–बिसलं राणामुरडात?"–

"नाय बा. आस्सं कुठं गेलं रं ?"

"नसीब माझं. सकाळपासनं पोटात तुकडा नाय. जावाव म्हंतूय बिगीद्यान तवर हेच्यावर धाड पडली!" पुढं होत राणूनं भुकेची जाणीव करुन दिली.

अंधार काळवंडत होता. तोंडाला तोंड दिसत नव्हतं. वाटेत दगड–धोंडा असल्याची जणीव ठेचेनंच होत होती. ठेच लागून रक्ताळलेल्या बोटाला पाणी झोंबत होतं. आवरुन पुढं केलेला पाय सरकन निसरत होता. मोकळ्या पायात काटा रुतत होता. साऱ्या कट–कटीनं त्याला जिणं नकोस करुन सोडलं.

अंधारानं सारं शिवार पोटात घेतलं. हिरवं रान काळ्या बुरख्याखाली गाडलं गेलं. विठ्ठलाईच्या ओढ्याचं खळखळतं पाणी अधिकच खिदळत होतं. दूर कुठतरी कोल्हं मनसोक्त ओरडत होतं. महादेव टेकडीच्या बरकाडीला दसम्या बेरडाच्या वस्तीवर जात्याची घरघर ऐकू येत होती. महादेव मंदीरातील घंटारव सारं शिवार जागवीत होता.

राणू तमाच पडत–झडत चालला होता मेंढराच्या चरत्या जागा पहात होता- कुठंतरी झुडूप मेंढरासारखं दिसायचं. राणू आशेनं तिकडं धावायचा. काटेरी झुडूप हातानं चापसून निराश व्हायचा. असाच तो बराचवेळ मृगजळामागे धावत राहिला. चालता चालता त्याचा पाय एका दगडाला जोरानं आदळला. त्या दगडावर तो मटकन बसला.

हाता–पायातून वेदना जाणवत होत्या. डोळे भगभगत होते. त्या उंच जागेवरुन सभोवतालच्या खेड्यातील दिव्यांच्या रांगा स्थिर चांदण्याप्रमाणे दिसत होत्या. खाली तळवाटाला धनगराचीं पोरं खिदळत होती. धनगर बाप्येगडी शेकोटीभोवती बसून गात होते. ढोल ढन्‌ढनत होते; डिपांग ऽ डिपांग ऽऽ डिबीचीं ग ऽऽऽ डिपांग! आणि झांज खळखळत होती. छळंग ऽ छळंग ऽऽ छकळक् छळंग ऽऽऽ धनगरांचे कंठ सैल सुटले होते. त्यांच्याबरोबर रात्रही जागत होती. ढोल–झांजेच्या तालबद्ध रवानं कडेकपारी गाठली होती. चराचर जागविणारे डोंगरी गीतांचे आलाप गगन घुमवीत होते. राणू ऐकतच होता.

"चुकारीचं वासरु गा ऽऽऽ
परत नाय इयाचं ।
पान्हा घाली गाय गा ऽ ऽ हा
नाय गा ते पियाचं ॥

बरीच रात्र उलटली. ओव्या बंद झाल्या. राणू भानावर आला. श्यामा बाबराच्या वस्तीवर पोरगं रडल्याचा आवाज येत होता. राणूचं डोळं पेंगुळल होतं. 'असं आडरानात पडण्यापेक्षा कुठंतरी आडोशाला जावं. पोटभर पाणी प्यावं'. या विचारानं तो पायात बळ एकवटून उठला. पायात दम नव्हता. दगड–सड्या खरचटून पाय रक्ताळल होतं. पडत झडत बाबराची वस्ती त्यानं जवळ केली. बाबराच घर गडद अंधारात सुस्तावलं होतं दार-खिडक्यांच डोळ झाकून घोरत होतं.

"इच्यायला, झुपली की रं सारी." राणू पुटपुटला. पुढं झाला. दारात पेंगुळलेल कुत्रं चाहुलीनं जागं झालं. राणूवर घुरघुरु लागलं. शामालाही जाग आली.

"कोण हाय रं भाईर?"

"मी हाय मालक. जरा पाणी देता प्यायला?"

श्यामानं कंदिलाची वात चढवली. दार उघडलं कंदिलाच्या प्रकाशात थडीनं थरथरणाऱ्या राणूला न्याहाळलं.

"काय रं राणु? या इळंच - - - ? जरा आश्चर्यानंच बाबरानं विचारलं.

"व्हय मालक. मेंढरु कुठं चूकलय म्हणून आलूय हुडकत." राणूनं चौकटीचा आधार घेत म्हटलं.

"अन एकटाच हचा इळंचं?" - - -

"तर कोण सोबती ईल ? परमेसूर ?" राणूनं डोळं ओलावलं कंदीलाच्या प्रकाशात आसवातील कारुण्यता श्यामानं हेरली. त्यानं राणूला धीर दिला.

"आरं भ्यायचं कां ? तारणारा बी त्योच हाय आणि मारणारा बी त्योच हाय. त्येला समद्यांची काळजी हाय."

शब्दाला शब्द वाढत गेला. श्यामानं भोगलेले भोग त्याच्या आठवणीनं जतन करुन ठेवलं होतं. 'श्रम हाच देव' या न्यायानं त्याला आता चांगलं दिवस आलं होतं. श्यामाचा कानमंत्र राणू मुकाट ऐकत होता. स्वाभिमानी श्यामा राणूच्या लाचारी, नेभळट वृत्तीचे लचके तोडीत होता. शेवटी राणूनं मनोमनी ठरवलं, "उद्यापासून रावजीच्या मेंढराची राखण बंद."

दोघांच्या बोलण्यानं श्यामाच्या आईला जाग आली. म्हातारीनं राणूला पाहिलं. मध्यानरात्री राणू आलेला पाहून ती अंथरुणात उठून बसली.

"काय रं राणू ? आवरातीचं आलास लेका ?"---

"व्हय मावशी ईळ झाला. सोक पडला. पाणी तरी प्यावं म्हणून फिरलो तसाच."----

"पाणी कशाला पितूस लेका, ऐनरातीचं ताक हाय पी– प्वॉटभर."

म्हातारी उठली. शिक्यावरचं गाडगं खाली उतरुन पेल्यात ताक ओतलं आणि राणूफुढं ठेवलं. म्हातारी मानसाला चांगली. तिच्या घरात उतरलेला वाटसरु सुद्धा तहाणेला ताक आणि भुकेला तुकडा पोटात ढकलूनच पुढं पाय काढतो. अशा अनेक विचाऱ्यांचं पुण्य तिनं पदरी बांधून घेतलय. तिनं जाणलं "बिचारा उपास पोटाचा हाय. तुकडा खातूया काय बघावं." म्हणून एक भाकर आणि वाटीभर दही राणूपुढं ठेऊन ती राणूला म्हणाली.

"घे लेका. कच्या इळला आलास कुणाला ठावं. खा–प्वॉटभर."

"नग मावशी. भूक नाय मेली. अमृतासारख्या ताकानं जीव शांत झाला बग. जातू मी" राणूनं कांबळं झटकलं.

"आरं खा लेका. आणि जातूस कुठं ह्या इळचं? पड इथच."

म्हातारीनं राणूला हात धरुन खाली बसवलं. राणूला नाही म्हणता आलं नाही. उचललेलं कांबळं खाली ठेवलं. त्याच्यावर बसला. तुकडा मोडून तोंडात घातला. सुकलेलं तोंड पाणावलं.

"लई तसदी घेतलीस मावशी"

"कसली तसदी लेका? ईळ परसंग ह्यो साऱ्यासनींच असतोय. राजासुद्धा सुईला नडतोय."

"व्हय मावशी."

"ईळ करुन आलास ? काय काम हुत श्यामाकडं?"

"नाय बा. मेंढरु याक चुकलं. आलूय हुडकत काय–करायचं मावशी- - - - धन्याचा बांधला माणूस मी. मेंढरु नाय घावलं तर पगार दियाचा नाय मालक."

"व्हय लेका हुकुम धन्याचा आणि पैसा वाण्याचा! कुणब्याचच मराण हाय हेंच्यामंदी. बरं लेका पोरं बरी हाईत ?"

"हाईत मावशी. थोरलं शाळला जातय. आणि ते काय न्हानंच हाय."

"आसू दे लेका व्हतील मोठी. सेनातला किडा सेनातच न्हात नाय. फेडतील तुझा पांग. आणि सोना हुषार हाय काय रं ? लय चांगली पोर!" - - - - -

"ती बी बरी हाय. घरातच अलती"- - - - -

"असू दे बाबा. कुठं जाईल राणात ? कुणाच्या बांदाला खुर्प घ्यून जाईल ? लेका शेळी सोडावी राणात आणि बायकू असावी कोणात! चांगली संबाळ बिचारीला आयार काय म्हायार तिला. भाऊ व्हता तोबी गेला.

आता पूच तिचा परमेसूर. धडूताला कमी करु नगं तिच्या पोटाचं हाल करु नग पोरांच्या. 'आर,' आम्ही तारो तान आणि धडूत राखी मान!"

म्हातारीच्या उपदेशानं राणूचं डोळं भरुन वाहू लागलं. तिचा शद्ब न शद्ब त्याच्या अंत:करणात विरघळू लागला. सुकल्या गालफडावरुन आसवं तरळू लागली. म्हातारीनही डोळ्याला पदर लावला.

"गप लेका. वाईट वाटून घ्यू नगं. जातील हे दिस. हरीचंद्रासारखा वनवास भोगल्यास. बानं दारुच्या नादात सारं ध्यान सावकाराच्या पदराला बांधलं. त्यो धड असता तर तुला हे दिस ईत नव्हत लेका!"

मरगळल्या कंदिलाच्या प्रकाशात मायलेकराप्रमाणं त्याचं बोलणं चाललं होतं. सारं शांत होतं. कुत्रं खोपटात उबदार राखेत सुस्तावलं होतं. बैल मुसमुसत रवंथ करीत होते. बाहेर पेरुच्या झाडावर वागूळं झपाटली होती. वारा मंद वहात होता.

"झोप लेका. जाशील फाटच." म्हातारीनं फटकूर टाकलं.

राणू आडवा झाला. थकलेला राणू विचाराच्या वादळात गुरफटला पण थोड्याच वेळात तो साऱ्या जगाला विसरुन गेला.

पहाटं म्हातारी जरा लवकरच उठली. राणून अंथरुन पांघरुण झटकून दांडीवर टाकलं आणि म्हातारीला म्हटलं - - - -

"जातो मावशी."

"आँ? आणि गा? च्या ठिवलाय - - - - त्वांड धुऊन च्या घ्यून जा." म्हातारीनं आग्रह केला.

म्हातारीनं गरम पाण्याचं पातेलं राणूच्या हातावर ठेवलं. राणून मुकाटयानं 'त्वांड' धुतलं. चहाचा कप राणूच्या हातात देऊन म्हातारी आतल्या खोलीत गेली. दहाची नोट हातात घेऊन पुढं आली.

"धर लेका! पगार-बिगार मिळाला नाय तर पोरं उपास पोटी व्हातील."

"नगं मावशी"

"नगं म्हणू नगं"- - - - -

म्हातारीनं राणूच्या हातात नोट कोंबली. राणूचं हृदय भरुन आलं. डोळ्यांच्या कडा ओलावल्या तो दाटल्या स्वरानं म्हातारीला म्हणाला.

"माझ्या आईसारखी हाईस मावशी!"

"व्हय लेका म्हणत्यात नव्हं; आई मागं मावशी! एकमेकाच्या गरजला पडाचं नाय तर जनूम कशाला करायचा?"

म्हातारीच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावरुन टपोरी आसवं जमीनीवर ठिपकली. राणूच्या गालफडावर आसवांचे ओघळ सुकले होते. श्यामा आणि पोरं जागी झाली. श्यामाची बायको चुलीला लागली. पोरांनी म्हातारीला वेढलं थोरलं पोरगं आजीला हालवीत म्हणालं - - - -

"आजी, कुणाचा मामा?"

"मामा आमचाच हाय,"

श्यामा बैलांच्या गोठ्यातून म्हणाला. राणूनं पोराला उचललं, कुरवाळलं.

"मामा आमचाच हाय? तर, मामा जातोय कुठं?

"जातू बाळ आमच्या गांवाला." राणूनं पोराच्या-चा गालगुचा घेतला.

"नाय मामा हितच व्हा." दोन्ही पोरं एकदम ओरडली आणि 'आय च्या' करीत चुलीकडे पळाली. मग म्हातारी म्हणाली.

"जा लेका. येंदा गावल्यावर कळीव आम्हाला."

राणू जड पावलानं खोपटाकडे वळला. बैलांच्या उसाबरीला लागलेल्या श्यामाला म्हणाला.

"जातू मालक." - - -

"आ. उगी वाईट वाटून घेवू नगं. कमीजास्ती कळीव. घर लोकाचं नाय." श्यामानं सहानभुती दर्शवली.

"बरं मालक."

त्यानं माग वळून पाहिलं. म्हातारीनं हात वर केला. राणू वाटेला लागला. रात्रीपासून सोना वाट पहात असेल. म्हणून तो झपाटयानं चालू लागला. वाट कुरणातूनच गेली होती. दशम्या बेरडाच्या वस्तीला चौकशी करावी म्हणून राणू त्याच्या खोपटाकडं वळला. दशम्या दारातच तंबाखू मळीत बसला होता.

"य् SS राणू कसं येणं केलंस?" दशम्या उसणं हसला.

"आलूय एका कामासाठी" राणूनं दशम्या समोर बैठक मारली.

"रामाच्या पाऱ्यात कसलं काम काढल्याल गा.?" दशम्या चिलमीत तंबाखु भरीत म्हणाला

"काल मेंढरु याक चुकलय गा. तवा तपास लाग-तूय काय बघावं म्हणून आलूय राणात." राणू दशम्या-च्या चेहऱ्यावरचे भाव न्याहळू लागला

"मेंढरु? कुठ रं गेलं?" - - -

"कुरणातनंच कुठं शिरलं बघ आडराणात!"

"इकडं तरी काय तपास नाय गडया. मेंढराची जातच बघ बखरी!"

राणूचा चेहरा पडला: पण बेरका दशम्या आपल्या चेहऱ्यावरचा भाव ढळू न देता बोलत होता. राणूला कोडं पडलं. तोवर खोपटातलं एक पोरगं धावत बाहेर आलं. अंगडयानं नाक पुसीत बा ला म्हणालं. -

"बा - - - आय म्हणतीया - - - - बाऊ काळून दे ये."

"आज कुठला बाऊ लेका ऐतवारी आणुया.?" दशम्या राणूला 'हुमाण' कळू न देता म्हणाला.

"न्हवं गा बाबा. ते आरुयाला बांदलाय ते सोडून S काढून SS तोडून SSS दे ये."

पोरगं रंगात येऊन सुरात म्हणालं. दशम्याला पोराचा राग आला. 'भांडं फोडतय कारटं' म्हणून तो त्याच्यावर गुरकला. हात् रांडच्या! गप जातूस का फोडू टाळकं?"

तस पोरगं खोपटात पळालं आणि आडयाकडं पहात उभारलं. आता मात्र दशम्याचं तोंड एरंडेल प्याल्यासारखं झालं. कारटयानं चोरी उघडकीस आनली म्हणून तो मनात चरफडू लागला.

"च्यायला! पैसा नाय जवळ आणि नाय ते मागतील."

राणूला 'तरी ही' बनवावं ह्या हेतुनं दशम्या म्हणाला. राणू बसल्या बसल्या पोरगं आडयाकडं काय पहातय ते न्याहळू लागला. पोत्याच्या बटरात गुंडाळून खोपटाच्या आडयाला कांही तरी टांगलं होतं. राणूनं हेरलं.

"लागला तपास!" राणू चटकन बोलून गेला.

'कसला रं राणू?" दशम्या घाबऱ्या आवाजात म्हणाला.

त्याला उत्तर न देताच राणूनं घरची वाट धरली. आजुबाजूला पहायचं कारण नव्हतं. दिवस बराच उंचावला होता. वाऱ्यानं झुलवे खाणाऱ्या गवतावर दहिवर झटकत होतं. राणूचे पाय ओलावत होते. मध्येच गोगलगाय आपल्याच वेगानं रांगत आडवी जात होती. भुईमुगाचा रसरसीत कोंब दाणी किडा कुरतडात होता. पडीत आळब्यांचे ठस्सर देठ डोक्यावर छत्री घेऊन गवताच्या सावलीला उभे होते. राणूचं कशाकडंच लक्ष नव्हतं. त्याला हव ते मिळालं होतं.

त्यानं घर गाठलं. सोना पोराला आडवं घेऊन बसली होती. राणूची वाट पहात. पोरगं बाला पाहून पुढं आलं. सोना राणूकडं पहात म्हणाली,

"लागला का वं तपास ?"

'नाय बा. खरं, तुला कसं कळलं ?" सोनाच्या कपाळावर आट्या चढल्या.

"मालक आला व्हता राती."

"काय म्हणत हुता ?"

"मस्त फनकारला. पिंजराच्या इंगळासारखा लाल झाला आणि म्हणाला कसा– "मेंढरु घावलं नाय तर समद्या म्हयन्याचं तीस रुपय मिळायचं न्हाईत !"

"अस्संऽऽ"

राणू भिंतीला टेकून बसला. पागोटं काढून गुडघ्यावर ठेवलं. घामजलेलं टकुरं पागोटयाच्या शेवान पुसू लागला. इतक्यात दशम्या दारात आला.

"राणू हकडं ये,"

"कायरं दशम्या ? पाटूपाट आलास ?" राणूनं खवचटपणे विचारलं.

बाजूला जाऊन दशम्या दबक्या आवाजात राणूच्या कानाला लागला.

'राणू, तुझं मेंढरु रात्च आरुड करीत माझ्या खोपटाला आलं. कुणाच हाय कुणास ठावं म्हणून म्या ते मारलं." असं म्हणून दशम्या राणूकडं पाहू लागला.

"मग काय कराव म्हतूस ? मगाशी तरी नाय म्हणालास?" जरा करडया आवाजात राणू म्हणाला.

"मी चुकी पदरात घेतली. काय बा करु,हे पन्नास रुपय घे. खरं, रावजी पाटलाला सांगू नगं." त्यानं राणूच्या हातात दहाच्या पाच नोटा कोंबल्या.

"तू म्हणून गप न्हातू. मालकाला सांगत नाय. पर आता असं करु नगं." राणूनं इशारा केला.

"नाय राणू. जातू मी." दशम्या निघून गेला.

राणू घरात गेला. त्याच्या मुखावर उगवतीच्या सूर्याचं तेज आलं होतं. इतका 'बांड' बेरड मालकाच्या दबावानं आरी आला म्हणून त्याला कमालीचा आनंद झाला.

"काय वं ? काय ब्याद आली त्या मुडद्याची ?" सोनानं विचारलं.

"आगं, मेंढराचा तपास लागला;" राणू हसत म्हणाला.

"कुठं हाय मेंढरु ? का उगीच हुरळीच्या फुला–वाणी हुराळतासा?"

" हे बघ मेंढरु." त्यानं त्या नोटा सोनाच्या पुढयात ठेवल्या.

"व्हय किवं. अगं त्या दशम्याचं मडं बिगीयान! आता उठा आणि त्या मालकाच्या पदराला बांधा जावा समदं पैसं. त्या बिगार त्यो इंगोळ निवायचा नाय." सोनानं सुचवलं.

'येडी हाईस तू. चोरुन मेंढरु विकलं म्हणून अदावत घीलत्यो माझ्यांवर."

"व्हय खरं - - - -" सोनाला पुढं बोलु न देता राणू म्हणाला.

"अगं खरं–बरं काय नाय. खऱ्याचं दिस मावळलं आता. हाय त्येचा माल आणि चोरटं खुशाल असतय बघ आता या जगात. खरं सांगून माझ्यावरची अदावत चुकवावी तर दशम्याची धडगत नाय. त्येला तरी का दाणीला द्यायचा. त्येचं शात का भात? मग जगायचं कसं ? देवानं त्येला मोकळ्या हातानं जनूम दिला त्यो काय भजन करीत बसायला ? बेरडाची जात म्हणून त्येला कोण कुळीला बलवीत नाय. पोटाची खळगी भरायला ह्या नडवीच्याचं मेंढरु खाल्लं म्हणून काय झालं ? जळता जळना एवढी इस्टेट, कोल्हं कुत्रं खाऊन जाईल खरं गरीबाच्या तोंडात घास घालायचा नाय तो राकूस!" राणूनं आपली सारी भिरड सोनापुढं बोलून दाखवली.

"आरं त्या राकसाला खाल्लं वाघरानं! कुणाच्या गरजंला पडायचा नाय बाबा." सोनानं दुजोरा दिला.

"त्या राकसाला वाघरं खाऊ दे नाय तर कुत्रं खाऊ दे. मी त्येची राकन सोडली."

"आणि वं - - ?" सोना काळजीच्या सुरात म्हणाली. इतक्यात बाहेर रावजी ओरडला.

"सोना - - -"

'जी" तिनं ढळलेला पदर सावरला. नोटा गाड-ग्यात ठेवल्या.

"आला का राणू?"

"आल्याती." ती आतूनच म्हणाली.

राणूनं पागूटं डोक्यावर ठेवलं आणि बाहेर आला.

"आलूया मालक. दारात हुबं? याकी आत." राणूनं घोंगड अंथरलं.

"कशाला आत यू? घावलं का मेंढरु?" रावजीनं डोळे मोठे केले.

"नाय मालक. साऱ्या रातीला शोधलं. सारं कुरण पालथी घातलं तरी तपास लागला नाय."

"बरं केलंस. मेंढरं राखायला तुझी गरज नाय मला. खुशाल घरात बस." रावजी गुरगुरला आणि निघून गेला.

"तुमची मर्जी." - - - -

राणूनं परतून सोनाकडं पाहिलं. ती जुनेराचा पदर तोंडाला लाऊन खुदकन हसली.

आणि दुसऱ्याच दिवशी राणू दहाची नोट घेऊन श्याम बाबराच्या वस्तीची वाट चालू लागला. त्याला "मेंढराच्या तपासाची कहाणी" मावशीला सांगायला घाई झाली होती.

※

# विज्ञान आणि देवधर्म

## एस. आर. कोरवी

प्रथम वर्ष साहित्य (अ)

आधुनिक युग हे वैज्ञानिक प्रगतीचे युग आहे. या युगात विज्ञानाने आणि यंत्रशास्त्राने केलेली प्रगती बघून मन आश्चर्याने स्तिमित होते. या विज्ञानाची कास धरुन मानवाने अनेक शोध लावलेले आहेत. कधीही न घडणाऱ्या गोष्टी साध्य झाल्या आहेत. आज मनुष्य चंद्रावर जाऊन पोहचला आहे. आणि मंगळाशी व शुक्राशी संपर्क साधण्याच्या व त्यांना पादाक्रांत करण्याच्या प्रयत्नात तो आता गुंतला आहे. सौंदर्यसंपन्न स्वप्नाचा सौदागर, लहान मुलांचा आवडता मामा, चिरेबंदी वाडा या सर्वसामान्य लोकांच्या कल्पना या विज्ञानाने खोटया ठरलेल्या आहेत. या विज्ञानाबरोबर देवधर्म देखील आहे. अध्यात्म आणि विज्ञान हे या मानवी जीवनाच्या रथाची दोन चाके आहेत. यावरच मानवी समाज ये जा करत आहे.

विज्ञान म्हणजे पद्धतशीर ज्ञान – शास्त्राच्या तर्काच्या, अनुभवाच्या, प्रयोगाच्या आधारावर उभारलेले ज्ञान म्हणजे विज्ञान. या ठिकाणी कुणाचे दडपण नाही. धर्माची आज्ञा नाही. कुणाचा हुकूम नाही. विज्ञानाविषयी विचार करताना बुद्धिमत्ता पाहिजे. मानवाच्या कुशल बुद्धिमतेच्या उपयोगामुळेच आणि या विज्ञानाच्या आधारामुळेच त्याने (मानवाने) प्रगतीचे अनेक सोपान चढून जाण्याचे श्रेय मिळविले आहे. बुद्धिमत्ता असल्याशिवाय विज्ञानाची माहिती मिळत नाही.

"विचार पटणं, आणि आचाराचं पाऊल पडणं" या दोन्हीचा मेळ यालाच विज्ञान म्हणतात. या विज्ञानाने वेळेची बचत, शक्तीचा बचत होते. दळणवळण वाढते. प्रवास अधिक सुखकारक व आनंदी बनलेला आहे. मोटार, रेल्वे, विमान, जहाज, स्कूटर इत्यादी वाहने आज आपल्या सेवेस हजर असल्या मुळे प्रवास आनंदी व सुखकारक झालेला आहे. या अनेक शोधामुळे एका दिवसात काशी रामेश्वर अन् बद्रीन रायण ही तिन्ही क्षेत्रे, तीर्थे आपण करु शकतो. काशीला जाण्यासाठी पूर्वी पायी प्रवासाने सहामहिने लागत असत. वाटेत लुटारूंचे व वन्य हिंस्त्र पशूंचे भय असे. पूर्वी मानव दुसऱ्या गांवी जाऊन परत आपल्या गांवी येण्याचा लोकांना भरवसा नसे. लोक तीर्थ क्षेत्राकरिता जात ते परत न येण्याचा निर्धार करुनच जात.

विज्ञानाने मानवाचे सारे जीवन (चांगल्या अर्थाने आणि वाईट अर्थानेही) पालटून गेले आहे. विज्ञानाने आता माणूस माणूसकीपासून दूर जात आहे. भारतीयत्याची दृष्टी बदलली आहे. विज्ञान हे स्वतः वाईट नाही, पण त्याचा सदुपयोग किंवा दुरुपयोग ते कुणाकडून हाताळले जाते यावर अवलंबून आहे. वैज्ञानिकांनी आपली बुद्धि जर स्वार्थी, अंहमन्य व सत्तापिपासू अशा राजकारण करणाऱ्या व्यक्तींना विकली आणि अशा राजकारणी व्यक्तींनी विज्ञानाचा दुरुपयोग मानव संहारासाठी, स्वार्थसिद्धीसाठी, राजकीय सत्तेचे क्षेत्र वाढविण्यासाठी आणि मागासलेल्या लोकांच्या शोषणासाठीं केला तर विज्ञान हे मानव जातीला हानिकारकच ठरेल. शापच ठरेल. उदाहरणात सांगावयाचे झाल्यास हिरोशिमा व नागासाकी या देशाचे विज्ञानाचा दुरुपयोग मानवाने केल्यामुळे नुकसान झाले. तसेच बोटीने किंवा विमानाने अगर अन्य वाहनाने प्रवास करणे जितके सुखकारक व आनंदी असते तितकेच ते दुःखदायक व हानिकारकही असते. प्रवास करतेवेळी अनेक अडचणी मध्ये येतात. लढाईमध्ये तर अनेक सैनिक मारले जातात. कित्येक जमीन नापीक बनते ते या विज्ञानाचा दुरुपयोग मानव करत असल्यामुळे.

अशी विलक्षण दृश्ये पाहून कांही शास्त्रज्ञांनी स्वतःला गोळी घालून आत्महत्या करुन घेतली आहे. कारण बॉंब तयार केल्यावर त्यांना एका दृष्टीने अत्यानंद

वाटला. परंतु नंतर त्यांना कळून चुकले की, हे विघातकी व सर्वनाशी आहे. रंगूनसारख्या देशाचे या तीव्रतेमुळेच सर्वनाश झाला. खरोखरच विज्ञानाने विकृती होते.

विज्ञानाविषयी अधिक माहिती आता आपण मिळवली. परंतु देवधर्माविषयी आपल्या ज्या कल्पना होत्या त्या आता या विज्ञाने कशा नाश पावत चालल्या आहेत किंवा त्या कल्पना कशा दूर होत चाललेल्या आहेत, या विषयी विचार करणे क्रमप्राप्त आहे.

प्राचीनकाळी अग्नि, वायू, पर्जन्य, आकाश, पृथ्वी इत्यादी पंचभूते या देवता आहेत असे रानटी माणसाला वाटणे स्वाभाविक होते. त्यावेळच्या मनुष्याच्या मानाने ही महान सामर्थे होती. कारण तो स्वतः दुबळा होता. ज्या ज्या गोष्टींचा त्याला उलघडा होत नसे परंतु आघात पोचत असे ती ती गोष्ट सर्वसमर्थ परमेश्वराच्या कर्तृत्वाची आहे असे त्याला वाटे. हिवताप, पटकी, देवी हे सर्व देवीप्रकोप वाटत. त्यांच्यापुढे त्यांचे काही चालत नसे.म्हणून तो देवाला शरण जाई. परंतु बुद्धीच्या विकासाने विज्ञानाच्या तीव्रतेने जंतूशास्त्रज्ञांनी जेव्हा या रोगांच्या कारणांचा उलगडा केला तेव्हा त्याचा हा देवभोळेपणा कमी झाला. या रोगांच्यासाठी बकरे, कोंबडे बळी देणे निरुपयोगी आहे असे त्यास तेव्हा पटले. यावरुनच की आता देव म्हणजे कोण? असा प्रश्न विचारल्यास देव म्हणजे राक्षसी इच्छा, वासना, स्वार्थी विचार पूर्ण करणारे राक्षस आहेत, असे उत्तर देता येईल. (God means–third class animal) असं म्हटलं जातं

देव हे आपण पूर्वीच्या परंपरेमुळे मानले आहेत. लोक अंधश्रद्धेने त्याच्या नांवाने हिंसा करतात. पूजा–अर्चा, भजन-कीर्तन करतात. काही लोक देवाच्या दर्शनात–भजनातच रंगून जातात. असे म्हणतात की,– "मानला तर देव नाहीतर दगड" देव म्हणजे केवळ भावना, आपली भावना म्हणजेच देव यावरुनच असे म्हणतात की, "भाव तोची देव" भावनेमुळेच देव भुलतो. म्हणून असे म्हटले आहे की,

भाव भुकेला हरी ।
करितसे भक्तांचि चाकरी ॥
भेटिसी आला भक्त सुदामा ।

श्री चक्रधर स्वामींनी देव मानलाच नाही. परमेश्वर हाच अंतर्मुखी देव आहे. परमेश्वर हाच एक श्रेष्ठ देव आहे. येशूख्रिस्ताने असे म्हटले आहे की, Voice of heaven. आपण मानलेतर आपल्यामध्येच पंचमुखी परमेश्वर आहे. १) स्पर्शेंद्रिय २) रसनेंद्रिय ३) घ्राणेंद्रिय ४) श्रवणेंद्रिय ५) दर्शनेंद्रिय हेच पंचमुखी परमेश्वर आहेत.

आपली भारतीय जनता ही दुबळी व देवभोळी आहे. जो कोणी ढोंगी साधू ज्योतिष सांगेल त्याप्रमाणे वागते कदाचित एकवेळ लोक जेवणे बंद करतील परंतु ती त्याच्या सांगण्याप्रमाणे वागण्याशिवाय सोडणार नाहीत. श्री ज्ञानेश्वरांनी असे म्हटले आहे की, "जे जे भेटे भूत ते ते जाणिते भगवंत" म्हणून देव मानायचाच तो प्राणीमात्रात, परोपकार, कर्तव्य इत्यादी सद्‌गुणात मानावा.

धर्म म्हणजे आपणाला इच्छित ठिकाणी ध्येय करुन देणारा मार्ग होय. भौतिक विज्ञान वापरणाऱ्या लोकांनी आध्यात्माच्या साह्याने आपली दृष्टी व जीवन बदलल्यावाचून या विज्ञानाला हितकारक, खरी व योग्य दिशा प्राप्त होणार नाही. डॉ. आलेक्सिस कॅरेलसारखे वैज्ञानिक आपल्याला सांगतात की, आधुनिक युगातील प्रगती ही भौतिक प्रगती आहे. डॉ. कॅरेल हे फ्रेंच वैज्ञानिक होते. तरी त्यांची आध्यात्मावर व परमेश्वरावर श्रद्धा होती. आणि विज्ञान व धर्म यांच्यामध्ये विरोध नाही, असे त्यांचे मत होते. या जगात विज्ञानापेक्षा आध्यात्मिक वाङ्मय श्रेष्ठ आहे. साहित्य, वाङ्मय हे जीवनाचे आरसे आहेत. कथा-कादंबऱ्यांतून, नाटकादी ललित कृतीतून भावपूर्ण दर्शन आपणांस घडते. विज्ञान आणि आध्यात्मिक वाङ्मय यावरच मानवी जीवन अवलंबून आहे. असे म्हणतात की, 'विज्ञानाने वानराचा नर झाला पण नराचा नारायण करण्याची किमया वाङ्मयात आहे. या वाङमयामुळे माणस माणुसकीला पारखा होत नाही.

अंतःकरण आणि बुद्धी यांचा सुमेळ घालावयाचे असेल तर आध्यात्म आणि विज्ञान या दोन गोष्टी एक केल्या पाहिजेत अध्यात्म आणि विज्ञान यांचे लग्न लागले पाहिजे !

❋

# चुडा

मदन हजेरी

द्वितीय वर्ष साहित्य

"हेच्या आयला!"

धरा रं, धरा त्येला, पळतोय आणि." शिवा पाटलाची हाळी साऱ्या शिवारात गरजून उठली. धरतीच्या भळी, भळी ती ऐकून थरारल्या - - - चळचळा कापाय लागल्या - - झाडं गदगदाय् लागली - - डोंगरावरची गवतं सळसळून किंचाळली - - मालकाची हाळी ऐकून बाळचा कुत्रं लांब ढेंगा टाकत पळाय लागलं. तवर सकन्यानं घशारतीचा आंबा गाटला. कुत्रं जवा सकन्यानं बगितलं तवा त्यो घाबरला. आता म्या जगत न्हाय हे तेनं पक्क हेरलं. जीव घीवून कसतरी व्हलपाटत, व्हलपाटत ते पळत हुतं. जवा किंवडयांच्या घराच वळाण आलं तवा सकन्या भिंगरीसारकं पळत हुतं. तवाच वळणाच्या आडानं येत्याली मंजी तेला दिसली. तेच्या जरा जीवात जीव आला. तो तिच्या आडाला झाला. मंजीनं ते सारं वळकून बाळयाला बलावलं. आता मातूर सकन्या सुटला व्हता पर त्येच्या काळजातली धुकधूक बाकी तशीच व्हती. ते मंजीच्या पाया पडाय लागलं. खर तीच तेच्या पाया पडली. ती तिकडंच बगत हुबी ऱ्हायली. "सांचं ढोर घीवून येणार न्हवं?" मंजी!

"हूं. येतू की" सकन्या.

मंजी एकसारखी मागं बगत हुती. मनातच फिदकन हासत हुती. पदर सावरीत हुती. चपलीचा आंगठा साराय म्हणून वाकायची आणि निमीत काढून बगायची. कुणी तरी बगल तर, अशी तिला धास्ती व्हती. शेतात येताच बापाचं जेवन दीवून हिरीवर घासळीची फुलं घीवून ती परातली. तिला जरा भांबावल्यासारकच वाटत हुतं. ढोरं सोडल्यावर ती चावुकच इसरली. एकदा काय पोतंच इसरली. एकदा चपल्याच इसरली. तशी च डागंवर गेली. मुसबाच्या टेकावर हुबारलं म्हंजे त्या गावच्या पांदीतलं समदं दिसत. बाळबाच्या तळयासनं सकन्यानं ढोरं वर मारली. सकन्या जातीनं मांग, पर पवा आसा वाजवायचा की बिळातला साप तेच्याकडं डुलत, डुलत यायचा. तेची आंगलट लयी झ्याक हुती. तेची शीळ तर साऱ्या तमाशाच्या फडातनं मंजीला वळकायची. मंजीचा तेच्यावर लयी जीव.

जवा मुसंबाच्या चडतीला सकन्याची ढोरं लागली तवा गवतातनं उडत्याल्या पाणकुंबडीसारकी ती भारवून रस्त्यावर आली. सकन्या घाबरला. "हेच्या आयला! तू व्हय. सांगायचं काय न्हाय, भ्यालू की." सकन्या. "भ्यालास न्हवं. बगू छाताड उडालंय काय?" तिनं पयल्यांदा त्यो हात राट छाताडावर ठेवला. तिला बर वाटलं. खरं सकन्या फुडं सटाकलं. त्येनं आदी ढोरं गवतात मारली. मग ती दोगंबी एका दगडावर यीवून बसली. लगेच सकन्याला याक फडयाचं ब्वांड दिसलं. तेनं ते आशा काय सिताफीनं काडलं की मंजी थंडच झाली.

मंजी म्हणाली–"आरं, काटं लागत्याल की जरा जपून. तू नकू. हीकडं आणं. तुज्या बोटाला लागलं तर जांबळीच्या झाडावर कोण चडणार? मला जांबळं खावुसं झालंय." "गप ग. तुला लागलं तर बाबा वरडल तुजा." मग तेनी ते बोंड खाल्लं. तेनं उष्ट करुन तिच्या व तिनं तेच्या तोंडात घाटलं. "हेच्या आयला! काय ग्वाड हाय ग हे?" सकन्या. "व्हय. आसुंदेत आमचं" मंजीनं मुरका मारला. इतक्यात शिंगाचा खाटखाट आवाज झाला. मंजीच्या पाडऱ्या रेडीची व सकन्याच्या काळया रेडयाची ढूस लागली हुती. ती दोगंबी पळून गेली. "हेच्या आयला, तायगंड हाय बाई तुजी रेडी" सकन्या.

"व्हय. त्योच आवागल्यासारका कराय लागलाय" मंजी. दोगबी हासत, हासत गेली. तेंचा एक देव हुता. ती दोगं रोज सगणीच्या फुलानं तेची पूजा करायची. तितलं पाक लोटायची. शेंगच्या डाळम्या परसादाला ठेवायची. लयी मजात व्हायाची तो ! तवर सांज झाली. ती दोगबी ढोरं गोळा करु लागली. किनीटीच्या टायमाला ती मारगात आली. तवा मंजी म्हणाली––

"सका, तू रोज काय मागतोस ?"

"सांगू– –सांगूच काय "

" सांग की लवकर "

" मला तू पायजेस " सकन्या.

"व्हय सका, मी बी तेच मागतुय."

ती हासतच बाळूबाच्या तळचावर आली. तेंची ढोर येगळचा मारगाला लागली.

इतक्यात मंजी म्हणाली, "सका, परवाशी माज्या बानं म्होतूर ठरीवलाय. माजं काय मन न्हाय. पर आता काय करायचं?" सकन्या आता बाकी गोंदळात पडला – – भांबावला – – तेच्या काळजात रातकिड वरडाय लागलं – – टिटव्या घिरटचा घालाय लागल्या. रेडचा-रेडीची ढूस जापाचं झाली – – बोंडाची कुसळं सुयीगत टोचाय लागली – – दगडाबुडला देव भूत होवून डोक्यात घण मारल्याचा भास होवू लागला– – एका शेंगाच्या दाण्याची डाळमी झाली हुती – – ती रोज गुळानं जुळायची. पण आज– –! त्यो मुसूमुसू रडला. खरं त्यो दांडगा इचारी. तिच्या त्या फडचाच्या बोंडागत झाल्याल्या गालाला हात लावून म्हन्ला, "मजे ? ए मंजेऽ ?"

ती बोलेना. तिनं तेच्या बटान नसल्याल्या छाताडाला काकणातली पिन आडीकली आणि ती दोनीबी काजी जोडली. सकन्या म्हणाला,

"नकू. तू शिरमंताची– – मी गरीबाचा– –त्यात मांगाचा – – तू गाव कामदार पाटलाची पोरगी – – आसुंदे करुन घे लगीन !"

"लगीन ?- - - -न्हाय- - - -न्हाय, सकन्या आपून पळून जावुया चल " "नकू. माजी म्हातारी आंदळी हाय. बा मरुन वरस झाली. त्या खोपटात तिला माज्याशिवाय कुणाचा आदार हाय ? तू कर लगीन. मंजी, तू जर केली न्हायीस तर - - - तर मी खोपटास जाळून घीन बग.- - - कर हां! कर हं. कर लगीन"– तेंच्या वाटा येगळचा झाल्या.

दिवसाचा गोंडा फुटायलाच आज गावातली मोठी माणसं, हालग्या, ताशा, ढोलकी लेजमं सारा गाव नुसता दुमदुमून गेला. नारायणाच्या देवळावर फट–फटीच्या माळा उडल्या. समद्या गावाला ती सूचना कळाली. पिपळावर पोपट चिवचिवू लागले. व्हराड आलं. गुळखोबरं वाटलं. गावातनं रुकवताची मिरवणी काढली. खालल्या मांगुडचात कुणीतरी चापाट मार–ल्यागत सकन्याला झालं. त्यो उटला. डोळं पुसतच कोंबडचा डालल्या. कुत्र्याला झाकणीत ताक वतलं. आणि शिवा पाटलाच्या मळचाकडं गेला. त्यो आज केळीची फुलं आणणार हुता. कलच्या मंजीच्या घास–ळीच्या फुलात घालून कुणाकडणंतरी देणार हुता. तेनं जावून केळीची फणी तोडली. तवरका जसा झाडुन्यातनं ससा उठावा तसा परसाकडं बसल्याला शिवा उठला–

"हेच्या आयला ! धरा रं धरा त्येला– – – – पळतोय लेकाचा. मांगडचाचं आसून पाटलाच्या शेतात आलं. सांचं केळीला हात लावतान आमी तांदुळ-कुंक–वानं पुजा करताव. तर ह्या रांडच्यानं तसाच हात लावला. बाळचा - - - बाळचा - - -ऽ !" एकदम् कुत्र मागं लागलं. सकन्याचा पाय एका भळीत आडकला. हे निसासरशी जावून पडलं. वाळचान जावून तेचं नरडंच फोडलं.तशातच भळीतला साप कडकडून चावला.बाळचा कुत्रं म्हंजी पाटलाचा जीव. सकन्या टाचा घासाय लागलं. शिवा पाटील बोंबलुदे रांडंचा म्हणून घराकडं गेला. तवा शंकू मांग कडगावासनं यीत व्हता. त्यो एकदम् चराकला. कारण आमुस्या फुडं आसली म्हंजे कामतातनं भुतं सारकी फिरत्यात अशी बोलवा हाय. खरं तेनं बगिटलं – – सकन्या - - रक्ताच्या थारळचात पडल व्हत – – तेनं तेला खांद्यावरनं आंडलं. सगळचा मांगासनी ही बातमी हा, हा म्हणता कळली. गावभर झाली. ती ऐकून मंजीच्या पोटात कालवाय लागलं.

तिची कायली – – कायली झाली तिच्या डोळ्या–म्होर काजवा चमकाय लागला– –पंधरा मिलटंच कमी व्हती तादळाला. फटाकड्या उडत हुत्या - - - मंजीच्या पोटात पण तशीच धडधड - - -ढोलगं रडल्याचा भास तिला होई! हायलेबज्या गणपा घावुड दारु पिवून बराडला. नारायण भट म्हणाले–"गरीब नवरा--साध्या घराण्यातला." म्हणताच मंजीची कानकवाडं फुटून त्यातून रक्ताच्या चिळकांड्या उडल्याचा भास झाला. सुपारी वाटली जात हुती. पानईडं घीवून किशा फिरत हुता. भटानं नारळ गोइंदाच्या हाती दिला. मंजीच्या व्हटीत घालण्यास त्यान फुडं केला. तवा – तेच्या त्या नारळावर भरल्या कुंकवाचा चुडा खच्चन तिनं मारला-- काकण - - खळकन् फुटली - - हाततनं भळाभळ रगात व्हवाय लागलं - - भट खच्चून बराडला - - शिवा बिवा समदी मांडवात पळून आली. तात्या पाटील बी सोंगा धरुनच पळत आला. तो म्हणत होता– "सकन्या सपल म्हण किगा ! तेच्या आयला, वाईट झालं बाबा. पाप म्हातारीचं !"

- - हे शद्ब तर एखाद्या गोमंगत मंजीच्या कानांत शिरले. - - ती - - - किंचाळली - - शिवा म्हणाला– "काय - - काय - - लेकी?" "बा-!" तिनं सुस्कारा सोडला. समदा मांडव कानाचं शिपलं करुन ऐकत हुता. कुणाचं तरी कुत्रं उगीचच भुकत हुतं. मंजीला बायकांनी धरलं हुतं. "लोकानू - - माजं लगीन सकन्याबरोबर मुसंबावरंच झालतं."

सगळी माणसं अचाट करतच घरला परतली. चावडीम्होर सावळ्या पाटलाचं प्वॉर बसलतं. ते बी. ई. झालतं. ते म्हणालं– "झ्याक झालं तेच्या आयला. शिवा पाटलाच्या पोरीनं ह्या पांढरीला धडा घालून दिला. म्हार–मांग सारं एक." "व्हय बरुबर हाय" गोविंदा हावालदारानं मान डोलावली.

*

# असंतोषाचे मूळ

आमच्या स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे आमदार प्राचार्य पी. बी. पाटील यांनी आपल्या भाषणात आजच्या विद्यार्थ्यांमधील वाढत्या असंतोषालाच प्राधान्य दिले. ते म्हणाले, या असंतोषाचं मूळ भोवतालच्या समाजामध्येच शोधावे लागेल. ज्ञानाला समाजाचा संदर्भ आला नाही तर ते ज्ञान समाजाच्या परिवर्तनाला उपयोगी पडत नाही. . . जोपर्यंत आजची शिक्षण व्यवस्था राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचं आव्हान स्वीकारीत नाही तोपर्यंत ती वांझोटीच ठरेल. . . . आजची गुणवत्तेची कसोटी बदलणे अत्यावश्यक आहे. सुखासिन ऐश्वर्यात लोळून प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा आयुष्याशी झगडा देऊन अनेक समस्यांना तोंड देऊन ज्ञान संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कष्टाचे न्याय्य रीतीने मोजमाप व्हायला हवे. . . . अमाप कष्ट करूनही बहुजनसमाजातील विद्यार्थी उच्च सुविधा आणि संध्यांचा लाभ घेऊ शकत नाहीत. यामुळे समाजात धगधगता असंतोष आहे. . . . . आजचा समाज वाळूच्या ढिगासारखा आहे, त्याचा प्रत्येक कण निसटता आहे. कुणाचं कुणाशी नातं नाही. पण त्याच वाळूत सिमेंटसारखा एखादा जोडणारा घटक घातला तर त्या कणाकणामध्ये एकप्रकारचं बळकट नातं तयार होतं. तसा माणसामध्ये माणुसकीचा बंध निर्माण होणें अत्यावश्यक आहे. . . . . कोणतेही चांगले उपक्रम या समाजातील Vested interests' कडून काळवंडले जातात. जुन्या आचारविचारावर पोसलेली ही मंडळी एखाद्या नव्या योजनेत शिरून त्याचा सत्यानाश करून टाकतात. आजच्या सहकारी चळवळीत हे प्रकर्षाने जाणवते. आजच्या विद्यार्थ्यांमध्ये वस्तुस्थिती समजून निर्णय घेण्याची कुवत निर्माण होणें आवश्यक आहे. पदवीधर होईपर्यंत त्याच्या मनांत जीवननिष्ठा तयार व्हायला हव्यात. . . . सामाजिक विषमता गुणवत्तेच्या आड येते. अफाट लोकसंख्येनेही फार मोठ्या समस्या आपल्यापुढे उभ्या केल्या आहेत. नेमून दिलेल्या कामात कुचराई करण्याची सर्वसामान्य प्रवृत्ती वाढत आहे. देशाच्या विकासाच्या मार्गात हा फार मोठा धोकादायक टप्पा आहे. या साठी वसतिगृहयुक्त शिक्षणसंस्था निर्माण व्हायला हव्यात. त्या योगे सामाजिक विषमता नष्ट होईल आणि आजचा विद्यार्थी सर्वांगाने घडेल. . . . . .

# महर्षी शिंदे : एक चिंतन

रामदास मोहिते

द्वितीय वर्ष साहित्य

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये समाज सुधारकांची एक परंपराच भारतामध्ये सुरु झाली होती. या परंपरेमध्ये आगरकर, लोकमान्य टिळक, ना. गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा फुले, गांधी यांचा समावेश होता. पण या सर्वांच्याकडून वेगळे असे स्थान महर्षी शिंदे यांना आहे. या थोर समाज सुधारकाचा जन्म २३ एप्रिल १८७३ मध्ये विजापूर जिल्ह्यात जमखंडी या ठिकाणी झाला त्यांची जन्मशताब्दी १९७३ साली साजरी करण्यात आली.

१८९१ साली लोकमान्य टिळकांनी आपल्या राष्ट्रीय उत्थापनाची स्वतंत्र तुतारी फुंकली. आणि त्याच वेळी विठ्ठल रामजी शिंदे मॅट्रिक उत्तीर्ण होऊन पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये दाखल झाले. पुण्यामध्ये दाखल झालेला हा जमखंडीचा मुलगा म्हणजे मराठी कणखरपणा व कानडी सढळपणा यांचे प्रतीक होता. पुण्यामध्ये त्यांना रावसाहेब म्हस्क्यांसारखा विलायती वातावरणातला पुढारी भेटला तसा आगरकरांच्या सारखा दुर्वासही भेटला. त्यांना मित्रमंडळी लाभली ती त्यांच्या सारखीच. "त्यांना पुण्याच्या एकाही विद्यार्थ्याने जवळ केले नाही. याला म्हणतात पुणे"! असे त्यांनी आपली आठवण नमूद केली आहे. परंतु हा सालस भाबडा दिसणारा विद्यार्थी जमखंडीहून येताना कोरी पाटी घेऊन आला होता अशी समजूत कोणी करुन घेऊ नये. 'भागवत धर्माचा गाभा म्हणजे समभाव असे जर मान्य केले तर त्यांची जमखंडी पासून पुण्यापर्यंतच्या प्रवासाला पुरेल एवढीच नव्हे, तर उभ्या आयुष्याची त्यांना त्यात निभावून नेता येईल इतकी मुबलक शिदोरी विठ्ठलरावांच्या आईवडीलांनी पुरवली होती. पुण्याच्या कॉलेज विश्वात वागताना त्यांच्या मनाने तत्कालीन वातावरणातले, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, असे सगळे प्रवाह प्राशन केले.

या तरुण विद्यार्थ्याच्या नेतृत्वाखाली एक चर्चामंडळ सुरु झाले. वेगवेगळ्या विषयावर बोलताना किंवा चर्चा करताना त्यांच्या विचारात सुस्पष्टपणा येऊ लागला. त्यांना डेक्कन मराठा असोसिएशन दरमहा १० रुपये अशी २ वर्षे शिष्यवृत्ती दिली. आणि पुढे बडोद्याच्या संभाजी महाराजांनी २५ रुपये दरमहा शिष्यवृत्ती दिली. त्यामुळे ते आपले शिक्षण पुरे करु शकले. विद्यार्थीदशेतील ही धडपड चालू असताना श्री. शिंदे यांना जे दोन अनुभव आले. त्यामुळे त्यांचे मन व्यथित झाले. जमखंडीसारख्या दूरच्या गावातून आलेला हा विद्यार्थी कॉलेजची फी माफ करण्यासाठी अर्ज घेऊन प्रि. आगरकरांना भेटावयास गेला. त्यांनी अर्ज वाचून आपणास मराठा असोसिएनची स्कॉलरशिप मिळत आहे असे समजल्याबरोबर आपणाला फी माफी व्हायची नाही असे सांगितले. आगरकरांच्या सुधारकी वृत्तीमुळे त्यांची कल्पना झाली होती. ती पार ढासळली आणि ते फार नाराज झाले. त्यांना दुसरा अनुभव तर यापेक्षा मोठा कटू आला. प्रो. आण्णासाहेब कर्वे यांनी हिंगणे अनाथ बालिकाश्रमाची स्थापना केली होती. त्यांच्याकडे ते आपल्या विधवा बहिणीसाठी भेटावयास गेले होते. त्यांच्या आश्रमामध्ये १०-१५ विधवा मुली होत्या. त्यांनी विचारले ' माझ्या बहिणीला आपल्या आश्रमात घेता काय ?' ह्या त्यांच्या प्रश्नांना उत्तर "ब्राह्मणेतरांच्या मुलींना घेण्याचा हा काळ नाही." असे प्रो. आण्णासाहेबांनी सांगितले. त्यामुळे त्यांची फार निराशा झाली.

बी. ए. परीक्षा पास झाल्यावर समाजातल्या दोन गोष्टीमुळे त्यांचे मन व्याकुळ झाले. धार्मिक अनाचार व सामाजिक विषमता. त्यांना स्वतःच्या गावी जमखंडीला आल्यावर त्यांनी दहा वर्षाच्या कोवळ्या मुलीला मुरळी म्हणून देवाला सोडलेली पहाताच तिला त्यांनी घरी

विचारांचे दडपण येत होते. अशा कचाट्यात सापडूनही त्यांनी आपला वैचारीक समतोल ढळू दिला नाही.

असा हा महापुरुष आयुष्यभर झिजत राहिला. फकीरी बाणा पत्करुन दलीत समाजाच्या उद्धारासाठी जून्या रुढी, चालीरीती आणि प्रतिगामी विचार यांच्या-विरुद्ध झगडत राहिला. समाज पुरुषांच्या वेदीवर आपले नव्हे तर आपल्या कुटूबियांचे जीवन अर्पण केले. स्तुतीची अपेक्षा केली नाही. निंदेची पर्वा केली नाही. त्यांना जीवनाच्या अंतकाळी फार वाईट दिवस काढावे लागले पण त्याबद्दल त्यांनी कधी निराशेचे उद्गार काढले नाहीत--पण येवढा बुद्धिमान, चिकित्सक, व्यासंगी, इतिहासतज्ञ नि ऋषितुल्य जीवन जगणारा सामाजीक उपक्रमांचा प्रणेता तुलनेने क्वचितच आढळावा !

आणि या अत्यंत स्वार्थत्यागी आणि उदारमनस्क अशा धर्मप्रचारकाचा, समाज सुधारकाचा अंत २ जाने-वारी १९४४ मध्ये झाला. लोकप्रियता आणि धार्मिक वृत्ती या गुणांनी युक्त असे हे अफाट व्यक्तीमत्व मराठी देशाच्या इतिहासात आजरामर होऊन गेले.

-()-

## संशयखोर युग

आजचा काळच मोठा चमत्कारीक आहे ! कोणताही मनुष्य चांगला असू शकेल, यावर आपला आज विश्वासच बसत नाही. उन्हाळ्याच्या दिवसात उष्मा फार होतो म्हणून एखादा मनुष्य सोडावाट-रच्या हॉटेलात जाऊन जर सोडा लेमन सारखं कांही थंडगार पेय पिण्यासाठी मागवतो. हातातल्या बाटलीवर त्याची दृष्टी खिळलेली दिसते कीं आणखी दुसऱ्या कुठल्यातरी बाटलीचं ध्यान तो मनात करतो आहे, असं आपल्याला वाटतं. एखाद्या स्त्रीनं केस कापले किंवा ओठ रंगवले की लगेच आपल्या मनात तिच्या चारित्र्यावीषयी शंका येते. प्रत्येकाच्या स्वाभाविक कृतीतसुद्धा कांहीतरी वेड्यावाकड्या हेतूचे दर्शन आपल्याला झाल्याशिवाय रहात नाही. मित्रानं आपल्या पाठीवर थाप मारली किंवा बराच-वेळ बोलत बसला की लगेच त्याचा स्वार्थ आपल्याला जाणवतो. कोणतीही स्त्री एखाद्या पुरुषाबरोबर मोकळेपणानं बोलताना दिसली की लगेच त्याचा डंका जगात गाजवायला आपण उत्सूक असतो.

आजचा काळच मोठा चमत्कारीक आहे ! आपल्यापैकी प्रत्येकाचे चारित्र्य दुसऱ्याला संशया-स्पद वाटत, अशी वस्तूस्थिती आहे. कोणी आपल्याला सहज जेंवायला बोलावलं, तर त्या साध्या निमंत्रणात काय हेतू असावा. त्याचं संशोधन सुरु होत. कोणाशीही पहिल्यांदाच आपली ओळख करून दिली की त्याच क्षणापासून आपल्या शंकेखोर मनाचा दंश कडकडून चावा घेतल्याशिवाय सोडत नाही. निर्मळ मनानं कोणाविषयी आपण विचार करु शकत नाही. आपण नेहमी स्वसंरक्षणाच्या पावित्र्यातच असतो. कारण कुचेष्ठा हीच आपल्या जीविताची प्रवृती झालेली आहे.

आजचा काळच मोठा चमत्कारिक आहे ! खरी गोष्ट अशी आहे की आपल्याला आप्त, मित्र, शेजारी कोणाचाच विश्वास वाटत नाही. फार काय स्वतःला सुद्धा स्वतःचा विश्वास वाटत नाही. पर-स्पर विश्वासाच्या अभावी आपण जीवनातल्या कितीतरी निरागस सुखांना पारखें होतो, त्यांची कल्पना सुद्धा करता येणार याही.

**महाडिक एस्. आर्.**
प्रथम वर्ष साहित्य

बोलावून घेतले. आणि तिच्या राहण्याची, जेवणाची, शिक्षणाची सर्व जबाबदारी घेतली. आणि त्यातून सोडण्याचा प्रयत्न केला. पण गावकऱ्यांच्या विरोधामुळे तो काही यशस्वी होऊ शकला नाही. त्यांचा सामाजीक विषमतेविषयी असणारा तिटकारा मात्र अगदी प्रारंभा-पासून होता

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक कार्याला व चळवळींना खरा प्रारंभ झाला तो १९०६ पासून. त्यांनी ता. १८ ऑक्टोबर १९०६ रोजी 'डिप्रेस्ड क्लास मिशन' या नावाची संस्था स्थापन केली. जनतेचा सर्वांगीण उद्धार व्हावा हेच त्यांनी आपले जीवनकार्य मानले. त्यांनी अस्पृश्य मुलांसाठी सेवाकार्य सुरु केल्यावर अस्पृश्य स्त्रियांच्यासाठी 'सेवासदन' सुरु केले. मिशनच्या कार्याचे क्षेत्र वाढल्यावर अधिक मदती-साठी रुपी फंड, धान्य फंड, पेटी फंड यासारखे फंड सुरु केले. गरीब मुलांच्यासाठी त्यांनी ठिकठिकाणी शाळा काढल्या. अस्पृश्यांना राजकीय स्थान प्राप्त करुण देण्यासाठी 'अस्पृश्यता निवारण संघ' पुण्यात सुरु केला.

महर्षींच्यावेळी पुण्यात महार, मांग, चांभार, भंगी फिरु लागला तर महार आला, महार आला म्हणून रस्त्यातून त्यांना ओरडत सुटावे लागत असे. रस्त्यांनी चाललेली स्पृश्य मंडळी किंवा भजनी महाराज बाजूला सरत असत. त्याचवेळी ब्राम्हण पूजारी कालीमातेला कोवळ्या बकऱ्याचे शीर कापून त्याच्या रकताचा टिळा भक्तांना लावत असत. धर्म-शास्त्राच्या नावाखाली अस्पृश्यांना माणसासारखे जगता येत नव्हते, वागणे-फिरणे तर कठीणच ! महर्षी म्हणत, तो मेलेला मानव पुन्हा बोलता करावयाचा आहे. त्याची अस्मिता जागी करावयाची आहे" देशभर यासाठी ते पायी फिरले. त्यांना अनेक संकटाना तोंड द्यावे लागले. शिमग्याच्या सणातील ग्राम्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी चळवळ उभी केली. त्यांना नेहमी असे वाटत असे की, परंपरेचे जू फेकून दिल्याशिवाय, जुन्याचा त्याग केल्या खेरीज आणि बुद्धीवादाची कास धरल्या खेरीज समाजमनाचा विकास होणार नाही.

म्हणुण त्यांनी समाजामध्ये पसरविलेल्या आणि पसर-लेल्या अंधश्रद्धा नाहीशा करण्याचा प्रयत्न केला.

कर्मवीर शिंदे ब्रम्हो समाजाचे पुरस्कर्ते आणि प्रचारक होते. महाराष्ट्रात प्रार्थना समाजाच्याद्वारे त्यांनी आपली धर्मपरायणवृत्ती प्रसारीत केली. पण त्यांची धर्मकल्पना परंपरागत पद्धतीची नव्हती. तिला व्यापक मानवतेची बैठक होती. म्हणूनच ते सामाजीक विषमता आणि धार्मिक भेदभाव याकडे ते व्यापक बुद्धीने पहात होते. याचवेळी महाराष्ट्राच्या राजकीय क्षितीजावर विसाव्या शतकाच्या आरंभी ब्राह्मणेतर पक्ष प्रकाशमान होत होता या पक्षाने महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा आधार घेतला असला तरी प्रामुख्याने ती चळवळ मराठा समाजाच्या राजकीय उत्थानासाठी चालली होती. त्यातून समाजात ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर असा वाद वाढत होता. कर्मवीर शिंदे यांना या वादात समाजाची शक्ती आणि बुद्धी दुभंग-ण्याची भीती वाटत होती. ही परीस्थीती पाहून त्यांच्या मनाने असे घेतले की, महाराष्ट्रात मराठा समाज हा बहुसंख्य असून महाराष्ट्राच्या पाठीचा कणा आहे. तेव्हां या समाजाचा जागृती व्हावी, पण जागृतीमुळे महाराष्ट्रात फूट न पडता उलट ब्राह्मणापासून अस्पृश्यापर्यंत हे जागृतीचे लोण खाली उतरावे, या हेतूने त्यांनी पुढे "मराठा राष्ट्रीय" संघाची स्थापना केली. ते १९२० च्या निवडणूकीच्यावेळी ब्राह्मणेतर पक्षास सामील न होता स्वतंत्र उमेदवार म्हणून उभे राहिले. मराठा समाजासाठी असलेली राखीव जागा त्यांनी नाकारली.

महर्षी शिंद्यांनी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी केलेले कार्य अतुलनीय आहे. आयुष्यभर अस्पृश्यतेच्या संशो-धनात त्यांनी आनंद मानला. अस्पृश्य म्हणजे स्पृश्यांचे राजकारणाचे एक दृढमूल झालेले जाळे आहे. ते म्हणतात "हल्लीची विपारी वर्णव्यवस्था कायम आहे. आणि तिचे मतलबी आणि धर्म पावटूक या जरठ देशात पोट भरुन आहेत तो पर्यंत ह्या महारथीला अशीच शाद्बिक भरती-आहोटी येत रहाणार !" कर्मवीर शिंदे यांच्या विचारांवर एका बाजूने कट्टर सनातनी ब्राह्मणांचे विचार आघात करत होते. तर दुसऱ्या बाजूने ब्राह्मणेतरवादी

# अपराध मीच केला

**मारुती जाधव**

द्वितीय वर्ष साहित्य

संध्याकाळचा मंदमंद झुळझुळ वारा अधिकच गार वाटत होता. प्रकाशामागून अंधाराची चढाई सुरवात चाललेली होती. सुधीर स्वतःच्याच अपराधा–बद्दल विचार करत त्या मोठ्या आलीशान बंगल्यासमो-रील बागेमध्ये एकटाच बसला होता. बंगल्याचा मुळचाच गौर आरक्त रंग संध्याकाळच्या अंधारामध्ये पुसट दिसत होता. बंगल्यावरील सुधीर सुभेदार ( B. A. Hons.) नांवाची पाटी तुच्छतेने पाहात असल्याचा भास होत होता. कार विश्रांती घेत होती.

सुधीर कलकत्त्याहून आजच पुण्याला आला होता. पुण्यामध्ये तो 'केमीकल इंडस्ट्रीज' या कंपनीचा डायरे–क्टर होता. कंपनीच्याच कामासाठी त्याला सध्या सहा महिने कलकत्त्याला राहावे लागले होते. तो बागेमध्ये बसला होता. त्याला एकदम कसला तरी धक्का बसल्या-सारखे झाले. त्याला मागच्या आठवणी दुःखी करीत होत्या.

आनंदवाडी येथे सुधीरचा जन्म झाला. सुधीरने एस्. एस्. सी. पर्यंत शिक्षण नेसरी गावात घेतले. एस्. एस्. सी. बोर्डात पहिला आला. परिस्थिती गरीबीची होती. सुधीर लहान असतानाच आईवडील वारले. तो काकाच्याच घरी रहात होता.

सुधीरने मनात निश्चय केला, आपण खूपखूप शिकायचे. आईवडीलांचे नांव काढायचे. पण काकांनी त्याला कोठेतरी नोकरी मिळते काय असे सांगितले. पण सुधीरने शिवराज कॉलेजमध्ये नांव घातले. काका चिडले. व त्याला कसल्याही प्रकारचे सहाय्य केले नाही. सुधीरला स्कॉलरशिप महिना ४० रु. मिळू लागली. त्याच्यावर त्याचा उदरनिर्वाह होऊ लागला. पण पुढे त्याला पैसे अपुरे वाटू लागले. तो फक्त विजारी-शर्टवरच राहू लागला. कॉलेजमध्ये मुले मुली फॅशन करुन येत होती. परंतू हा त्यांच्यापेक्षा निराळा वाटे. त्याला नेहमी गरिबीचा राग येत होता. परीक्षा संपल्या. रिझल्ट लागला. सुधाकर विद्यापीठात पहिला आला. त्याचे फोटो वर्तमानपत्रात झळकू लागले. सर्व मुला–मुलींना हेवा वाटू लागला.

सुधीरला दूसऱ्या वर्षीही स्कॉलरशिप मिळू लागली. पण त्याच्यावर त्याचे भागेना म्हणून 'रामराव साठे' यांच्या दूकानावर २–५० रु. प्रमाणे काम करु लागला. काम संपल्यानंतर तो अभ्यास करायचा, मगच तो झोपी जावयाचा

एक दिवस काम करीत होता, इतक्यात रामराव साठे सुधाकरला म्हणाले, "हे एवढे घरी देऊन परत ये." सुधीर ते कपडे घेऊन रामराव साठे यांच्या घरा–कडे चालला. मनात भीती होती. संकोच होता, चेहऱ्यावर ओशाळगता भाव धरुन तो मालकांच्या बंगल्यावर आला. त्याच्याच वर्गातील सुधा साठे नांवाची मुलगी ऐष आरामात खुर्चीवर बसून वाचत होती. सुधीर भांबाहून गेला. त्याला लाज वाटू लागली. तो हातातील कपडे पूढे करून दारातूनच हे घ्या म्हणून परत जाण्याचा विचारांत होता. पण सुधाने त्याला आत बोलावले. सुधाने त्याला बसावयास खुर्ची दिली. त्याने तिला सविस्तर माहिती सांगीतली. ते ऐकून तिला वाईट वाटले. त्याच्याकडून घरच्या परिस्थितीविषयी माहिती काढून घेतली. ते ऐकून तिला वाईट वाटले.

सुधीर तिचा निरोप घेऊन दुकानावर गेला. इकडे सुधा त्याचाच विचार करीत होती. गरीब आहे बिचारा! शिक्षणासाठी किती तळमळतो आहे ! त्याच्या विषयी मनांत कींव उत्पन्न झाली. तिने फोनवरुन वडीलांना

सांगितले की, कपडे पाठवून दिलेल्या नोकराला बरोबर घेऊन यावे. सुधाचा निरोप सुधाकरला सांगितला. तो संध्याकाळी विचार करतच मालकाबरोबर गेला. सुधा त्याची वाटच पहात होती. सुधाने बसावयास खुर्ची दिली. तिने आपल्या आईबापांना सुधाकरच्या परिस्थितीची माहिती करुन दिली. हे सर्व ऐकून वडीलांना आश्चर्य वाटले. त्यांनी सुधाकरच्या खांद्यावर हात ठेवला. व सांगितले की, तू आजपासून आमच्या घरचा आहेस. तू आमच्या घरी रहावयाचे. सुधाकरच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहात होते.

सुधाकरच्या अंगावर अपटूडेट कपडे आले. नेहमी प्रमाणे कॉलेज सुरु झाले. सुधाचा व सुधाकरचा अभ्यास सुरु झाला. दोघांच्या परीक्षा संपल्या. सुधाकर विद्यापीठाला पहिला आला होता. सुधाला सेकंडक्लास मिळाला होता. दोघांचे एकमेकावर प्रेम बसले होते. सुधाचे वडील लग्नाविषयी विचारत होते.

सुधाकरचे वेगळेच होते. नोकरी धरुन सुधाच्या वडीलांचे उपकार फेडावयाचे होते. पण सुधाच्या वडीलांनी तू नोकरी करु नकोस असे सांगितले.पण शेवटी सुधाकरने सुधाच्या वडीलांची परवानगी मिळवली. 'केमिकल इंडस्ट्रीज' मध्ये त्याला सर्व्हिसचा कॉल आला. व तो पुण्याला गेला.

सुधाकर पुण्याला जाताच इकडे सुधाला कशा, मध्येही गमत नव्हते. ती नेहमी उदास असायची. सुधाकरला देखील तिच्यावाचून गमत नसे. त्याला वाटे-क्षणात पुण्याहून गडहिंग्लजला जावे. पण आपले कर्तव्य पार पाडावयाचे होते. सुधाला सुधाकरची पत्रे येत. पण पत्रामध्ये माफीच मागितलेली असायची. दोन वर्षे निघून गेली. एक दिवस ती बागेत बसली होती. इतक्यात पोष्टमनने सुधा साठे नांवाची तार दिली. सुधाने ती घाईघाईने वाचली "क्षमा कर सुधा. फार दिवसांनी मी लग्नासाठी येत आहे." सुधाचा आनंद गगनात मावेनासा झाला. ती त्याच वाटेकडे डोळे लावून बसली.

सुधाकर येण्याचा निश्चित दिवस टळून गेला. सुधाला चिंता लागून गेली. सुधाला कांहीच सुचेना. ती वेड्यासारखी वागू लागली. पुण्याला सुधाकरच्या ऑफीसवर तार केली. नंतर तिला समजले, की "केमिकल इंडस्ट्रीज कंपनीचा मालक मरण पावला असून त्याला सध्या कांही येता येत नाही. कारण मालकाची मर्जी सुधाकरवर फार असल्यामुळे शिवाय त्याला कांही मूलबाळ नसल्यामुळे मरतेसमई त्यांनी सर्व कंपनी सुधाकरच्या नांवाने केली होती. सुधाकर 'केमिकल इंडस्ट्रीजचा' मॅनेजर झाला होता.

सुधा, सुधाच्या आईवडीलांना ही बातमी समजताच जरा बरे वाटले. पण लग्नाविषयी चिंता लागून गेली होती. आता सुधाकर केव्हा येणार होता याचा नेम नव्हता. सुधा खंगत चालली. तिला तर जास्त चिंता वाटू लागली की, एखाद्या वेळी मला विसरला तर ! अशा अनेक शकाकुशंकानी वेडी व्हावयाची.

इकडे सुधाकर कंपनीचा डायरेक्टर झाल्यामुळे कंपनीच्या भरभराटीविषयी चिंता वाटू लागली. त्याने नवीन यंत्रसामुग्री मागविली होती. नतर त्याने कंपनीची सुधारणा केली. तो कंपनीच्या कारभारात मग्न झाला. तो सुधा, तिच्या आईवडिलांना पूर्णपणे विसरला.

सुधाने अन्नपाणी वर्ज्य केले होते. सुधाच्या आईवडिलांनी तिला खूप सांगितले की, तू आता सुधाकरची आशा सोड. तुझे दुसऱ्याशी लग्न करुया. पण तिने ते ऐकलेच नाही. तिच्या स्वप्नी दिसत होते ते म्हणजे सुधाकर. एक दिवस सुधाच्या बाबांच्या दुकानाला आग लागली. दुकान जवळजवळ संपूर्ण खाक झाले. रामराव साठेवर दुःखाचा डोंगरच कोसळला. तशात सुधाची स्थिती तशी. ते दिवसेदिवस खंगत चालले व एक दिवस स्वर्गवासी झाले. सुधाच्या आईला धीर देणारा दुसरा कुणी कर्ता पुरुष घरी नव्हता. ती पण थोडयाच दिवसात हे जग सोडून निघून गेली.

बिचारी सुधा, लता आईबापावाचून पोरक्या झाल्या. सर्व जबाबदारी सुधावर पडली. तिचा तर धीरच खचला होता. तिने सुधाकरला तार केली. पण सुधाकर पुण्यात नाही असे समजले. तो कलकत्यात आहे असे समजले. कलकत्याचा पत्ता माहीत नव्हता.

अशा संकटाच्यावेळी धीर देणारे कोणीच नव्हते. तिने पण सुधाकरचे नांव घेऊन प्राण सोडला.

सुधाकर पुण्याला आला त्याला आल्या आल्या सुधाची तार आली होती असे समजले. त्याबरोबर त्याचे मन तिच्या आठवणीने तिच्याकडे धाव घेऊ लागले. सुधाकरला रात्रभर झोपच लागली नव्हती. तो पहाटे चार वाजता उठला. त्याने गॅरेजमधून आलीशान कार काढली. व वाऱ्याच्या वेगाने सुधाकडे सोडली. सकाळी दहा वाजता गडहिंग्लजमधील रामराव साठेंच्या बंगल्यासमोर थांबली. सुधाकर घाईघाईने सुधाला भेटण्यासाठी बंगल्याकडे धावला. बंगल्याच्या दारात जाताच त्याला 'कोण पाहिजे' अशी अनोळखी हाक ऐकू आली. पण सुधाकरचे लक्ष सुधाला शोधीत होते. सुधाकरने सुधाविषयी चौकशी केली. ती व्यक्ती म्हणाली, "सुधाचे आईवडील दोन महिने झाले वारले. त्याचे दुकान जळाले. सुधाने सुधाकर सुधाकर म्हणत आपला प्राण सोडला. लता तेवढी आहे. तिचे मामा तिला घेऊन कोल्हापूरला गेले आहेत. हा बंगला आम्ही भाड्याने घेतला आहे."

त्याला सर्व जग फिरत आहे असे झाले. तो धाडदिशी जमिनीवर पडला. त्याची शुद्धच हरपली. जवळचे आसपासचे लोक जमले. त्यांनी त्याला कसेतरी शुद्धीवर आणले. थोड्या वेळाने लताची भेट घेण्यासाठी तो कोल्हापूरास जाण्यास निघाला. आता त्याच्या गाडीचा वेग मंद होता. कसा तरी तो लताच्या मामाच्या घरी पोहोचला. त्याने चौकशी केली. त्याला समजले की, लताचे मामी-मामा लताला घेऊन पन्हाळ्याला गेले आहेत. सुधाकरचे डोके सारखे दुखत होते. तो डोके धरुन गेटमध्येच खाली बसला. इतक्यात पाठीमागून एक कार भयंकर वेगाने आली. व एक भयानक किंकाळी ऐकू आली. ती किंकाळी ऐकून त्या गाडीतील माणसे खाली उतरली. ते लताचे मामा-मामी होते. व लता होती. त्यांनी पाहिले की, गाडीखाली एक व्यक्ती सापडलेली आहे. रक्त चारी बाजूला उडाले आहे. लताला त्या व्यक्तीला कुठेतरी पाहिल्याचा भास झाला. त्याच्या हातात कसला तरी लखोटा होता. लताने घेतला व वाचावयास सुरवात केली.

प्रिय लता,

लता प्रथम मला क्षमा कर. मी फार दिवसाच्या कालावधीनंतर भेटत आहे. मी माझे सर्व कर्तव्य, उपकार विसरुन तुला या सर्व आपत्तीना पोरके करण्यास कारण ठरलो. सुधाचें जीवन बरबाद केले. मी तुझ्याकडे क्षमा मागण्यासाठीच आलो आहे. क्षमा करणे हे स्त्रियांचे भूषण आहे. तू मला निश्चित क्षमा करशील. या सर्व अपराधाला मीच कारण आहे.

तुझाच एक अपराधी
सुधाकर

लताच्या डोळ्यातून गंगा-यमुना वाहण्यास सुरु झाल्या. त्या सुधाकरच्या छिन्न-विछिन्न झालेल्या देहावर पडण्यास सुरु झाल्या. तिने एकच टाहो फोडला. 'सुधाकर!' पण सुधाकर केव्हाच सुधाला भेटण्यासाठी हे जग सोडून निघून गेला होता.

*

# मधुघट : एक रसास्वाद

अशोक माने

पदवीपूर्ण वाणिज्य

'मधुघट' ही भा. रा. तांबे यांची एक गाजलेली कविता. तांब्यांच्या कवितांना त्यांच्या उतारवयात जास्त प्रसिद्धी मिळाली. जीवनाच्या संध्याकाळी लिहिलेली 'मधुघट' म्हणजे तांब्यांनी जाता जाता रसिकांना दिलेला, मधुमधुर 'रसाने' भरलेल्या घटाची भेट होय.

तांबे हे भावनाशील, संवेदनाक्षम मनःपिंडाचे कवि असल्याने त्यांच्या कविता अर्थात भावनाप्रधान असतात त्यामुळे त्यांस भावगीतांचे स्वरुप येते. त्यांच्या काव्यात शद्वाबडंबर, अलंकारप्राचर्य इ. कृतिम गोष्टींची उधळपट्टी दिसून येत नाही. त्यामुळे 'प्रसाद' हे त्यांच्या काव्याचे वैशिष्टच झाले आहे. ' वाकं रसात्मं काव्यम्" या काव्याच्या व्याख्या त्यांच्या काव्यास बरोबर लागू पडतात.

'मधुघट' या कवितेचे रसग्रहण करताना त्या कवितेची पार्श्वभूमी लक्षात घेणे जरुर आहे. आयुष्याच्या अखेरच्या क्षणी, तारुण्याचा बहर ओसरल्यावर कविला आपली प्रतिभा ओसरत असल्याची जाणीव झाली. त्यचप्रमाणे त्यांचे 'नेत्र पैलतिरी' लागले. या दोन कारणामुळे आपण आता कवितारुपी 'मधुघट' रसिकास देऊ शकत नाही असे उत्तर 'मधु' मागणाऱ्या रसिक मधुपास, या मधुघटातूनच कवीने दिले आहे.

आपली प्रतिभारूपी कामधेनू आता चालली. प्रतिभेचा बहर ओसरला. आता 'मधुघट' रिकामेच पडत आहेत. जीवनाचा उत्कर्षकाल संपून संध्याकाळ सुरु झाली आहे. अशा तऱ्हेची जाणीव कविमनात उत्पन्न झाली व तीतून या कवितेचा जन्म झाला. हे 'आत्मनिवेदन' हा या कवितेचा उद्देश व हीच तिची मध्यवर्ती कल्पना !

तांबे अपल्या भावनांशी अत्यंत प्रामाणिक आहेत. ज्या मधुर शृंगार गीतांसाठी त्यांची प्रसिद्धी, ती आपल्या उतारवयात जीवनदृष्टी बदलल्यानंतर, अनुभूतीचे स्वरुप पालटल्यानंतर देखील पुन्हा घोळविण्याचा अप्रामाणिकपणा त्यांना मानवला नाही. तांब्यांच्या काव्यातील तो 'पूर्वरंग' जेव्हा बदलला तेव्हा साहजिकच काही रसिकांनी तक्रार केली. आपण रसिकाला तृप्त करु शकत नाही याची व्यथा तांब्यांनाहि जाणवली. परंतु त्यांना उपाय नव्हता नी म्हणूनच रसिकाला विश्वासात घेऊन, या कवितेत ते आपले अंतरंग त्याला उघड करुन दाखवीत आहेत. ''रसिका' ! तू आज माझ्याजवळ मधू मागती आहेस खरा, पण आज माझ्याच घरी मद्याचे घडे रिकामे पडत आहेत. आजपर्यंत मी तुला कमलपत्राच्या द्रोणातून मद्य भरुन पाजविले ही सेवा लक्षात घेऊन तू माझ्यावर रागावू नकोस. आंता दिवस ढळला आहे. संध्याकाळच्या सावल्या हृदयात भीती निर्माण करतात. माझे नेत्र पैलतिरी लागले आहेत. अशा वेळी रसिका ! मद्याचे नाव का बरे ?

तुला शृंगाराची मोहक वर्णने, निसर्गाची सुंदर चित्रणे हवी आहेत. तुला संसाराचे मर्म हवे आहे. हा मधू तुला हवा असला करी माझ्या हातात तो पिळण्याची शक्ती नाही. आता माझ्याजवळ नैवेद्याच्या दुधाची एकच केवळ परमेश्वराकरता आहे. देवपुजेसाठी एकुलती एक कोरांटी या अगणांत कशीतरी बाळगली आहे. म्हणून मी आता तुला काव्यरुपी मद्यदेऊ शकत नाही '' अशा शद्वांत कवीने मनोगत स्पष्ट केले आहे.

कवितेतील रूपात्मक आशय, तिची पार्श्वभूमी कळल्यास चटकन् लक्षात येतो. कवी या रूपकाशी अगदी समरस झाला आहे असे दिसून येते. हे रुपक मध्यवर्ती कल्पनेस पोषक झाले आहे. कवीचे काव्य म्हणजे मधुघट व त्यातील भावार्थ म्हणजे मध. हा मध कवी

रसिकास देतो. परंतु आता त्याची मध पिळण्याची शक्ती कमी झाली आहे. म्हणजे त्याची प्रतिमा ओसरत आहे. असे हे रूपक आहे.

मध्यवर्ती कल्पनेचा परिपोष करण्यास इतर अनेक गोष्टींचा अवलंब सहजपणे केला आहे. अलंकारांचा वापर कृत्रिमतेने मुद्दाम केलेला दिसत नाही. तांत्रिक आडाखे हेतुपुरस्सर वापरलेले दिसत नाहीत. काही कल्पना अगदी सहजसुंदर व वास्तव आहेत.

उदारहणार्थ :—

आजवरी कमळाच्या द्रोणी
मधू पाजिला तुला भरोनी.

ही कल्पना घ्या. प्राचीन संस्कृत वाङ्मयात मध कमलपत्राच्या द्रोणांतून पिण्याचा प्रघात असल्याचा उल्लेख आहे. कारण मध हा कमलपत्रांना चिकटत नाही. म्हणून ही कल्पना रम्य तशीच वास्तव आहे. कवीचे लक्ष आता परमेश्वराकडे लागले आहे. ऐहिक गोष्टीवरुन त्यांचे मन उडाले आहे; असे "लागले नेत्र रे पैलतिरी" या ओळीवरुन दिसून येते.

आता दिवस ढळला आहे. असे सांगून आपल्या जीवनाची संध्याकाळ सुरु झाली आहे. हे सूचित केले आहे. "संध्याछाया भिवविती हृदया" या वर्णनांवरुन कविमनाची अस्वस्थता प्रगट होते.

सहजगत्या केलेले आत्मनिवेदन हे या कवितेचे वैशिष्टय होय. कवितेत आत्माविष्कार योग्य तऱ्हेने घडला आहे. कविता आत्मनिवेदनवर असली तरी कवीने केवळ आपलीच वैयक्तिक सुखदुःखे तीत मांडलेली नाहीत. त्याला रसिकांच्या मनःस्थितीचीहि जाणीव आहे. रसिकास हव्या असलेल्या गोष्टी तो देऊ शकत नाही. या बद्दल तो दिलगीर आहे. हे "करि न रोष सखया दया करी" या ओळी वरुन दिसून येते.

माधुर्य हे या कवितेचे दुसरे वैशिष्टय.अर्था माधुर्य व शद्वामाधुर्य ही दोन्ही उत्तम काव्याची लक्षणे यात दिसून येतात. यमकानुप्रासांचा कृत्रिम खटाटोप करुन हे माधुर्य निर्माण केलेले नसून, मृदु व्यजनांचा वापर करुन व उचित शद्वयोजना करुन शद्वमाधुर्य निर्माण केले आहे. अर्थाची क्लिष्टता नाही. कल्पनांची अवास्तवता नाही. तसेच साध्या कल्पना सोप्या सरळ शद्वात मांडल्याने प्रसाद हा काव्यगुण दिसून येतो. सहजसुंदरता हा या कवितेचा आत्मा आहे.

योग्य वृत्ताची योजना केल्यामुळे रचना-सौष्ठव प्राप्त झाले आहे. त्यात भावपूर्णतेला गेयतेची जोड मिळाल्याने त्यास भावगिताचे स्वरुप मिळाले. 'मधुघट' हे शीर्षकही अत्यंत सार्थ आहे. एकंदरीत 'मधुघट' ही कविता म्हणजे प्रतिमेचा एक आत्माआविष्कार होय. कविची प्रतिभा ओसरली नसून त्याच्या जवळचे 'मधुघट' अजून मधुमधुर मधुने काठोकाठ भरलेले आहेत. असाच प्रत्यय ही कविता वाचताना तरी येतो, तो यामुळेच !

卐

# क्षमा असू दे पोरी !

## मारुतराव नानचे

प्रथम वर्ष वाणिज्य

विजू, काल तू गेल्यापासून माझं मन अत्यंत बेचैन झालं आहे. काय करावे तेच कळेनासं झालं आहे. मनाला कोठेतरी गुंतवण्याचा प्रयत्न करतो पण तेही जमत नाही. तुझ्या आठवणींच्या लाटा उसळून वर येतात आणि त्या लाटांच्या भोवऱ्यात मी अडकून पडतो.

काल तुझे लग्न करुन सासरी पाठविलं तेव्हा मनाला कितीतरी बरं वाटलं, समाधान झालं. पण नाही; त्याचवेळी मनाला कोठेतरी खटकलं, कोठेतरी बोचलं. हृदयाला त्या आठवणींनी वेदना झाल्या. ज्याची जखम पुसायला आज तू येथे नाहीस. डोळे अश्रूंनी भरुन आले पण तो हुंदका मला आतल्या आतच दाबावा लागला.

लहानपणापासून मी आणि शालनने तुझे कितीतरी लाड केले. तुझ्याविषयी आम्ही दोघांनी कितीतरी स्वप्नं रंगविली. अनेक मनोराज्ये केली. त्या स्वप्नात, त्या मनोराज्यात आम्ही दोघे रंगून जात असू. त्यात आम्हाला असीम सुख मिळत असे. तुझ्या लग्नाविषयी बोलणी सुरु झाली की शालन किती हुरळून जायची, लग्नात काय काय करायचे, काय काय नाही याची किती स्वप्नं रंगवायची आणि ठरविल्याप्रमाणे आम्ही तुझं लग्न मोठ्या थाटाने केले. पण . . . . . नाही, विजू त्या कौतुकात, त्या मोठे पणात कुठेतरी उणीव होती, जी कधीच भरुन निघणार नाही. मनाला खोलवर बोलणारा टोचत होती. ज्यामुळे माझं मन छिन्नविछिन्न झालं होतं. मी लोकांच्यापुढे वर वर हसण्याचं नाटक करीत होतो. पण अंतःकरणातून रडत होतो, आक्रंदत होतो, कळवळून रडत होतो ग ! पण माझे अश्रू मला कोणालाच दाखविता येत नव्हते. माझे रहस्य कोणालाच सांगता येत नव्हते.

काल तू सासरी जायच्याक्षणी माझा गळा भरुन आला. माझे अश्रू मला आवरेनात. भिंतीकडे तोंड करुन मी गदगदून रडलो. रोपट्याला प्रेमाचा वर्षाव करुन मोठे केले. त्याला आज मात्र मला दूर ढकलावे लागत होते. मला वाटते की तू जाताना मला नमस्कार करण्यासाठी येशील आणि मला पहाताक्षणीच माझ्या कुशीत शिरुन खूप रडशील, माझी क्षमा मागशील, मागचं सगळं विसरण्याचं मला वचन देशील पण नाही. पण ही माझी आशा मातीमोल ठरली. तू आलीस अगदी निर्विकार मनाने आणि औपचारिकपणे नमस्कार करुन परत फिरलीस.यावेळी माझ्या मनाला किती यातना झाल्या असतील, हृदय कसे तळमळत असेल याची तुला कल्पना यायची नाही. तुझ्या सुखासाठी मी आजवर धडपडलो त्याचे हेच का फळ मला मिळाले ? हेच का बक्षिस मला मिळाले? तुझ्याविषयी मी किती स्वप्नं विणली? ती सगळी धुळीला मिळाली, तुझ्याविषयी किती आकांक्षा मनी बाळगल्या पण त्यांचा केव्हाच चुराडा झाला, पण तुझ्यासाठी स्वप्नं रंगविण्याचा तरी मला काय अधिकार? तुझ्यासाठी आकांक्षा बाळगण्याचा मला काय अधिकार ? पण वडील या नात्याने माझा तुझ्यावर काहीच का हक्क नाही ?

त्या दिवशी संध्याकाळी तू तुझा जीवनसाथी निवडल्याचे सांगितलेस आणि मी बावरुन गेलो, घाबरुन गेलो. तुला कसे आणि काय सांगू याचे भले मोठे प्रश्नचिन्ह माझ्या डोक्यात पिंगा घालू लागले. रात्रंदिवस मी त्याचाच विचार केला आणि दुसऱ्याच दिवशी तुझ्या या लग्नाला नकार देऊन मी हे लग्न ठरवून आलो. ठरवून कुठला आलो, आधीच आम्ही हे ठरविले होते. आणि त्यानंतर मात्र तुझी हसरी गोड मूर्ती उदास झाली, अबोल झाली, तुला कशातच रस वाटेनासा झाला. पत्त्याचा बंगला कोसळावा त्याप्रमाणे तुझी

आणि तुझ्या प्रियतमाची अनेक स्वप्नं कोसळली, तुझीच प्रीतिबाग कोमेजून गेली, काचेचा ग्लास फुटून त्याचे तुकडे इतस्ततः पसरावेत त्याप्रमाणे तुमच्या स्वप्नांचा चुराडा झाला, या सर्वांना कारणीभूत मीच ठरलो. मीच अपराधी ठरलो.

जीवनाच्या पहिल्याच पाऊल वाटेवर मी अप-राधी ठरलो आणि जीवनाच्या अंती पण अपराधाला पात्र ठरलो. तू माझी लाडकी लेक आहेस असं आजपर्यंत मी मिरविलं आणि तोच मी मोठा गुन्हा केला. मी तुझा पिता नसतानाही पित्याचा अधिकार गाजविला.

त्या दिवशी मला मुलगी झाली, शालनला आणि मला किती आनंद झाला. कारण आज सात वर्षांनी आमच्या वंशवेलीवर हे फूल उमलले होते. पण दैवाला आमचे हे सुख पाहवले नाही. त्याने आमच्या सुखी जीवनावर कठोर आघात केला. आयुष्याच्या खेळात दैव हे नेहमीच विरुद्ध पक्षाला असते. तीन तासांनीच आम्हाला तळमळत ठेवून ती कायमची निघून गेली. मी उदास झालो. भकास नजरेने अंधाऱ्या मार्गातून वाट शोधू लागलो आणि नेमके त्याच वेळी मला विलासने माझ्या जिवलग मित्राने मदतीचा हात पुढे केला. माझ्यावर अनंत उपकार केले. तू तीन दिवसांची असता-नाच तुझी आई तुला सोडून गेली आणि म्हणूनच विलासने मन घट्ट करून आपल्या जीवाचा गोळा मला अर्पण केला. शालनला मात्र यातील काहीही कळू दिले नाही. मी आणि विलास मात्र वेगळयाच समाधानात होतो. आईला मुलगी मिळाली आणि मुलीला आई मिळाली.

विलास कधीतरी येऊन तुला पाहून जाई. पण नंतर नंतर तो येईनासा झाला. त्याचा सगळा जीवन-मार्गच बदलला. जीवनाच्या वाटेवर तो पूर्णपणे घसरला. नको त्या मोहाला बळी पडला. तो माझा मित्र होता असं सांगायचीही मला आज लाज वाटते. आणि म्हणूनच जीवनाच्या अंतीम घटकेला, त्याची जीवनज्योत मालवत असतानाही त्याने हे रहस्य तुला सांगू दिले नाही. जाताना मात्र त्याने माझ्याकडून वचन घेतले की तुझे लग्न मी किरणशीच करायचे. माझ्याकडून होकार मिळेपर्यंत त्याचा जीव तडफडत होता. घुटमळत होता. आणि मी 'हो' म्हणताचक्षणीच त्याने सुखा-समाधानाने जीव सोडला.

विजू, केवळ त्या वचनामुळे त्या पिंजऱ्यात अडक-ल्यामुळे मला तुझे लग्न करावे लागले. आजपर्यंत दुःख हा शब्द सुद्धा जिला मी माहित करून दिला नाही तिला आज मात्र मला दुःखाच्या खाईत लोटावे लागले, पण मी तरी काय करू ? माझा नाईलाज होता. माझ्या विजूसाठी मला काहीच करता येत नव्हते. पण तुला आता मागचं सगळं विसरलं पाहिजे. विजू मला माहित आहे की स्त्रीच्या प्रीतीची जखम कधी लवकर भरून येत नाही, पण विजू तुला ती जखम काढली पाहिजे. आता तू आपलं नवीन जीवन फुलव नव्या जीवनावर प्रीतीचा वर्षाव कर तरच मला हे दुःख विसरता येईल. विजू आज मी खूप रडत आहे, विव्हळत आहे. पण तुझ्या या अपराधी पित्याला तू क्षमा करशील ना पोरी?

# मी पाहिलेले साहित्य संमेलन



## पां. ल. येजरे

Dickens' novels are in general characterised as novels of incidents. This implies that the essence of his novels lies in their stories–in their episodes, events and plot construction There can certainly be no denial about Dickens' merit as a good story-teller. Indeed, Dickens tells his story admirably well and keeps his reader under spell abound from the beginning to the end.

Nevertheless, story-telling is not the only gift of Dickens. The chief interest of Dickens' novel lies in the infinite variety of characters they offer. The interest lies not only in perticular absurd incidents but also and more significantly, in the way in which given characters react to new kinds of environment. Dickens is a master in the art of characterization. His art of characterization deserves very important place in his quality as a novelist. He brings different men and women who are quite diverting and attractive, participats in his story. Each of the character soon develops his own moral, physical and emotional qualities and the interest is kept up by showing how these qualities reveal themselves in new and unexpected situations. He introduces a great many characters. The world of Dickens' novels peoples with numerous men and women.

Dickens' characters have an unforgetable individuality. He has created so many men and women but none of his two characters can be claimed as alike Certainly the child David is different from Oliver Twist, although there may be some common element of pathos in the life of these two orphans. Mr. Micawber and Mr Pickwick, though belong to the same realm of strangeness, are again not the same. This is certainly a key quality of his art that Dickens possesses the rare faculty of creating new yet numerous characters.

Mr. Micawber is sharply individual in his sincerity, hopefulness and basic honesty. By the side there is Uriah Heep, the arch-fried whose devilish design is frustrated by Micawber's bold and honest efforts. Uriah Heep's dark villainy individualies him. Again, Miss Betsey Trotwood is singularly individual in her commanding personality, prompt decision and sharp tongue.

Indeed, David Copperfield is filled with characters of astonishing variety, vividness and originality. In David Copperfield there is huge gathering of men and women. Dickens has choosen his people from various walks of life. Through his

novel peep familiar and unfamiliar figures, strong and entertaining faces. David, Miss Betsey, Mr. Micawber, Uriah Heep, Dora, Agnes, Clara, Peggotty and the Murdstones are the main characters of the novel. Around them there are the clust rs of other characters – Steerforth and Traddles, Ham and Mr. Peggotty, Mrs. Gumimidge and Emily, the carrier Barkis, Mr. Creakle, Dr. Strong, Dick. Mrs. Micawber and many others. Yet Dickens has never mingled or confused his characters. Steerforth fundamentally differs from Traddles and so does Agnes from Dora. Miss Betsey's eccentricity is certainly different from Mr Micawber's Peculiar optimism. None should dare for a comparison between Mr. Peggotty and Berkis — Dickens' characters are indeed uniquely individual. There are no such people as the Micawbers, Peggotty and Barkis, Traddles, Betsey Trotwood, Mr. Dick, Uriah Heep and his mother; they are the fantastic invention of Dickens' exultant imagination; but they have so much vigour they are so consistant, they are presented with so much conviction that while we read, we can not but believe in them. They may not be real, they are very much alive. They are not just life–like but even richer than life.

Not only does Dickens throw light on the individuality of his characters but he gives them a symbolic significance also. Like characters in old morality plays, they also represent certain vices and virtues. Mr. Uriah Heep stands for all hypocrites; Miss Betsey Trotwood for all philanthropists.

The best – drawn characters of the novel are perhaps the eccentric and humorous characters, such as Betsey Trotwood and Mr. Micawber With their funny appearence, odd manners and repetitions of certain pet phrases they bring a comic relief in the bleak and dismal picture of David's sufferings at the hands of cruel people, like the Murdstones and Mr. Creakle, and restore our faith in the essential goodness of human nature and its ultimate victory over the evil forces.

Dickens' method of characterization is to show them externally rather than to show the inner conflict of the soul. He exaggerates their peculiarities, their follies and fobiles, their habit of speech and oddities of behaviour, so as to stamp their quintessence on the reader's mind. He is not interested in showing the development of the character. The character remains till the end what they are seen to be at the beginning.

The danger of drawing charaeter in this way is that the limits of plausibility may be exceeded, and the result is caricature. Caricature is very well when the author presents us with a character at whom we can laugh as we can with Mr Mibawber, but it will not serve when he expects us to sympathise.

Mr Micawber is drawn from Dickens' father If falstaff is the greatest

comic character in English literature, Mr. Micawber is the greatest one. Dickens has been blamed for making him end up as a respectable magistrate in Austrilia and some critics have thought that he should have remained reckless and improvident to the end.

Dickens' characters are eccentric. In fact, Dickens's two immortal characters in David Copperfield too, are eccentric, Miss Betsey Trotwood and Mr. Micawber.

The eccentricity of Mr. Micawber is perceived from begeinning to the end It is noticed in his tone of utter despair as in his sense of fond hope. Nothing but an eccentric fellow could have cast his fate in the morning and played with the jail-warders in the afternoon. Miss Betsey's eccentricity is borne out in the way, in which she leaves the house of Copper-field on the occasion of David's birth. In her dealing with David, when he goes to Dover the eccentric fire of her character is fully active.

But it is not only in his creation of comic and eccentric characters that Dickens is masterly. Steerforth's smooth servant is admirably drawn; he has a mysterious, sinister quality. Uriah Heep smacks of melodrama; but for all that he is powerful, horrifying figure and he is most skilfully presented. He is, of course, not an eccentric fellow, but as criminal, he is rather abnormal.

Dickens has painted normal characters also. Certainly David, Dora, Agnes, Traddles, Clara, Peggotty are quite homely figures. The criminal characters like the Murdstones and Uriah Heep. too, are not uncommon. What has, however, immortalised Dickens' characterizatoin is his power to present, in diverting manner, the abnormal side of human nature.

Dickens' characters are drawn from some idealistic stand point. The novelist in Dickens is idealistic. His great sympathy is showered on those who have a noble ideal to pursue - on David, Mr. Micawber, Miss Betsey, Mrs. Peggotty and so on. Mr. Micawber despite his fond optimism is a noble soul. Dickens' sympathy is fully bestowed on him and he is idealized as a straight forward, honest and bold hearted fellow. Miss Betsey is too idealistic as an eccentric, but noble-hearted, spirited woman. She faces the diversity of her like with rare quietness of mind. Both Micawber and Betsey get over their adverse days and the idealist in Dickens shows them happy in their subsequent lives. Of course, Dickens does not like those who are malicious and Villainous. So Uriah Heep is not idealistic in any way, but the idealist in Dickens presents him appropriately for punishment for his Villainy.

Dickens is not successful in drawing female characters. Mrs. Micawber, repeating — "I never will desert Mr. Micawber", seems one-sided and flat. Dora drawn after Dickens' first love, Maria Beadnell, is too silly and too childish; Agnes drawn after Mary and George Hogarth is too good and too sensible;

they are both fearfully tiresome. Little Emily seems to be failure. Dickens evidently means us to have pity for her. Her ambition is to be a lady and hopes that she will be able to get Steerforth for marriage, She ran away with him. The most baffling character in David Copperfield is Rosa Dartle. We can only suppose that Steerforth has been her lover and she hates him because he has abandoned her, but notwithstanding, loves him still with a jealous, hungry, vindictive love.

We find that through out the image of young, innocent prematurely extinguished womanhood repeats. Mrs Clara Copperfield, David's mother, is described by the author and treated by almost everybody in the novel, as ' poor unfortunate baby '. Then there is Emily, ' a mere waistcoat pocket version of womanhood'' and there is David's first wife, Dord who wished to be called by the penname of ' child-wife '.

Steerforth is only one character that is drawn straight. Dickens has given the reader an admirable impression of Steerforth's chaarm, grace and elegance, his friendliness, his kindliness, his courage, his gaiety, selfishness and his recklessness. He has drawn here a protrait of the sort of a man that most of us have known. Dickens brings him to a bad end. If Steerforth had to die in order to satisfy the Victorian demand that vice should be always punished, Dickens might surely have thought of more plausible way of bringing this about. Tommy Traddles, seems very detightful.

The character of David does not emerge very clearly and that he is only a looking-glass in which a wonderful set of characters are reflected. This may be due to the autobiographical element of the book, where the main purpose is to state experiences and express feelings, the description of the man himself is an indirect result.

Dickens is a great master in drawing characters from the poor classes of society or the middle class, for his knowledge of these classes is personal. But He fails to protray characters from aristocratic or upper circles of society for his knowledge about them is deficient. He does not possess the Shakespearean imagination of depicting characters from all the walks of life. When he comes to the upper calss he fails and his characters seem to be theatrical rather than real. Betsey Tortwood in David Copperfield is unreal and theatrical character.

The art of characterization is difficult. Dickens has succeeded well in this difficult task. Whatever may be said in criticism of Dickens' characters one can not overlook the fact that Dickens holds a supreme position as a creator of characters. Even granting some touches of caricature and sentimentality, his characters have vitality that enables them to live on and on through the ages. Mr. Micawber, Betsey, Barkis, Miss Peggotty are alive today, as on the day when they were created.

*

# Simon's Papa

Miss Savant M. G.

F. Y. B. A.

Guy de Maupassant (1850-93) is one of the greatest masters of short story. His vast experience of life helped him to write excellent short stories. Simon's Papa that shows his ability is one of his most outstanding stories. In this story he shows how understanding and forgiveness can invest human life with a real nobility. He also shows how the basic principles of christianity – mercy, pity, peace and love– can make life worthy of living.

The story opens with the vivid description of the closing of the school. The very opening words;

"Noon had just struck. The school door opened and the youngesters streamed out, tumbling over one-another in their haste to get out quickly," attract our mind.

mmedietely we take deep interest in the story and this interest lasts up to the end. The story is never dull and dry. But it is full of beautiful scenes.

Maupassant has woven the plot in the most artistic manner. He draws his characters so powerfully and effectively that we wonder. Even with one stroke of his pen he can achieve greatest effect. In this story there are three main characters- Simon, La-Blanchotee and Philip-Remy. The presentation of the character is effective. No unimportant character is mentioned here. The story is compact and the technique is effective. The main attraction of the reader is Simon. These three characters show the author's deep thinking of life. Infact, Maupassant treats his characters objectively and truthfully. He paints them as they are and not as they ought to be. But the story, 'Simon's Papa' is one of the rare occasions where Maupassant becomes almost sentimentally attached to his characters. The charecters of Simon, La-Blanchotee and Philip-Remy are drown with great sympathy and perception.

Simon is a small poor boy. He is the son of La-Blanchotee, who is a fallen woman. When Simon goes to school, he is insulted and teased by the school boys. Simon is an illegitimate son of La-Blanchotee. La-Blanchotee is a beautiful young woman. She is a victim of a deceitful love. Her young life is spoiled and she has no bright future. She has a fallen reputation, so she keeps herself away from the cruel society. Philip-Remy is a blacksmith. He is very stout but kind hearted man. In drawing effectively these

characters Maupassant is most successful. He presents the characters with flesh and blood

The plot construction of the story is quite successful and fine one. The author avoids long winded-description and over elaborate analysis of the characters. He excludes all un necessary details and descriptions. The story has a good beginning. The beginning of the story is interesting. We see that Simon attends the school for the first time. The boys whisper about Simon. They teased him and shouted at him,

" No Papa ! No Papa ! "

We also come to know that La-Blanchotee is a fallen- woman, society treats her with distain. The author brings out powerfully how the school boys take devilish pleasure in harassing him. Simon tries hard to explain, but he can not convince the boys. Poor Simon weeps bitterly and goes on the bank of the river to drown himself. But noble, kind hearted Philip comes there and consoles Simon. He takes him to his home. A few days elapse. Once again the school boys tease Simon. So he goes to Philip and asks him firmly to be his papa. Philip meets La-Blanchotee at night and tells her that if she is ready, he will marry her. From that-day Philip-Remy will be his papa and he will box the ears of the boys if they tease Simon.

Thus, the story ends in happiness Simon gets a strong and kind hearted papa. The plot is woven artistically. We find compactness of presentation and rigorous discipline in this story.

The theme of thr story is that—

" Understanding and forgiveness can invest human life with real nobility. "

This is a story of a fallen woman, whose unfortunate son faces humiliation for having no father. Author shows how forgiveness, sympathy and love can make life worth loving.

In this story Maupassant has observed " Unity of impression " at its best. He focuses our attention on the central theme and characters. The story is sentimental in tone. All the feelings of three characters are expressed very effectively. The language is easy and graceful.

" Simon's Papa ", the title of the story, is significant and ideal. No character is given undue importance. There is no elaborate groupings of characters or complications of details. The story creates govd impression on the mind of a readers. The whole description of the story is vivid and photographic.

The style of the story is simple. It makes the story purely readable. The reader always remains under the spell of the story. The dialogues in the story are graphic, beautiful and quite attractive. The psychological story reveals the mental working of the characters and the particular influence that go to form their

mental conditions. This is a kind of social story also. Because Maupassant has put before us a social problem of the unmarried mothers. He tries to give them justice. He wants that they should be treated in an affectionate way.

Truely, 'Simon's Papa' is Maupassant's outstanding story. Here he shows that, —

"Understanding and forgiveness will change life into real nobility."

In this story Maupassant uses mythological references.

'Velcon' God of fire and mental work in Roman mythology. Secyond reference is to 'Hercules' the Roman God.

Maupassant's style is marked by lucidity. Thus the story satisfies all the important characteristics of the short story. And in the altimate analysis it remains one of the best short stories.

*

# FASHIONS

B. A. I

Ingavale D. D.

We see various coloured figures here and there in the city. Young men who have pants too tight to sit, girls whose skirts are so 'mini' that they cannot walk fast or run. All such figures are nothing else but the different types of fashions. There is not a single man who is not the Victim of fashions.

If we look at the crowd of the students, we find they imagine themselves to be heroes and heroines. We see various types of fashions in the society. But we think this thing is not useful for society. Fashions are found in every society. Every person young or old, rich or poor, man or woman goes after fashions. There are fashions in dress, hair and in wearing clothes shoes, saries and even in walking.

Fashions are wide spread. They change very rapidly. They change according to the films' fashions. A fashion repeats itself. In the past for about ten years back people took fancy in loose pants and shirts; with broad bottom. The fashion changed and tight pants with narrow bottom, 'Guru shirts', 'Bell bottom pants', 'Elephant bottom pants' are in fashion now. The skirts, panjabi dresses have thrown saries out of fashion.

Most of above fashions are introduced by the film--stars and sometimes they spring up out of mistake of the tailor. Everybody wants to look beautiful and smart. Motives of fashions are as follows-- Mental satisfaction, the sense of superiority, to impress others, to hide the physical defects.

Everyting has some limits. If fashions go out of limit, results will be serious. Now fashions have been in all times and season. We see in the films thousands of heroes wearing shoes a sweater during warm days. One should be careful with fashions. What is the use of getting crazy-after fashions?

It is natural for every one when the blood is hot, to go in for fashions. But it is shameful, pitiful to become a slave of fashion. But if one enslaves oneself to fashion one is bound to ruin one's life.

*



स्नेहसंमेलनाचे पाहुणे
प्राचार्य पी. बी. पाटील व सौ. पाटील यांच्या समवेत प्रा. डॉ. माडगूळकर व स्नेहसंमेलन सदस्य



स्नेहसंमेलनाचे पाहुणे
प्राचार्य पी. बी. पाटील व सौ. पाटील यांच्या समवेत प्राचार्य डॉ. माडगूळकर व जिमखाना सदस्य

स्नेहसमेलनाचे पाहुणे प्राचार्य पी. बी. पाटील व सौ. सरोजिनीदेवी पाटील
यांच्या समवेत प्राचार्य डॉ. माडगूळकर व सौ. माडगूळकर आणि कार्यालयीन कर्मचारी



बसलेले– डावीकडून : श्री. भैरव मोहिते, जयंत सवनीस, तुकाराम पाटील, सौ. सरोजिनीदेवी पाटील, प्राचार्य पी. बी. पाटील, प्रा. डॉ. अंबादास माडगूळकर, सौ. वरदादेवी माडगूळकर, कु. मकुल माडगूळकर, विलास गवळी, भीमराव पुडपळ, राघवेंद्र माडगूळकर.

उभे– डावीकडून : भीमराव रामपुरे, पांडुरंग जाधव, शिवगोंड गवळी, बाबू रेगडे

## प्रसिद्धी-विभाग

या वर्षी महाविद्यालयातील वर्षभरातील विविध कार्यक्रमांची प्रसिद्धी आणि वृत्त-वितरण अत्यंत समर्पक रीतीने करण्यात आले. विशेषतः 'मनोहर' सारख्या महाराष्ट्रातील एका अग्रेसर साप्ताहिकाने महाविद्यालयात निवडणुका व वसतिगृह, गणेशोत्सव या अभिनव कार्यक्रमांना अफाट प्रसिद्धी देऊन विद्यार्थ्यांच्या गुणांचे कोडकौतुक केले. पुढारी, सत्यवादी, इंद्रधनुष्य, लोकमान्य, समाज, नवसंदेश, तरुण भारत इ. वृत्तपत्रांनी आणि स्थानिक वार्ताहर श्री. सबनीस व श्री. लाटकर यांनी महाविद्यालयीन वृत्ताला वेळोवेळी प्रसिद्धी देऊन आम्हास उपकृत केले आहे. हे कृतज्ञतापूर्वक नमूद करावेसे वाटते.

**प्रा. शरद वराडकर**
विभाग–प्रमुख

## मुलींची एन्. सी. सी.

'शिवराजची शान' म्हणून ज्या लेडीज एन्. सी. सी. चा उल्लेख केला जातो ती एन्. सी. सी. या वर्षीही यशस्वी झालेली आहे. १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्य दिन व २६ जानेवारी गणतंत्र दिवस एन्. सी. सी. कॅडेटस्‌नी उत्साहाने पार पाडला. कॉलजचे आदरणीय प्राचार्य डॉ. अंबादास माडगूळकर यांनी मानवंदना स्विकारली.

२५ नोव्हें. हा एन्. सी. सी. वर्धापन दिन उत्साहाने पार पडला. अध्यक्षस्थानी प्राचार्य होते. श्री. जाधव, श्री. दोडमणी व श्री. जसवंतसिंग यांनी आमच्या छात्रांना योग्य शिक्षण देऊन विद्यार्थिनींमध्ये शिस्त व एन्. सी. सी. बद्दल आवड निर्माण केली.

गडहिंग्लजसारख्या छोट्या गावात एन्. सी. सी. मध्ये भाग होणाऱ्या मुलींना उत्तेजन आमच्या प्राचार्यांमुळे मिळते हे नमूद करण्यास आनंद वाटतो.

**प्रा. कु. फडणीस एस्. एल्.**
एन्. सी. सी. प्रमुखा

## राष्ट्रीय छात्रसेना (एन्. सी.सी.) ७३-७४

५६ महाराष्ट्र बटालियन

चालू वर्षी जुलै महिन्यापासून नियमित परेडस्‌ना सुरुवात झाली. नेहमीपेक्षा विद्यार्थ्यांची संख्या चालू वर्षी कमी पडली. एकंदर १२० विद्यार्थ्यांनी एन्. सी. सी. मध्ये भाग घेतला. यापैकी पदवीपूर्व वर्गातील ८० विद्यार्थी व वरील वर्गातील ४० अशी संख्या झाली.

दिनांक १५ ऑगस्ट रोजी प्राचार्यांच्या हस्ते ध्वजवंदन व शपथविधी झाला.

एन्. सी. सी. दिनानिमित्त कोल्हापूर येथे झालेल्या परेडमध्ये आमच्या १५ कॅडेट्‌स्‌नी भाग घेतला. तेथे त्यांनी बॅनेट फायटींगच्या झालेल्या स्पर्धेमध्ये बक्षीस मिळविले.

२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त प्राचार्यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. यावेळी आमच्या छात्रांनी बॅनेट–फायटींग व सेक्शन अॅटॅकचे प्रात्यक्षिके करून दाखविली. कचेरीजवळ पोलीस परेड ग्राऊंड वरील संचलनात आमच्या छात्रांनी भाग घेतला.

आमच्या कंपनीमध्ये ५ अंडर ऑफीसर, ३ सार्जंट, १ कार्पोरल, १ लान्स कार्पोरल असे प्रमोशन धारण करणारे छात्र आहेत.

गेल्या वर्षी बेळगाव येथे झालेल्या अॅन्युअल ट्रेनिंग कॅम्पसाठी आमच्या १) सोलापुरे बी. जे. २) भोपळे ए. बी. ३) माळी व्ही टी. या छात्रांची निवड झाली होती. यांनी हा कॅम्प उत्तमप्रकारे पार पाडला.

दि. ३०।१।७३ रोजी गडहिंग्लज येथेच २२ चे फायरींग झाले. यामध्ये बऱ्याच छात्रांनी फायरींग चांगली करून उत्तम गुण मिळविले. २ फेब्रुवारी रोजी कोल्हापूर येथे होणाऱ्या ३.३ फायरींगसाठी ५० छात्रांची आमची टीम जाणार आहे.

चालू वर्षी काही अडचणीमुळे वार्षिक शिबीर होऊ शकले नाही. या शिबीरा ऐवजी आम्ही कॉलेज

ग्राऊंडवर १० दिवसांचे आमच्या छात्रांचे औपचारिक वर्से शिबीर घेण्याचे ठरले आहे.

आमचे प्राचार्य व बटालियन प्रमुख मेजर पाटणेकर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली व उत्तेजनाने सर्व छात्रांनी अत्यंत उत्साहाने व शिस्तीने शिक्षण पुरे केले हे नमूद करण्यास आनंद होतो.

नायब सुभेदार जसवंतसिंग व हवालदार किसन जाधव व दोडमणी यांनी आमच्या छात्रांना योग्य असे शिक्षण देऊन छात्रांमध्ये शिस्त व एन्. सी. सी. बद्दल आवड निर्माण केली.

ए. एम्. नाळे
सेकंड लेफ्टनंट्
कंपनी ७ प्रमुख

## शिवराज महाविद्यालय वसतिगृह

गडहिंग्लज परिसरातील कॉलेजविद्यार्थ्यांची राहण्याची सोय करण्याच्या हेतूने महाविद्यालयाने जुलै १९७२ पासून वसतिगृहाची केली स्थापना आहे. या वर्षी २० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. विशेषत: संमिश्र जातीच्या विद्यार्थ्यांना सहजीवनाचा लाभ घेता यावा या दृष्टीने विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. सामूहिक जबाबदारी उचलून, निष्ठेने व कोणत्याही कामात रस घेऊन काम केले असता ते उत्कृष्ट ठरते याचे प्रत्यंतर या वर्षी वसतिगृहाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वर्षभरातील विविध कार्यक्रमातून आले.

या वर्षीच्या कार्यक्रमाची सुरुवात १५ ऑगस्ट ७३ रोजी सकाळी ८ वाजता 'झेंडावंदना' ने झाली. व त्याचदिवशी सायंकाळी कॉमर्स हॉलमध्ये श्री. अप्पासाहेब नलवडे वकील यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्य डॉ. मादगूळकरांचे स्वातंत्र्य-आंदोलनाचा समर्पक आढावा घेणारे 'क्रांती पर्व' या विषयावर स्फूर्तिप्रद व्याख्यान झाले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी 'गणेशोत्सवा' चा नाविन्यपूर्ण कार्यक्रम साजरा केला. वसतिगृहाच्या आवारात समारंभपूर्वक 'श्री गजानना' ची मूर्ति आणून त्याची प्रतिष्ठापना करण्यात आली. या निमित्ताने सुमारे दहा दिवस कॉमर्स हॉलमध्ये पुढीलप्रमाणे वैविध्याने व वैचित्र्याने नटलेले कार्यक्रम यशस्वीरीत्या सादर करण्यात आले. नकलाकार अनंत लिमये यांच्या आकर्षक नकला, श्री शाम किंकर यांचे 'नाट्यरस-दर्शन', गो. म कुंटे यांचे एकपात्री 'सुदाम्याचे पोहे', महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींची भावगीत-स्पर्धा, रांगोळी व चित्रकला प्रदर्शन, गंमत-जत्रा हळदीकुंकू समारंभ, गौरीपूजा इ. वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमाबरोबरच 'प्रश्न विचारा- उत्तर मिळेल' आणि 'एका बुडणाऱ्या नावेत इंदिरा गांधी, शत्रुघ्न सिन्हा, लता मंगेशकर, जया भादुरी, मधु लिमये आहेत, तुम्ही कोणाला वाचवाल?' या विषयावरील मिष्किल मतप्रदर्शन हे कार्यक्रम हास्याचे प्रचंड धबधबे निर्माण करणारे ठरले. विशेषत: या कार्यक्रमात प्राचार्य आणि प्राध्यापक मंडळींनी लावलेली हजेरी विशेष आकर्षण ठरले. 'गणपति-विसर्जना' चा कार्यक्रमही गडहिंग्लज नगरीमध्ये वैशिष्ठ्यपूर्ण ठरला. या कार्यक्रमात प्राचार्य, प्राध्यापकांपासून महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

२६ जानेवारीच्या प्रजासत्ताकदिन समारंभाच्या निमित्ताने सकाळी ८ वाजता माननीय प्राचार्यांच्या हस्ते ध्वजारोहण होऊन अत्यंत थाटामाटाने प्रथमच 'वसतिगृह-दिन' साजरा झाला. दुपारी ४ वाजता मित्रमंडळींना चहापान, संयुक्त फोटोचा कार्यक्रम व रात्री ९ वाजता प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व वसतिगृहाचे सर्व विद्यार्थी यांच्या समवेत सहभोजनाचा कार्यक्रम झाला. गुलाबी थंडीच्या रात्री विद्यार्थ्यांनी या निमित्ताने आयोजित केलेल्या 'शेकोटीचा कार्यक्रम' व विविध सांस्कृतिक कार्यक्रमाने या दिनाची सांगता झाली.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्याकडे माननीय प्राचार्य आणि कर्मचारी सर्व आस्थेने लक्ष पुरवित असतात हे नमूद करावेसे वाटते. वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात वेळोवेळी झालेल्या अन्य सांस्कृतिक

## पुस्तक पेढी ( Book Bank )

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सहकार्याने गेली दोन वर्षे चालत असलेला पुस्तक पेढी या वर्षीही महाविद्यालयाने स्वतःच्या जबाबदारीवर चालू ठेऊन त्यात जवळ जवळ ४०० हून अधिक पुस्तकांची भर घातली आहे. तसेच या योजनेची व्याप्ती वाढवून ४०० हून अधिक विद्यार्थ्यांना या योजनेतून पुस्तक संच वापरण्यासाठी दिले आहेत. यासाठी ग्रंथालयात एक स्वतंत्र विभाग सुरू करण्यात आला आहे. त्यासाठी महाविद्यालयाने चार नवीन काचेची कपाटे खरेदी केली आहेत. पुस्तक पेढीमुळे विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तकांची उणीव भासत नाही.

## विद्यार्थ्यांना सवलती

पुस्तक पेढीतून क्रमिक पुस्तके विद्यार्थ्यांना तर

सायन्सेस तसेच एम्पीरिल गॅझिटीअर्स सारखा महत्व-पूर्ण संग्रह व अन्य काही दुर्मिळ ग्रंथही उपलब्ध आहेत.

## पुस्तकांची देवघेव

सकाळी ८ ते १२ व दुपारी ४ ते ६ या वेळेत चालते. पुस्तकांची देवघेव दररोज जवळ जवळ १०० पुस्तकांची देवघेव होते.

## अभ्यासिका

ग्रंथालयात विद्यार्थी–विद्यार्थिनींकरिता स्वतंत्र अभ्यासिका आहे. दररोज सकाळी ८ ते १२ व दुपारी ४ ते रात्री १२ वाजेपर्यंत अभ्यासिका चालू असते. फार मोठया संख्येने विद्यार्थी अभ्यासिकेत अभ्यास करताना आढळतात.

# अहवालांचा अहवाल

निवडणुका होत नाहीत, गॅदरिंग व्यवस्थित पार पडत नाही, कुठलेच कार्यक्रम तडीला जात नाहीत, संप–घेराव–मिरवणुका हीच शैक्षणिका प्रेरणा, संशय–अविश्वास–उचलबांगडी हाच वर्षभराचा सांस्कृतिक कार्यक्रम . . . . अवती भवतीच्या युवक विश्वासात असे उत्पात चालू असताना शिवराज कॉलेजमध्ये सारं कसं शांत सुरळीत पाहून कोणालाहि आश्चर्य वाटेल! विविध कार्यक्रमाने आख्खं वर्षं गजबजून गेलेले दिसले. कुठंच संघर्ष नाही, द्वेष नाही, विध्वंसन नाही. आजच्या महाविद्यालयीन जगात शिवराज कॉलेज हा एक चमत्कारच आहे !!

मी तीन वर्षांपूर्वी चेअरमन झालो. साहेबांच्या कृपेमुळं मुदत वाढत राहिली. या काळात तीन निवडणुका झाल्या निर्धोक. बघता बघता ! गतसाली तर साप्ताहिक "मनोहर" ने विशेष वार्तेसह खास संपादकीय लिहून शिवराज कॉलेजचा खास गौरव केला आहे. कॉलेजचे चालक आणि विद्यार्थी यांची विशेष प्रशंसा केली आहे. एवढी शिस्त, अशी सुंदरता असा आदर्श आजच्या जमान्यात केवळ दुर्मिळच. महाविद्यालयीन जीवनात असे दैवदुर्लभ समाधानाचे अनुभव प्राध्यापक–प्राचार्यांच्या वाट्याला क्वचितच मिळतात !

सरत्या वर्षाकडं मागं वळून पाहिलं तर हे समाधान देणाऱ्या शिवराजच्या विद्यार्थी–विद्यार्थिनी–वरून जीव ओवाळून टाकावासा वाटतो ! अत्यंत सालस, समंजस, आज्ञाधारक आणि कामसू अशा या ग्रामीण मुलांच्या सहकार्यामुळेच येथे सुखशांति नांदत आहे. हे श्रेय केवळ त्यांना, त्यांच्या मोठेपणालाच आहे. मागं एकदा इथल्या विद्यार्थी–विद्यार्थिनी रायगडला गेल्या होत्या. मशाली पेटवून सारे गड चढले. रात्रीचे दोन वाजले. 'शिवाजी महाराजकी जय' ऐकून सुप्रसिद्ध साहित्यिक गो. नी. दांडेकर सामोरे आले. रात्रीची वेळ, हातात मशाली, तोंडात घोषणा, समोरचं दृश्य बघून त्यांच्या इतिहासप्रिय कविमनाचा बांध फुटला. विद्यार्थी नेत्यांना मिठीत घेऊन भावातिशयांत ते उद्गारले, "यार हो, तुम्ही गड चढून आलात. मशाली पेटवून दऱ्याखोऱ्या निनादून शिवस्मृती जागवीत ! असा अवरात्री गड चढण्याची स्फूर्ती तुम्हाला आली कुठून ? . . .

पाऊंडवर १० दिवसांचे आमच्या छात्रांचे औपचारिक असे शिबीर घेण्याचे ठरले आहे.

आमचे प्राचार्य व बटालियन प्रमुख मेजर पाटणेकर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली व उत्तेजनाने सर्व छात्रांनी अत्यंत उत्साहाने व शिस्तीने शिक्षण पुरे केले हे नमूद करण्यास आनंद होतो.

नायब सुभेदार जसवंतसिंग व हवालदार किसन जाधव व दोडमणी यांनी आमच्या छात्रांना योग्य असे शिक्षण देऊन छात्रांमध्ये शिस्त व एन्. सी. सी. बद्दल आवड निर्माण केली.

ए. एस्. नाळे
सेकंड लेफ्टनंट
कंपनी ७ प्रमुख

त्याची प्रतिष्ठापना करण्यात आली. या निमित्ताने सुमारे दहा दिवस कॉमर्स हॉलमध्ये पुढीलप्रमाणे वैचित्र्याने व वैविध्याने नटलेले कार्यक्रम यशस्वीरीत्या सादर करण्यात आले. नकलाकार श्री. लिमये यांच्या आकर्षक नकला, श्री शाम किंकर यांचे 'नाट्यरस-दर्शन', गो. म कुंटे यांचे एकपात्री ' सुदाम्याचे पोहे ', महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींची भावगीत-स्पर्धा, रांगोळी व चित्रकला प्रदर्शन, गमन-जत्रा हळदीकुंकू समारंभ, गौरीपूजा इ. वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमाबरोबरच ' प्रश्न विचारा– उत्तर मिळेल ' आणि 'एका बुडणाऱ्या नावेत इंदिरा गांधी, शत्रुघ्न सिन्हा, लता मंगेशकर, जया भादुरी, मधु लिमये आहेत, तुम्ही कोणाला वाचवाल ? ' या विषयावरील मिश्किल मतप्रदर्शन हे कार्यक्रम हास्याचे प्रचंड धबधबे निर्माण करणारे ठरले. विशेषतः या कार्यक्रमात प्राचार्य आणि प्राध्यापक मंडळींनीं लावलेली हजेरी विशेष आकर्षण ठरले. 'गणपति–विसर्जना' चा कार्यक्रमही गडहिंग्लज नगरी-

... असतो काय !

ज्ञानानं मोठे असणारे, बरोबरीचे आणि नव्यानच आलेले असे सर्व प्राध्यापक सहकारी सहाकार्याच्या जिव्हाळ्यानं माझ्याशी सतत वागत आले. सतंत साहाय्य केले. प्रा. नलगे सर यांचा मुग्ध स्नेह सततच मला मार्गदर्शक ठरला. आमचे ज्येष्ठ सहकारी प्रा. शेवाळकर सर नेहमीच सल्लामसलत करायचे. व्हाईस चेअरमन प्रा. दुंडगेकर सर हा एक शक्तीचा आणि संयोजनाचा आधार. त्यांनी कधीच अन्यथा लक्ष खुपसले नाही. अधिकार दाखविला नाही. यामुळेच मला सर्व सुरळीत पार पाडता आले. कार्यालयात कितीहि खर्चाव; साहेबांनी कुठे अडविले नाही. जिमखान्याच्या मिटिंग्जहि मीच घ्यायचा. अर्थ वाटप करतानाहि साहेब आले नाहीत. जे समोर येईल ते पूर्ण भरंवशाने मंजूर ! माझ्या कारकीर्दीच्या चांगुलपणाचा सारा वाटा त्यांचा आहे.

माझ्या सहकारी मित्रांनी आपापल्या खात्याचा स्वतंत्र वृत्तांत दिला आहे. सर्वांना पुनश्च धन्यवाद देऊन तो पुढे सादर करीत आहे.

–प्रा. विठ्ठल बन्ने
चेअरमन, शिवराज कॉलेज, गडहिंग्लज.

# ग्रंथालय विभाग

निकोप मनाचा विचारवंत विद्यार्थी घडवण्यासाठी उत्तम प्राध्यापकवर्ग लागतो, त्याचप्रमाणे विचारवंत प्राध्यापक व विद्यार्थी घडवण्यासाठी, त्यांची ज्ञानलालसा पूर्ण करण्यासाठी श्रेष्ठ दर्जाचे ग्रंथालय असावे लागते. ग्रंथालयाच्या श्रेष्ठत्वावरच महाविद्यालयाचा बौद्धिक विकास अवलंबून असतो. महाविद्यालयाच्या विकासात ग्रंथालयाचा महत्वाचा वाटा असतो. म्हणूनच त्याची वाढ निकोप व्हावी, ते एक श्रेष्ठ दर्जाचे ग्रंथालय व्हावे यासाठी प्राचार्य डॉ. अंबादास माडगूळकर यांचा वरदहस्त असतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास घडावा म्हणून ग्रंथालयात वेगवेगळ्या योजना प्राचार्यांच्या प्रेरणेने राबवल्या जातात.

## पुस्तक पेढी ( Book Bank )

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सहकार्याने गेली दोन वर्षे चालत असलेला पुस्तक पेढी या वर्षीही महाविद्यालयाने स्वतःच्या जबाबदारीवर चालू ठेऊन त्यात जवळ जवळ ४०० हून अधिक पुस्तकांची भर घातली आहे. तसेच या योजनेची व्याप्ती वाढवून ४०० हून अधिक विद्यार्थ्यांना या योजनेतून पुस्तक संच वापरण्यासाठी दिले आहेत. यासाठी ग्रंथालयात एक स्वतंत्र विभाग सुरू करण्यात आला आहे. त्यासाठी महाविद्यालयाने चार नवीन काचेची कपाटे खरेदी केली आहेत. पुस्तक पेढीमुळे विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तकांची उणीव भासत नाही.

## विद्यार्थ्यांना सवलती

पुस्तक पेढीतून क्रमिक पुस्तके विद्यार्थ्यांना तर दिली जातातच पण या खेरीज जे विद्यार्थी वार्षिक परिक्षेत उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण होतात त्यांना हवी तेवढी व हवी तितकी पुस्तके देण्याची सोय आहे. या योजनेतून ११ विद्यार्थ्यांना पुस्तकें देण्यात आली आहेत. तसेच वसतिगृहात प्रवेश घेतलेल्या काही विद्यार्थ्यांना पुस्तके देण्यांत आली. वसतिगृहासाठा एक स्वतंत्र विभाग करण्याची कल्पना आहे. ही योजना पुढील वर्षी वाढवण्याचा प्राचार्यांचा मनोदय आहे.

## मासिके व नियतकालिके

वेगवेगळ्या विषयांना उपयुक्त अशी एकूण ४० मासिके, साप्ताहिके व दैनिके ग्रंथालयात येतात. संदर्भासाठी उपयुक्त अशा मासिकांचा Back issue चे Bound Uol करून घेतले जातात. मासिकासाठी एक स्वतंत्र विभाग ग्रंथालयात केलेला आहे. याचा उपयोग प्राध्यापक व विद्यार्थी यांना होतो.

## संदर्भ ग्रंथ

ग्रंथालयाचा संदर्भ ग्रंथ विभाग बराच समृद्ध आहे. एन्सायक्लोपिडीया ऑफ ब्रिटानिया व सोशल सायन्सेस तसेच एम्पीरिल गॅझिटीअर्स सारखा महत्व-पूर्ण संग्रह व अन्य काही दुर्मिळ ग्रंथही उपलब्ध आहेत.

## पुस्तकांची देवघेव

सकाळी ८ ते १२ व दुपारी ४ ते ६ या वेळेत चालते. पुस्तकांची देवघेव दररोज जवळ जवळ १०० पुस्तकांची देवघेव होते.

## अभ्यासिका

ग्रंथालयात विद्यार्थी–विद्यार्थिनींकरिता स्वतंत्र अभ्यासिका आहे. दररोज सकाळी ८ ते १२ व दुपारी ४ ते रात्री १२ वाजेपर्यंत अभ्यासिका चालू असते. फार मोठया संख्येने विद्यार्थी अभ्यासिकेत अभ्यास करताना आढळतात.

## कमवा आणि शिका

कमवा आणि शिका या योजनेची सुरवात म्हणून प्राचार्यांनी या वर्षी अभ्यासिकेचे काम पहाण्यासाठी तीन गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना नेमले आहे. दररोज ४ तास काम त्यांना दिले जाते. हा एक नवीन उपक्रम या वर्षीपासून सुरु करण्यात आला आहे. यामुळे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना याचा फायदा मिळतो.

## ग्रंथ संख्या

पुस्तक पेढीत १२९३ पुस्तके आहेत, देणगी म्हणून आलेल्या ग्रंथांची संख्या ३३४ आहे.जनरल पुस्तके ७१३८ आहेत. ग्रंथालयातील ग्रंथाची एकूण ग्रंथसंख्या ८७६५ एवढी आहे.

टी. ए. पाटील
ग्रंथपाल

# कार्यालयीन अहवाल

" आज दुर्दैवाने क्रांती या शब्दाचा अगदी विकृत अर्थ लावला जात आहे. स्पष्ट तपशिलवार व सूत्रबद्ध कार्यक्रमाच्या बैठकी अभावी क्रांतीचा केलेला घोष हे अंधाधुंदीला व बेशीस्तिला आमंत्रण ठरतें." पण क्रांतीच्या घोषणेत विधायक व पुरोगामी कार्यक्रमाचा नवा अर्थ भरण्याचे कार्य करणाऱ्या व छत्रपतीचे शूर सेनानी प्रतापराव गुर्जर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या गडहिंग्लज परिसराचा शैक्षणिक कायापालट घडवून आणणाऱ्या आणि गडहिंग्लज नगरीची कीर्ती-ध्वजा उंचावणाऱ्या 'शिवराज महाविद्यालयाचा चालू वर्षीचा अहवाल सादर करतांना आम्हाला अभिमान आणि आनंद वाटतो. कोल्हापूरच्या दक्षिण भागाला मध्यवर्ती ठरणारे असे हे एकमेव महाविद्यालय असून स्वतःची प्रशस्त इमारत नसतानाही शहरी महाविद्यालयामधून मिळणाऱ्या शैक्षणिक सोयी येथील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न करीत आहोत. हे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

## आमचे प्राचार्य

ग्रामीण महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाची धुरा अत्यंत समर्थपणे वाहणे हा दिवसेंदिवस एक यक्ष प्रश्न होऊन राहीला आहे. पण सर्वांच्या अंतःकरणामधले सर्व संवादी व विसंवादी सूर स्वतःच्या षड्जाशी जमवून घेऊन महाविद्यालयाचे दैनंदिन संगीत गेली पांच वर्षे यशस्वीपणे निर्माण करणाऱ्या, प्राचार्य माडगूळकरांचा आम्हा सर्वांना मोठा आदर आहे.

आपल्या अमोघ वक्तृत्वाची प्रचंड गदा हाती घेऊन या दक्षिण महाराष्ट्राच्या परिसरात एखाद्या बुरुजासारखा उभा राहणारा हा पुरुष कार्यालयीन व्यवस्थापनाचे दृष्टीने एक उत्कृष्ट प्रशासक आहे.

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना अगदी घरगुती नात्याने व नांवाने ओळखणारा प्राचार्य आज विरळाच पण त्याला अपवाद डॉ. माडगूळकर. आणि म्हणूनच जेव्हा जेव्हा गेल्या वर्षाचा महाविद्यालयाच्या इतिहासाचा एक साक्षीदार म्हणून मागे वळून पहातो; तेव्हां उपेक्षितांच्या वेदनांना वाचा फोडणाऱ्या, साम्यवादी जाणीवांनी अंतःकरणाला पीळ पडलेल्या, पण या दुःखातून उद्याचा भविष्यकाळ घडवू पहाणाऱ्या एका दुर्दम्य आशावादी कविचे चित्र प्राचार्य माडगूळकरांच्या रूपाने माझ्यापुढे उभे राहते. इतके प्राचार्यांच्याबद्दल सांगितल्यावर आता अहवालाकडे वळतो.

## विद्यापीठ परीक्षांचे निकाल

आमच्या महाविद्यालयामध्यें अनेक त्रुटी असूनही कमीत कमी साधनांच्या सहाय्याने परंतु दर्जेदार आणि तज्ञ प्राध्यापक वर्गाच्या सहकार्याने आमचे विद्यापीठ परीक्षांचे निकाल नेहमीच उत्कृष्ट असतात.याची प्रचिती गेल्या वर्षीच्या निकालपत्रावरून येऊ शकेल.

पदवीपूर्व साहित्य– ८०%, पदवीपूर्व वाणिज्य– ८८%, बी. ए. भाग– १ ८९%, बी. ए. भाग– २ ८४%, बी. ए. भाग– ३ ६१%, बी. कॉम भाग– १ ६७%, बी. कॉम भाग– २ ५२%, बी. कॉम भाग– ३ २१%.

## नव्या वर्षाची सुरुवात

महाविद्यालय येथील एम्. आर्. हायस्कूलच्या इमारतीत दाटीवाटीने भरते. जागेच्या त्रुटीमुळे इच्छा असूनही विद्यार्थ्यांची संख्या वाढविता येत नाही. तथापि ग्रामीण परिसरातून येणाऱ्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आमचा कटाक्ष असतो. सन १९७३–७४ साली विद्यार्थी–संख्या खालीलप्रमाणे.

| वर्ग | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| पी. डी. आर्टस् | ११६ | १७ | १३३ |
| पी. डी. कॉमर्स | १११ | १ | ११२ |
| बी. ए. भाग–१ | ९८ | १५ | ११३ |
| बी. ए. भाग–२ | ८६ | २५ | १११ |
| बी. ए. भाग–३ | २८ | १२ | ४० |
| बी. कॉम. भाग–१ | ७३ | – | ७३ |
| बी. कॉम. भाग–२ | ७१ | – | ७१ |
| बी. कॉम. भाग–३ | ४४ | ५ | ४९ |
| एकूण | ६२७ | ७५ | ७०२ |

## शिष्यवृत्या, आर्थिक मदत वगैरे

शासनाकडून उपलब्ध असणाऱ्या सर्व प्रकारच्या शैक्षणिक शिष्यवृत्या व आर्थिक मदती वेळच्यावेळी मिळवून विद्यार्थ्यांना त्याचा जास्तीत जास्त फायदा मिळवून देण्यासाठी आमचे कार्यालय सदैव प्रयत्नशील असते. इ. बी. सी. सवलत घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून कमीत कमी फी घेतली जाते व अन्य तऱ्हेनेही त्यांना आर्थिक मदत दिली जाते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना या वर्षी दिल्या गेलेल्या मदतीची व आर्थिक सवलतीची खालील तक्त्यावरून कल्पना येऊ शकेल.

१) राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती– ६
२) शारीरिक व्यंग शिष्यवृत्ती– ३
३) हिन्दी शिष्यवृत्ती– ३२
४) ओपन मेरीट स्कॉलरशिप्– १
५) बी. सी. स्कॉलरशिप्– ३२
६) बी. सी. फ्री शिप्– २
७) ई. बी. सी.– ५५१
८) पी. टी. सी. – १४
९) सरकारी नोकर ई. बी. सी. – ६
१०) स्वातंत्र्य सैनिक स्कॉलरशिप्– १
११) क्रीडा शिष्यवृत्ती– १

महाविद्यालयाची फी भरणारे ९२ विद्यार्थ्यांपैकी ७० विद्यार्थ्यांना सुमारे ९,००० रु. फी–माफी महाविद्यालयातर्फे देण्यात आलेली आहे.

## विद्यार्थी मदतनिधी

यंदाच्या महागाईची झळ या परिसराला चांगलीच जाणवली. या महाविद्यालयात शिकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना ही तीव्र महागाई जाणवू नये या हेतूने ८० होतकरू विद्यार्थ्यांना ४०० रु. आर्थिक मदत विद्यार्थी फंडातून करण्यात आली.

## मागासवर्गातील विद्यार्थ्यांना मदत

महाराष्ट्र शासनाकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या आर्थिक मदती मिळावयास विलंब लागला. त्या मुदतीत या विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून या महाविद्यालयाकडून स्वतः झीज सोसून आर्थिक मदत व मासिक शिष्यवृत्ती देण्यात आली.

## कार्यालयीन कार्याची प्रशस्ती

महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राचार्य आणि प्राध्यापक वर्ग यांच्या गाड्या सदैव कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या रुळावरूनच जात असतात. या दृष्टीने आमच्या कार्यालयाचे कर्मचारी या आदर्शाचे तंतोतंत पालन करून महाविद्यालयाची धुरा समर्थपणे वाहायला आपल्याला मोलाचे सहकार्य देत आहे, असे प्राचार्य डॉ. माडगूळकरांनी काढलेले उद्‌गार सार्थ ठरलेत. या कार्यालयाच्या उत्कृष्ट पत्रव्यवहार, प्रशासन आणि हिशेबाबद्दल शिवाजी विद्यापीठाचे उप–कुलसचिव श्री. कुन्हाडे आणि शिक्षण संचालनालयाचे लेखापरिक्षक श्री. चव्हाण यांनी प्रशंसोद्‌गार काढलेले आहेत. हे नमूद करताना आम्हाला अभिमान वाटतो. श्री. विलास नवढी व श्री. भैरव मोहिते यांच्या तत्पर कामाचा या कार्यालयीन यशात मोठा वाटा आहे याची नोंद करणे आवश्यक आहे.

## आणि अन्य कामगिरी

गडहिंग्लज एस्. एस्. सी. केंद्राच्या प्रमुख संचालकपदाची धुरा १९७३ च्या परीक्षेसाठी प्राचार्य डॉ. माडगूळकरांकडे आल्यामुळे हे कार्य यशस्वी करण्यासाठी आमचे कार्यालय दक्ष आणि तत्पर राहिले. ऑक्टोबरच्या परीक्षेसाठी अत्यंत शिस्तबद्धरीतीने आणि दक्षतेने गडहिंग्लज केंद्राचे कामकाज पाहिले गेल्याने एस्. एस्. सी. बोर्डाने मार्च १९७४ साली प्रमुख संचालकपदाची जबाबदारी प्राचार्यांकडेच टाकली आहे, आणि आमचे कार्यालयही त्या दृष्टीने कार्यशील असते.

विद्यापीठाने नव्याने अस्तित्वात आणलेल्या शिक्षके–तर कर्मचाऱ्यांच्या पगारश्रेणीबाबतचा अधिनियम १७७ (अ) याचा अंमल ज्या काही थोड्या महाविद्यालयांनी केला आहे त्यात आमच्या महाविद्यालयाचाही समावेश आहे.

तीन वर्षानंतर यंदाच्या वर्षी आमच्या महाविद्यालयाचे 'वार्षिक स्नेहसम्मेलन' मोठ्या शिस्तबद्ध रीतीने आणि यशस्वीरित्या पार पडले. या सम्मेलनाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्राचार्यासमवेत या कार्यालयानेही मोठा हातभार लावला आहे.

या महाविद्यालयामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य आणि कार्यालयीन कर्मचारी यांच्यामध्यें अत्यंत जिव्हाळ्याचे आणि प्रेमाचे संबंध असतात. विशेषत: प्राध्यापकवर्ग आणि कार्यालयीन कर्मचारी यांच्या चालू वर्षी निघालेल्या 'आंबोली' आणि 'गोवा' सहली संस्मरणीय ठरल्या.

## कांही अभिनव उपक्रम

या महाविद्यालयात अत्यंत शिस्तबद्धरीतीने कोणताही अनुचित प्रकार घडू न देता गुप्त मतदान पद्धतीने घेतली जाणारी 'जिमखाना निवडणूक' उभ्या महाराष्ट्रात वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली आहे आणि याचा आवर्जून उल्लेख महाराष्ट्राच्या मातब्बर साप्ताहिक 'मनोहर' ने केलेला आहे.

गेल्या वर्षी महाविद्यालयाला जोडून 'वसतिगृह' स्थापन करण्यांत आले. या वर्षी 'गणेशोत्सव', 'वसतिगृह दिन' वगैरे अभिनव कार्यक्रमांनी वसतिगृहानेही सर्वांचे लक्ष वेधून घेतले. साप्ताहिक 'मनोहर' नेही या उपक्रमांची आवर्जून दखल घेतली आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सोयी उपलब्ध करून महाविद्यालयाचे ते एक अभिनव सांस्कृतिक केंद्र ठरावे या दृष्टीने आमचे कार्यालय सदैव प्रयत्नशील राहिले आहे.

आमच्या अनेक नवीन योजना व नवे विचार आहेत. त्या राबविण्यास प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व कोणत्याही वादापासून (भाषावाद, सीमावाद, जातीवाद, राजकीय प्रणाली) अलिप्त असणारा, पण जुन्या परंपरा जपत नव्याचे स्वागत करणारा विद्यार्थी वर्ग सदैव तयार आहे. पण महाविद्यालयाचे स्वतंत्र इमारतीचे अपुरे स्वप्न पुरे झाले पाहिजे व ते व्हावे ही इच्छा नजरेसमोर ठेवतो. आणि हा अहवाल थोडक्यात संपवितो. खूप लिहिण्यासारखे आहे. खूप घडण्यासारखे आहे, पण संकल्प आणि सिद्धी यामध्ये नियती उभी असते. हे विसरता येत नाही.

तरीपण ग्रामीण भागातील महाराष्ट्रातील एक आदर्श महाविद्यालय म्हणून नांव मिळविण्यास हे महाविद्यालय यशस्वी होईल असा विश्वास आहे.

जयंत सबनीस
कार्यालय अधिक्षक,
शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज.



निवडणुकीतील अपप्रकार टाळण्याचा अेक यशस्वी प्रयत्न : गडहिंग्लज स्टाअिल

# ...अशीही (माफक) धमाल निवडणूक